पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ अंक १३ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ मार्च २०२३




## शिवसेना नावासह गेला धनुष्यबाणही...

राहुल गांधींचे काँग्रेसवर
पुन्हा अधिपत्य!
– विचक्षण बोधे

कोणाच्या खांद्यावर
कोणाचे ओझे!
– देवीदास तुळजापूरकर

'ठाकरे'संस्थान
खालसा?
– संजय पवार

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक १३ । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ मार्च २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट 8888541822

● **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/- रुपये फक्त

● **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाइन पमटसाठा यथ स्कन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा


**संपादकीय :** संपादकीय - शिवसेना नावासह गेला धनुष्यबाणही... - ३/ निवडणूक आयोगाचा पक्षपाती निर्णय! - **अनंत बागाईतकर** - ५ / **रेशीम आणि किडे :** 'ठाकरे'संस्थान खालसा? - **संजय पवार** - ८ / कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे! - **देवीदास तुळजापूरकर** - १३ / **दिल्ली दरबार** - राहुल गांधींचे काँग्रेसवर पुन्हा अधिपत्य! - **विचक्षण बोधे** - १५ / रायपूर महाअधिवेशन : काँग्रेस पक्ष पुन्हा फ्रंटफुटवर खेळेल काय? **सुरेश भटेवरा** - १८ / कृषी क्षेत्राच्या आत्मनिर्भरतेचा वेध - **डॉ. सोमिनाथ घोळवे** - २१ / अशी झाली मानवी हक्काची जडण घडण - **नागार्जुन वाडेकर** - २३ / मराठी भाषा धोरणाविनाच राज्य किती काळ चालवणार? - **डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी** - २६ / काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह : एका ऐतिहासिक सत्याचे अधोरेखन - **डॉ. अनमोल शेंडे** - २९ / **व्यक्तिविशेष :** आंबेडकरी विचारांचा प्रेरणादायी पँथर : यशपाल सरवदे - **शीतलकुमार शिंदे** - ३३ / **ग्रंथ परिचय :** गोरबंजारा समाजाचा ऐतिहासिक ठेवा आणि संस्कृती उजागर करणारा अनमोल ग्रंथ - गोरमाटी - **याडीकार पंजाबराव चव्हाण** - ३५ / **कोणता भारत..** - ३७ - विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच का पडतात ईडीचे छापे... । झेडपीच्या गुरुजींमध्ये आली आंधळे, पांगळे होण्याची साथ । शहरांची नावे बदलून काय साधणार? प्रश्न सोडवा की

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# शिवसेना नावासह गेला धनुष्यबाणही...

शिवसेनेचा धनुष्य आणि अर्थातच त्याचा बाण शिवसेना या पक्षाच्या नावासह चोरून नेण्यात आला, असं उद्धव ठाकरे यांच्यासह त्यांचे अनेक हितचिंतक बोलू लागले आहेत. दिल्लीचे केजरीवाल त्यापैकी एक. इतर अनेकांना ही गोष्ट खरी वाटू लागली. जर चोरी झाली असेल, तर ती सामान्य चोरीसारखी नाहीय. एरव्ही घरातले लोक झोपल्यावर चोर गुपचूप घरात शिरतो आणि चोरी करून पसार होतो. पण धनुष्यबाणाची चोरी त्यातली नाहीय. ती दिवसाढवळ्या, मालकाला सांगून आणि घटनात्मक संस्थेच्या कार्यालयात जाऊन झाली आहे. आपण फार तर कायदेशीर चोरी म्हणू शकतो; पण काही झाले तरी चोरी कायदेशीर आणि बेकायदेशीर नसते. चोरी चोरीच असते आणि तिला कायद्याने मान्यता नसते. उद्धव ठाकरे म्हणतात, की पक्षाचे नाव, पक्ष, धनुष्य आणि बाण चोरून नेण्यात आला. त्यांच्या या आरोपावर सर्वोच्च न्यायालयात जे काही होईल ते होईल; पण मुळात चोरी का झाली, हा प्रश्न शिल्लक राहतोच. असाच प्रश्न 'बाहुबली' या गाजलेल्या चित्रपटाच्या शेवटाने झाला होता आणि त्याचे उत्तर चित्रपटाच्या दुसऱ्या भागात मिळाले होते. तर प्रश्न असा होता, की कटप्पाने बाहुबली को क्यों मारा... आणि राजकारणातला या घटनेचा चित्रपट झाला असता, तर असाच प्रश्न तयार झाला असता आणि तो म्हणजे कटप्पाने धनुष्यबाण क्यूं चुराया...

पूर्वीच्या राजकारणात आपल्या शत्रूला खलास करण्यासाठी एक मार्ग सर्रास वापरला जायचा आणि तो म्हणजे शत्रूच्या एका विश्वासातल्या एका मोठ्या शक्तीला लालूच दाखवून त्याला फितूर करून घ्यायचे. मग हा फितूर दरवाजा मोकळा करून द्यायचा, प्रसंगी शत्रूच्या बाजूने लढायचा किंवा आपल्या मालकाला दगाफटका करायचा. कटप्पाचे तसेच झाले होते. तो समर्पित गुलाम, खानदानी गुलाम होता. आज्ञापालन हा त्याचा धर्म होता. राजवाड्यातील समांतर शक्तीने राज्य बळकावण्यासाठी बाहुबलीची हत्या करण्याचा आदेश या गुलामाला दिला. त्याने तो पार पाडला. बाहुबली इतकाच तोही लक्षात राहिला. जसे 'शोले'त नायकांच्या जोडगोळीबरोबरच गब्बर सिंगही अधिक लक्षात राहिला.

राजकारणात दोन-तीन दशके भाजप आणि शिवसेना ही जोडगोळी हिंदुत्वाची शक्ती म्हणून वावरत होती. गळ्यात गळा घालून कधी सत्तेत तर कधी सत्तेबाहेर वावरत होती. कधी त्यांचा मुख्यमंत्री तर कधी यांचा मुख्यमंत्री असायचा. राजकारणात बिगरीमध्ये शिकणारे शेंबडे पोरही सांगू शकते, की भाजप शिवसेनेने दिलेले टॉनिक, ग्राईप बिटको, जिमची पोरं खातात ते प्रोटीन्स पद्धत शिकणे मिळवत मोठा होत होता आणि झालाही. शिवसेनेला तो एकीकडे मोठा भाऊही समजत होता आणि दुसरीकडे स्वतः त्याच्यापेक्षा मोठा बनण्याचा प्रयत्न करत होता. सत्तेच्या खेळात या




गोष्टीचा विचार कोणी शहाणा माणूस नैतिकतेचे चष्मे घालून कधी करत नसतो. राजकारण आणि नैतिकता यांचा खूप दुर्मीळ संबंध असतो. सत्ताकारणात गरज निर्माण झाली, की कोणीही निरमा पावडर घेऊन किंवा कुठलं तरी एक्स्पायर झालेलं तीर्थ घेऊन डुकरालाही स्वच्छ करायला जाईल आणि हे महत्त्वाचं राष्ट्रीय कार्य कसं आहे, हे पटवूनही देईल. तसं भाजप-शिवसेनेचं निदान दिखाव्यासाठी तरी बरं चाललं होतं. पण आत धुसफूस होतीच. विधानसभा निवडणुकीनंतर त्रिशंकू विधानसभा जन्माला आली. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने मुख्यमंत्रिपदाचा दावा केला. भाजपला तो मान्य झाला नाही. पहाटे पहाटे भाजपने राष्ट्रवादीशी मुहतूर लावला. काही तासातच पदर फाडून मोकळे होण्याची वेळ आली. त्यानंतर शिवसेनेने दोन्ही काँग्रेसशी मैत्री करून मुख्यमंत्रिपद मिळवले. भाजपच्या जिव्हारी ही गोष्ट लागली. दहा वर्षांपूर्वीच त्यांच्या कारभाऱ्याने विरोधी पक्षमुक्त भारताची घोषणा केली होती आणि इथे तर तीन-तीन शत्रू भाजपच्या थेट उरावर बसले, छाती किती इंच आहे हे न मोजताच. स्वाभाविकच भाजपच्या मनात 'बदले की आग' भडकत होती. पण हा बदला असा घ्यायचा होता, की सरकार आणि शिवसेना संपवायची होती. शिवसेना तशी सहजासहजी संपणारी गोष्ट नव्हती. कारण ती मराठी सत्ताधाऱ्यांच्या प्रयत्नांतून जन्माला आली आहे. तिला नामशेष करणे हे म्हणावे तेवढे सोपे काम नव्हते. विरोधकांना कसे संपवायचे याचे अनेक मार्ग नागपूर आणि अहमदाबादच्या प्रयोगशाळेत तयार झाले आहेत. नाईट किंगसारख्या ईडीबिडीचा वापर करून किंवा शत्रूत फूट पाडून आपलं राज्य आणण्यात भाजप अनेक ठिकाणी विजयी झाली आहे. सत्तेसाठी ती आपल्या वैचारिक शत्रूशीही तडजोड करते, हे काश्मीर, उत्तर प्रदेश, बिहार आदी अनेक राज्यांत सिद्ध झाले आहे. एकदा का राजकारण म्हणून याच्याकडे बघितलं, की यातील प्रत्येक गोष्ट पवित्र, योग्य, उचित आणि कायदेशीर वाटायला लागते. छापा टाकण्यासाठी विरोधी पक्षाचे नेतेच कसे सापडतात! सत्ताधाऱ्यांमध्ये कुणाकडेच प्रचंड संपत्ती नाही आहे का? आदी प्रश्नांना अर्थ राहत

नाही. या गोष्टी करत असताना नैतिकता, स्वायत्त संस्था आदींवर स्वतःचा ताबा मिळवावा लागतो किंवा प्रसंगी त्याला धक्का द्यावा लागतो.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आघाडीचे सरकार सत्तेवर आले तेव्हा भाजपचे वक्तृत्वपटू असलेले एक नेते हे सरकार लवकर कोसळणार आणि मी परत येणार असे सांगत होते. प्रत्यक्षात त्यांची भविष्यवाणी खरी ठरली नव्हती आणि ठाकरे सरकार एक एक वर्ष पार करत पुढे जात होते. भावी पंतप्रधान म्हणून अनेक उतावीळ नेते त्यांचा उल्लेख करत होते; पण त्याच वेळेला सरकार नव्हे तर शिवसेना खतम करण्याचे ऑपरेशन सुरू होते, हे कोणाच्याच लक्षात आले नव्हते. शिवसेना संपवायची असेल, तर बाहेरचा शत्रू उपयोगी पडत नाही, तर आतच शत्रू तयार करावा लागेल, हे कौटिल्य आणि मनुला गुरू मानणाऱ्यांना कळून चुकले होते. बघता बघता तीन वर्षे संपायला आली; पण भाजपच्या गळाला ठोस असे काही लागत नव्हते. ज्याला गळाला लावायचे त्याला भरपूर आणि ठोस काही द्यायचे होते. ते देण्याचे ठरले. स्वतःच्याच पक्षाविरुद्धचे बंड राजकीय वाटू नये म्हणून हिंदुत्वाचा आधार घेण्यात आला. शिवसेना मवाळ झाली. बाळासाहेबांचे आणि त्यांचाच शिष्य असलेल्या दिघे यांचे हिंदुत्व संपले. आता जे काही होईल ते हिंदुत्वाच्या रक्षणासाठी, असा सांगणारा शिवसेनेतलाच नेता शोधण्याचा आणि त्याला हवे ते देण्याचा निर्णय भाजपने घेतला. एक-दोन नव्हे, तर मोठ्या माशाबरोबर चाळीस मासे गुवाहाटीत तीर्थक्षेत्री दाखल झाले. सरकार पडण्यापूर्वी ठाकरे यांनी राजीनामा दिला. म्हणजे सरकार पडलेच. ही कहानी आधुनिकता सोडली, की बाहुबली चित्रपटाची तशी कमीअधिक मिळतीजुळती आहे. शेवटी समाजात जे घडत असते, तेच पडद्यावर येत असते. माणसे रस्त्यावर बसतात म्हणून 'टॉयलेट एक लव्ह स्टोरी' हा भाजपच्या लाडक्या नायकाचा म्हणजे अक्षयकुमारचा चित्रपट आला होताच आणि त्याचे बक्षीस म्हणून त्याला थेट पंतप्रधानांची मुलाखत घेण्याची संधी मिळाली होती. तिचा लाभ उठवत 'आपण आंबे खाता का' हा अतिशय गाजलेला प्रश्न न गाजलेल्या मुलाखतीत विचारला होता. तर भाजपने एका अर्थाने देवमासा पकडला आणि त्याच्या मदतीने जहाजच उलटे करण्याचा प्रयत्न केला. निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय भारतीय निवडणुकांच्या इतिहासात यापूर्वी कधीच झालेला नव्हता. शिवसेना हे नाव आणि चिन्ह वापरायलाच बंदी घातली. ज्यांच्याकडे आमदार, खासदार जास्त त्यांचा पक्ष असा या निकालाचा ढोबळ मानाने अर्थ आहे. उद्या सर्वोच्च न्यायालयात त्याचे दळण-कांडप होणारच आहे.

भाजपला देशभर पसरायचे आहे, हे काही त्याने लपवून ठेवलेलं नाही. प्रादेशिक पक्षांशी, छोट्या पक्षांशी मैत्री करायची, त्यांना सत्तेत एखादे बक्षिस द्यायचे, त्याला आपल्या आघाडीत सामील करून घ्यायचे आणि एक दिवस नामशेष करायचे. उत्तरेतल्या पासवानांचे काय झाले आणि आठवले चारोळ्या करत आम जनतेचे मनोरंजन कसे करत आहेत, हे आपण पाहतोच आहोत. भाजपकडे मायावी शक्ती आहे. जवळ करायचे आणि पुढे संपवायचे. महाराष्ट्रात शिवसेनेच्या बाबतीत तसे घडत नव्हते. कारण शिवसेनाच त्यांना सोडून गेली आणि मित्राचा विरोधक झाली. मित्राला संपवण्याचा आणि विरोधकाला संपवण्याचा मार्ग वेगळा असतो. विरोधकांना संपवण्याचा मार्ग कसाही असू शकतो. निर्दयी, अलोकशाहीवादी वाटावा असाही असू शकतो. चार-चार वेळा आमदार, दोन-दोन वेळा मंत्री झालेल्या शिंदेंना एकाएकी हिंदुत्वाच्या उचक्या कशा लागल्या, की त्या लागाव्यात म्हणून त्यांच्या शरीरातील प्राणवायू कमी करण्यात आला, हे उद्याचा काळ ठरवणार आहे.

राजकारणातील सत्ता म्हणजे गाभुळलेली चिंच असते. कुणाच्याही तोंडाला, कुणाच्याही झाडावरच्या चिंचा बघून पाणी सुटत असते. आपल्या देशात यापूर्वी औटघटकेचे अनेक मुख्यमंत्री आणि पंतप्रधान होऊन गेले आहेत. नावे सांगण्याचे कारण नाही. कारण ही औटघटकाच तेव्हाच्या नेत्यांना दीर्घ वाटत होती. चिंचा प्रत्यक्ष नाही का मिळेनात; पण त्या पाहून आणि प्रसंगी त्यांचे नाव उच्चारूनही लाळ गाळता येते, असे सांगणारे काही कमी नाहीत. सत्तेचा मोह वाटेल ते करायला भाग पाडतो. पुढून, मागून कुठूनही वार करायला लावतो. आपले राजकारण सारे अशाच घटनेने भरलेले आहे, ही खरी चिंताजनक गोष्ट आहे. ज्या चाळीस जणांनी गुवाहाटीला जाणे पसंत केले, त्यांनी आपल्याला निवडून दिलेल्या मतदारांना विश्वासात घेतले होते काय? एक विश्वासघातकी डाव मांडू का, असे भाजपने महाराष्ट्राला विचारले होते का आणि पहाटे शपथ घेणाऱ्यांनी तर हा मार्ग अवलंबला होता का? इतके हिडीस, इतके अविश्वासू, इतके खालच्या स्तरावरचे राजकारण फुले, शाहू, आंबेडकर यांच्या महाराष्ट्राने कधी पाहिले नव्हते आणि शेपूट घालून मुकाट पाहणारा मतदारही कधी पाहिला नव्हता.

शिवसेनेने शिंदेंना भरमसाठ सत्ता दिली होती आणि बाहुबलीतील अमरेंद्रने कटप्पाला स्वरक्षणासाठी तलवार दिली होती. शिंदेंनी भाजपचे आज्ञापालन केले आणि स्वतःला मिळवलेली सत्ता स्वतःच्या पक्षावरच उलटवली. कटप्पाने ती राजाच्या पाटी-पोटात भोसकली. या सर्वांच्या मागे एकच कारण होते, ते म्हणजे सत्ता. कटप्पाच्या मागे अशीच वृत्ती होती. शिंदे यांचा भविष्यकाळ कोणी काही म्हटले तरी भाजपच्या मुठीत बंद आहे. उद्या सरकार पडले किंवा दोन वर्षांनी पराभूत झाले, तर शिंदे यांचे काय होणार हा एक गंभीर प्रश्न आहे. तो त्यांच्याही मनात असेलच. एक तर हे चाळीस-पन्नास सहकारी घेऊन त्यांना भाजपमध्ये भरती व्हावे लागेल किंवा पोटापाण्यासाठी अन्य कोणता तरी मार्ग स्वीकारावा लागेल. सत्तासंघर्षात एक गोष्ट कायम घडत आली आहे आणि ती म्हणजे एखाद्याला फितूर करून पहिल्यांदा शत्रूचा काटा काढायचा आणि फितूर मोठा होऊ नये म्हणून त्याचाही काटा काढायचा. आपण सर्वजण हे मान्य करत आलो आणि राजकारणात कधीही काहीही घडू शकते, हे वचन पाठ करत आलो. पाहुण्याने यजमानाचे घर बळकावणे काय, राजाची तलवार राजाच्या पाठीत खुपसणे काय, सगळे सारखेच असते. एवढे सगळे वाचूनही काहीजण प्रश्न विचारतच राहतील, की कटप्पाने धनुष्यबाण क्यूं चुराया... अर्थात, या प्रश्नाचे उत्तर ऐकण्यासाठीही राजकारणाचा दुसरा अध्याय येण्याची वाट पहावी लागणार आहे. कारण राजकारणाला शेवट नसतो आणि इतिहासाच्या पुस्तकालाही शेवटचे पान नसते. ●●●

# निवडणूक आयोगाचा पक्षपाती निर्णय



अनंत बागाईतकर

**निवडणूक आयोग ही एक प्रमुख घटनात्मक संस्था आहे आणि त्यामुळेच तिचे कामकाज हे नि:पक्ष, न्याय्य व कायदेसुसंगत अपेक्षित असते. मात्र त्यांनी केलेला हा ताजा निर्णय केवळ पक्षपातीच नाही, तर कायदेसुसंगत असण्यापेक्षा राजकारणाशी सुसंगत आणि विशिष्ट राजकीय पक्षांना लाभदायक ठरेल असा आहे. घटानात्मक संस्था असलेल्या निवडणूक आयोगाकडून अशा राजकीय निर्णयाची अपेक्षा नाही.**

निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि आणि मूळ शिवसेना पक्षाचे चिन्ह धनुष्यबाण एकनाथ शिंदे यांच्या फुटीर गटाला बहाल करण्याचा निर्णय जाहीर केला. आयोगाने गेल्या काही वर्षात केंद्र सरकार आणि सरकारपेक्षा केंद्रातील सत्ताधाऱ्यांना धार्जिणे निर्णय करण्याचा जो सपाटा लावला आहे, त्याच मालिकेतला हा निर्णय आहे. घटनात्मक संस्था आणि राज्यघटनेचे पाठबळ असलेली स्वायत्तता खुंटीवर टांगून सत्ताधाऱ्यांचे लांगूलचालन करीत लोचट निर्णय करण्याची जी अनिष्ट परंपरा गेल्या नऊ वर्षात सुरू झालेली आहे, त्याच प्रकारातील हा निर्णय आहे. पक्षांतरबंदी कायद्याचा आपल्या मनाला वाटेल तो अर्थ लावण्याची जी पद्धत या नऊ वर्षांत सुरु करण्यात आली आहे ती अवर्णनीय आहे. म्हणजेच प्रस्थापित कायद्याचा आपल्याला हवा तो अनुकूल किंवा आपल्याला सोयीस्कर आणि धार्जिणा असलेला अर्थ लावून त्या आधारे मनाला येतील ते मनमानी निर्णय करण्याचे हे कोडगे प्रकार आहेत. त्यामुळे अशा पक्षपातपूर्ण निवडणूक आयोगाकडून नि:पक्ष निर्णयांची कधीच अपेक्षा नव्हती आणि त्यांनीही त्यांच्या मनोवृत्तीला जागून अपेक्षाभंग केला नाही.

वर उल्लेख केल्याप्रमाणे निवडणूक आयोग ही एक प्रमुख घटनात्मक संस्था आहे आणि त्यामुळेच तिचे कामकाज हे नि:पक्ष, न्याय्य व कायदेसुसंगत अपेक्षित असते. मात्र त्यांनी केलेला हा ताजा निर्णय केवळ पक्षपातीच नाही, तर कायदेसुसंगत असण्यापेक्षा राजकारणाशी सुसंगत आणि विशिष्ट राजकीय पक्षांना लाभदायक ठरेल असा आहे. घटानात्मक संस्था असलेल्या निवडणूक आयोगाकडून अशा राजकीय निर्णयाची अपेक्षा नाही.

**त्यामुळेच हा निर्णय अशास्त्रीय आणि बेकायदेशीर!**

हा निर्णय करताना निवडणूक आयोगाने केवळ एकमेव निकष आधारभूत मानलेला आहे. हा निकष म्हणजे मूळ किंवा अविभाजित शिवसेना पक्षाच्या विधिमंडळ पक्षात झालेली फूट हा आहे. अविभाजित विधिमंडळ शिवसेनेच्या बहुसंख्य आमदारांनी फुटीर नेते एकनाथ शिंदे यांना साथ दिली. त्यातून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली फुटीर आमदारांचा गट स्थापन झाला. भाजपने या गटाला पाठिंबा देऊन मुख्यमंत्रीपद एकनाथ शिंदे या फुटीर नेत्याकडे सोपविले. थोडक्यात, केवळ विधिमंडळ शिवसेना पक्षातील फूट प्रमाण किंवा आधारभूत मानून शिवसेना हे पक्षाचे मूळ नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह या फुटीर गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने केला. हा निर्णय कायदेसुसंगत किंवा तंत्रशुध्द नाही. याचे कारण पक्षांतरबंदी कायद्यानुसार फूट ही केवळ विधिमंडळ किंवा संसदीय गटात पडणे पुरेसे नाही. त्याचे प्रतिबिंब मूळ किंवा मुख्य पक्षात व संघटनेत पडलेले असणे आवश्यक असते. हा निकष सर्वाधिक महत्त्वाचा मानला गेलेला आहे. याचे कारण लोकप्रतिनिधींच्या घोडेबाजाराच्या ज्या काही कथा आतापर्यंत घडलेल्या आहेत, त्या लक्षात घेऊनच हा निकष (मुख्य पक्षात व पक्षसंघटनेतील फूट) निर्णायक मानला गेलेला आहे. दुर्दैवाने आतापर्यंतच्या अनेक निर्णयांत या निकषाकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्यात आले आणि राजकीय हेतूने प्रेरित निर्णय केले गेले. शिवसेनेच्या या फूटप्रकरणीदेखील उद्धव ठाकरे



गट व एकनाथ शिंदे यांचा गट या दोन्ही गटांतर्फे त्यांच्या समर्थकांची प्रतिज्ञापत्रे दाखल करण्यात आली होती. उध्दव गटाने बावीस लाख तर शिंदे गटाने पाच लाख प्रतिज्ञापत्रे दाखल केली. निवडणूक आय़ोगाने वेळ नसल्याचे कारण सांगून त्यांची दखल घेण्याचे नाकारले. त्यामुळेच हा निर्णय अशास्त्रीय आणि बेकायदेशीर ठरतो. पक्षांतरबंदी कायद्याचा जो शास्त्रशुध्द अर्थ लावणे आणि त्याआधारे एखाद्या राजकीय पक्षात खरोखर फूट पडलेली आहे किंवा नाही याचा निर्णय केला जाणे अपेक्षित असताना, काही प्रकरणांमध्ये निवडणूक आयोगाप्रमाणेच सर्वोच्च न्यायालयानेही लोकांचा अपेक्षाभंग केलेला आढळतो. आता निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरुध्द उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे आणि हा निर्णय मूळच्या पक्षांतर बंदी कायद्यानुसार किंवा त्याच्याशी सुसंगत आहे की नाही याची पडताळणी शास्त्रशुध्द व निःपक्षपणे करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आलेली आहे. यामुळेच बहुधा शिंदे गटाने कॅव्हेट दाखल करून या प्रकरणी त्यांचे म्हणणेदेखील न्यायालयाने ऐकून घ्यावे, अशी मागणी केली आहे. आता हे प्रकरण निवडणूक आयोगाच्या अधिकारातील आहे हे सांगून सर्वोच्च न्यायालयानेदेखील हात झटकले, तर या देशातील न्याय मिळण्याची प्रक्रियाच थांबली, असे मानावे लागेल. याचे कारण एखाद्या घटनात्मक संस्थेने एखाद्या कायद्याचा चुकीचा अर्थ लावून निर्णय केला तर त्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालय संबंधित निर्णय हा घटना व कायदेसुसंगत नसल्याचा निर्णय देऊ शकते व तो त्यांचा अधिकार आहे. याचे कारण राज्यघटनेतील सत्ताविभाजनाच्या तत्त्वानुसार कायद्यांचा अर्थ लावणे आणि संसदेने केलेले कायदे राज्यघटनेतील तत्त्वांशी सुसंगत आहेत की नाहीत, याचा निर्णय करण्याचा अधिकार न्यायसंस्थेला देण्यात आलेला आहे. त्यामुळेच या प्रकरणात अजूनही थोडीफार आशा जिवंत आहे, असे म्हणण्यास जागा आहे.

या निर्णयात आणखीही एक कायदेशीर त्रुटी दाखविता येते. अविभाजित शिवसेनेचे संघटनात्मक स्वरुप किंवा रचना कशी आहे, ती लोकशाहीवादी आहे की बिगर लोकशाहीवादी आहे, त्यांची वैचारिक बैठक काय आहे या बाबी पक्षातील फुटीचा निर्णय करण्याच्या दृष्टीने गैरलागू आहेत. हे निकष आधारभूत मानायचे ठरविल्यास या देशात अनेक एकचालकानुवर्तीत्व आधारित पक्ष आहेत, जेथे नेत्याचा शब्द अंतिम मानण्याची पद्धत अंगिकारली जात असते. असे पक्ष लोकशाही प्रक्रियेचे पालन झाल्याचा यशस्वी देखावा निर्माण करीत असतात. पण प्रत्यक्षातील त्यांचे स्वरुप हे एकाधिकारवादीच असते, ही बाब या देशातला सर्वसामान्य माणूसदेखील पुरेपूर जाणतो. त्यामुळेच पक्षसंघटनेशी संबंधित अत्यंत तकलादू मुद्यांच्या आधारे निवडणूक आयोगाने या फुटीचा निर्णय करण्याचा अनुचित प्रकार केला आहे. मुळात या मुद्यांशी निवडणूक आयोग संबंधित नाही, असे मत काही कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. म्हणूनच हा निर्णय अनुचित अशा गृहीत गोष्टींवर आधारित व चुकीचा आहे, असे या तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

**'हिंदुत्वाची मक्तेदारी' हेच भाजपचे मूळ उद्दिष्ट**

या निर्णयाच्या कायदेशीर अंगाबाबत आणखीही तपशीलात जाऊन चर्चा करणे शक्य आहे. या बाबी निवडणूक आयोगाला माहीत नाहीत, असे मानणेदेखील चुकीचे ठरेल. त्यांच्याजवळही कायदेतज्ज्ञांचा मोठा फौजफाटा असतो; परंतु जेव्हा निर्णय हे राजकीय आडाखे आणि लागेबांधे यांच्यावर आधारित करायचे असतात, तेव्हा कायदेशीर बाबींकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले जाते. या निर्णयामागे कायद्यापेक्षा राजकारण वरचढ आहे. एक बाब लक्षात घ्यावी लागेल, की हा निर्णय निवडणूक आयोगाने तत्काळ केला नाही. फुटीनंतर अनेक महिन्यांनी त्यांनी तो केला. असे का केले हा प्रश्न यातून स्वाभाविकपणे निर्माण होतो. चाळीस फुटीर आमदारांच्या गटाला पुढे करून म्हणजेच मुख्यमंत्रीपद देऊन महाराष्ट्राची सत्ता काबीज करण्यात भाजपने या निमित्ताने यश मिळविले. हे करण्यामागे भाजपची अनेक राजकीय उद्दिष्टे आहेत. सर्वप्रथम उद्दिष्ट म्हणजे महाराष्ट्रात हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व करणारी दुसरी शक्ती अस्तित्वात राहू न देणे. हिंदुत्ववादी शक्ती म्हणून हिंदुत्वाची मक्तेदारी आपल्याकडे राहिली पाहिजे, हे भाजपचे मूळ उद्दिष्ट आहे. अगदी बाळासाहेब ठाकरे हयात असल्यापासूनची ही भाजपच्या मनातली सुप्त इच्छा-आकांक्षा व महत्त्वाकांक्षा राहिलेली आहे. ही झाली एक वैचारिक बाब. आता हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व करणारी ही शक्ती संपवायची असल्यास व्यावहारिक राजकारणाचे मार्ग वापरूनच ही शक्ती खच्ची करण्याचे उद्दिष्ट पाठोपाठ येते. त्याची सुरुवात भाजपने पद्धतशीरपणे गेल्या विधानसभा निवडणुकीपासून सुरू केली होती. आधी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदाची लालूच दाखवून मागाहून त्यावर माघार घेणे ही राजकीय चाल खेळली गेली. परिणामी शिवसेना भाजपपासून दूर जाणे सहजच अपेक्षित होते; परंतु या ठिकाणी शिवसेना आपल्याला सोडून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर जाईल, हे भाजपला अनपेक्षित होते. तसे घडल्याने चवताळलेल्या भाजपने हे सरकार टिकणार नाही यासाठी प्रयत्न सुरू केले. उद्धव ठाकरे आपल्याला मुख्यमंत्री करतील या आशेने त्यांच्याबरोबर राहिलेल्या अतिमहत्त्वाकांक्षी व अतिलोभी एकनाथ शिंदे यांची राजकीय हाव भाजपला हेरण्यास वेळ लागला नाही आणि योग्य वेळी त्यांनी शिंदे यांना फोडले. त्याचप्रमाणे ठरलेल्या योजनेप्रमाणे मुख्यमंत्रीपददेखील त्यांना दिले. असे करून उद्धव ठाकरे यांना खिजविणे तसेच मुख्यमंत्रीपद देण्याचे आश्वासन भाजपने न पाळण्याचा उद्धव ठाकरे यांचा दावा खोटा ठरविणे, असे अनेक पत्ते भाजपने एकाचवेळी खेळले. त्याचबरोबर शिंदे यांना मुख्यमंत्री केल्यानंतर शिवसेना पक्षसंघटनादेखील शिंदे यांच्या मागोमाग येईल, असा होरा भाजपचा होता. त्यात त्यांना पूर्ण यश मिळू शकले नाही. आजही संघटनेच्या पातळीवर उद्धव ठाकरे यांचा वरचष्मा कायम राहिलेला आहे. त्यामुळेच फुटीवर शिक्कामोर्तब करण्यासाठी विलंब लावण्यामागे हेदेखील एक कारण होते. पक्षसंघटनेत फूट पडत नसल्याने आता शेवटचा अगतिक किंवा निरुपायाने केलेला निर्णय म्हणून पक्षाचे अधिकृत नाव व चिन्ह शिंदे गटाला देण्यात आले. किमान या निर्णयामुळे संघटनात्मक पातळीवरही शिंदे गटाकडे कार्यकर्त्यांचा ओघ चालू होईल, ही अपेक्षाही यामागे आहे.

**भाजपला मुंबई महापालिका ताब्यात घ्यायची आहे!**

या राजकीय हेतूंमध्ये भाजपच्या अंतःस्थ म्हणजेच गुप्त हेतूंचा समावेश होतो. किंबहुना महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीचा भाजप-

लाच जास्तीत जास्त लाभ कसा मिळेल, हेच प्रामुख्याने विचारात घेऊन हा निर्णय केला गेला आहे. शिवसेना तोडल्याने शिवसेनेच्या मतांची विभागणी आणि त्यातील फुटीर गटाला जवळ केल्याने त्यांना मिळणाऱ्या मतांचा लाभ भाजपला होणार आहे. तसेच फुटिरांचा गट सर्वस्वी भाजपवरच अवलंबून असल्याने भाजपच्या मनात येईल त्यावेळी ते या फुटीर गटाला वाऱ्यावर सोडून देऊ शकतात. या फुटिरांची गरज संपली, की त्यांना टाकाऊ वस्तूप्रमाणे टाकून देण्यात येईल. हा राजकीय इतिहास आहे. तसेच फुटीर गटाचे भाजपवरील परावलंबित्व एवढे आहे, की भाजपने साथ सोडताच त्यांची स्थिती अत्यंत असहाय्य व निराधार होणार आहे. किंबहुना त्यांच्या अस्तित्वालाच यामुळे सुरुंग लागणार आहे. त्यामुळे या फुटिरांमार्फत मूळच्या शिवसेनेचा छळ करीत राहणे, मूळच्या पक्षाचे वेळोवेळी जमेल त्याप्रमाणे लचके तोडत राहणे ही भाजपची योजना व मनसुबे आहेत. महाराष्ट्रातील महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या घोषणा होऊनही त्यांची तारीख अद्याप ठरविण्यात आलेली नव्हती. कदाचित आता पक्ष व चिन्हाचा निर्णय झाल्यामुळे मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे या व इतर महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर होऊ शकतात. त्यानिमित्तानेही मूळच्या शिवसेनेचे आणखी काही लचके तोडता येतील काय हे पाहिले जाईल. भाजपला मुंबई महानगरपालिकेवर ताबा मिळवायचा आहे. ही त्यांची अनेक वर्षांपासूनची इच्छा आहे; परंतु ती फलद्रूप झालेली नसल्याने हे निमित्त करून भाजपला मुंबई महापालिका ताब्यात घ्यायची आहे. आपली ही महत्त्वाकांक्षा प्रत्यक्षात उतरविण्यासाठी भाजपने प्रयत्नही सुरू केले आहेत. देशाचे पंतप्रधान मुंबईतील मेट्रो प्रकल्पाच्या एका लहानशा टप्प्याचेही उद्धाटन करतात व वारंवार मुंबईला भेट देऊ लागले आहेत, ही सर्व लक्षणे मुंबई महानगरपालिकेवर कब्जा मिळविण्यासाठी सुरू केलेल्या धडपडीचीच आहेत. मुंबई महापालिका ताब्यात घेण्याच्या लालसेने भाजपला पछाडून टाकलेले आहे, हे वास्तव आहे. मुंबई आणि महाराष्ट्राबद्दल फारशी आपुलकी नसलेल्या सत्ताधाऱ्यांना मुंबईचे अजूनही कमी होत नसलेले महत्त्व बोचते आहे. मुंबईचा आर्थिक राजधानीचा दर्जा कमी करण्यासाठी त्यांचे आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मुंबई महाराष्ट्राला मिळाल्याची सल बाळगणारे राज्यकर्ते असल्यानेच मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचे आणि ते करता न आल्यास तिचे महत्त्व पद्धतशीरपणे खलास करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी मुंबई महापालिकेवर कब्जा मिळविण्यासाठी सत्ताधाऱ्यांची धडपड सुरू आहे.

ही मंडळी स्वतःच्या सोयीसाठी पक्षांतरबंदी कायद्याची वासलात लावत आहेत. अनुचित पध्दतीने शिवसेना हे नाव व त्यांचे निवडणूक पक्षचिन्ह (धनुष्यबाण) फुटीर गटाला देण्याचा निर्णय केल्यानंतर ते उद्धव गटाच्या उर्वरित सोळा आमदारांना पक्षादेश म्हणजेच व्हिप जारी करू शकतात आणि त्यांनी तो पाळला नाही, तर त्यांचे सदस्यत्व म्हणजेच आमदारकी रद्द करण्याचा डाव खेळू शकतात. तेवढ्या खालच्या थराला जाणारी भाजपची संस्कृती निश्चितच आहे. प्रश्न एवढाच निर्माण होतो, की एवढा खुनशीपणा केला तरी त्यामुळे या प्रकरणामधील कोर्टबाजी संपणार नाही. ती आणखीनच किचकट होऊ शकते. त्यामुळे त्यातून राजकीय पेच अधिक चिघळत जाईल. यातूनच राज्याची वाटचाल राजकीय अस्थिरतेकडे होऊ शकते आणि त्यातूनच राज्यात मध्यावधी निवडणुकांची अटळता वाढू शकते. यात कायदेशीर गुंतागुंत होणार आहे. कारण निवडणूक आयोगानेच प्रथम दोन वेगवेगळे गट मान्य करून त्यांना नावे व चिन्हे वेगवेगळी दिलेली असताना आता केवळ एका गटाला अधिकृत नाव व चिन्ह दिल्याने लगेचच त्यांचा व्हिप उर्वरित गटाला लागू होऊ शकतो काय असा नवा पेच निर्माण होऊ शकतो व त्यास आव्हान दिले जाऊ शकते. फार तर उद्धव गटाच्या आमदारांना सभागृहातील कामकाजात भाग घेण्यास प्रतिबंध करण्याची चालही खेळली जाऊ शकते. या सर्व शक्यतांचा सारांश एवढाच आहे, की भाजप आणि भाजपचे मांडलिकत्व पत्करलेल्या फुटीर शिवसेना गटाने महाराष्ट्राचे राजकारण अत्यंत खालच्या व हीन पातळीवर नेले आहे. महाराष्ट्रातील सुजाण जनता त्याची दखल घेतल्याखेरीज राहणार नाही.

**अल्पसंख्याक गटाला बहुसंख्याक गटाचा पाठिंबा**

शिवसेनेतील फुटिरांना हाताशी धरून भाजपने महाराष्ट्रात सत्ताबदल केला आहे. ही एक अनैसर्गिक युती आहे. कारण अल्पसंख्याक (शिंदे) गटाला बहुसंख्याक (भाजप) गटाचा पाठिंबा आहे. हा प्रकार घोड्यापुढे गाडी लावण्यासारखा आहे. एकेकाळी चंद्रशेखर यांच्या चाळीस खासदारांच्या गटाला काँग्रेसच्या दोनशे खासदारांच्या पक्षाने पाठिंबा दिला होता. ते सरकार अल्पजीवी ठरले होते आणि देशाला मध्यावधी निवडणुकांना सामोरे जावे लागले होते. तसाच काहीसा प्रकार महाराष्ट्रात सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा काय निर्णय होतो, याकडेही लक्ष ठेवावे लागेल. सर्वोच्च न्यायालयाने पक्षांतरबंदी कायद्यानुसार निवडणूक आयोगाने निवाडा केला नसल्याचा निर्णय दिल्यास पेचप्रसंगाची स्थिती उद्‌भवल्याखेरीज राहणार नाही. निवडणूक आयोगाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने उचित ठरविल्यास तो विजय फुटिरांचा नसून भाजपचा असेल. कारण त्यामुळे फुटिरांचे परावलंबित्व भाजपच्या मांडलिकत्वात परिवर्तीत होईल. यानंतर भाजप या फुटिरांना गिळंकृत करण्याचा प्रयत्न करील आणि कागदावर का होईना शिवसेना (नाव व चिन्ह मिळविलेला फुटीर गट) संपविण्याचा प्रयत्न करणे भाजपला शक्य होईल. ही परिस्थिती पाहता यापूर्वीही वर्तविलेल्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीबरोबरच विधानसभेच्याही निवडणुका होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनीदेखील ही शक्यता त्यांच्या ताज्या पत्रकार परिषदेत व्यक्त केली आहे. त्याची काहीशी चुणूक हे सरकार सादर करणाऱ्या आगामी अर्थसंकल्पावरून येऊ शकेल. कारण लोकसभेबरोबरच विधानसभा निवडणुका घ्यायच्या असतील, तर पुढील वर्षीचा अर्थसंकल्प सरकारला सादर करता येणार नाही. आता सादर होणारा अर्थसंकल्पच अखेरचा असेल. त्यामुळे या अर्थसंकल्पात लोकांवर सवलतींची खैरात असल्यास लोकसभेबरोबरच विधानसभा निवडणुका घेण्याची तयारी या सरकारने केल्याचे अनुमान काढता येईल. थोडक्यात, विविध अशा अनुचित निर्णयांमुळे महाराष्ट्राची वाटचाल अनिश्चितता व अस्थिरतेकडे होऊ लागली आहे. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक आहेत.)**

# 'ठाकरे' संस्थान खालसा?



संजय पवार

**सहानुभूतीचे कितीही सर्व्हे आले, तरी मूळ स्वभाव व राजकारण बदलले नाही तर ठाकरे नावाचं जे संस्थान आहे त्यातून आयोगाने ठाकरे घराणं खालसा केलंच आहे, ते जनतेमधून पुन्हा उभारायचं तर चाल, चलन व राजकीय चारित्र्य बदलावं लागेल. अन्यथा इतिहासाच्या पानात विराजमान व्हायची तयारी ठेवावी लागेल.**

भारतीय निवडणूक आयोगाने बाळ ठाकरे म्हणजेच 'प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे यांच्या व्यंगचित्रकार मुलाने स्थापन केलेल्या व स्वत: प्रबोधनकारांनी ज्या संघटनेचे नामकरण 'शिवसेना' असं केलं होतं, त्या संघटनेचं नाव, निशाण व ध्वज हे बाळ केशव ठाकरे तथा बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र व सद्यकालीन शिवसेना पक्षाध्यक्ष उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून काढून घेऊन ते त्यांच्याच पक्षातील बंडखोरांचे नेते आमदार एकनाथ संभाजीराव शिंदे व त्यांच्या सोबतीने पक्षात उठाव करून थेट पक्षावरच दावा सांगणाऱ्या ४० आमदार व १३ खासदारांसह अनेक नगरसेवक, जि.प./ग्रा.पं. सदस्य व शिवसैनिक ज्यांना निवडणूक आयोगाने 'बाळासाहेबांची शिवसेना' असं तात्पुरते नाव बहाल केलं होतं, त्यांना सध्या तरी पक्षाचे मूळ नाव शिवसेना व धनुष्यबाण हे चिन्हही दिलंय!

आयोगाने शिवसेना या संघटनेवरचा उद्धव ठाकरेंचा हक्क अमान्य करून उद्धव ठाकरे यांचे जवळपास पन्नास वर्षांचे वडिलोपार्जित राजकीय संस्थानच खालसा केले असे म्हणता येईल. ठाकरे व शिवसेना हे अद्वैतच मोडून काढलंय.

**तेलही गेले, तूपही गेले!**

उद्धव ठाकरे यांच्या राजकीय कारकीर्दीच्या अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहिला असून, ते यापुढे या परिस्थितीला कसे सामोरे जातात, हाताळतात व जनतेच्या पाठिंब्यावर आपलं राजकीय पुनर्वसन करू शकतील का, असे प्रश्न उभे राहिलेत. तसं जर ते करू शकले तर आयोगाने जे हिरावून घेतलंय ते जनतेकडून पुन्हा मिळवू शकतात. पण त्यानंतरही शिवसेना नाव, धनुष्यबाण हे निशाण हे त्यांना मिळण्याची शक्यता कमीच.

उद्धव ठाकरे आयोगाविरोधात सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत. तिथे या आधीच संविधानिकदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे याच मुद्याला समांतर खटले चालू आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या आधीच निवडणूक आयोगाची पक्ष नाव व चिन्ह याबाबतीतील स्वायत्तता मान्य केलीय. त्यामुळेच याचिका दाखल करून घेतलीय व सुनावणीही होणार; पण तोवर आयोगाने निर्णयास स्थगिती द्यायला



नकार दिलाय.

सर्वोच्च न्यायालयासमोर विधिमंडळ, अध्यक्ष, उपाध्यक्ष, गटनेता, प्रतोद, राज्यपालांचे अधिकार व संविधानाची असंख्य कलमे यावर खल चालला असून पक्षावर दावा केलेल्या शिंदे व इतर यांच्या अपात्रतेचा, पर्यायाने नवे सरकार, नवे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, प्रतोद यांच्याही भवितव्याचा प्रश्न

न्यायालयाच्या निकालावर अवलंबून आहे. जर समजा तो विद्यमान सरकारविरोधात गेला, तर आयोग आपला निर्णय बदलेल, की मधल्या काळात जसं पक्षनाम व चिन्ह गोठवलं होतं तसं गोठवेल?

तसं झालं तर उद्धव ठाकरेंना गड आला पण सिंह गेला असं म्हणता येईल. पण कोर्टाचाही अंतिम निकाल विरोधात गेला, तर त्यांना तेलही गेले, तूपही गेले, हाती आले धुपाटणे किंवा तेही नाही, असे म्हणत कोरी पाटी हाती घ्यावी लागेल!

सद्यःस्थितीत आयोग व न्यायालयाने उद्धव ठाकरे यांना मधल्या काळात दिलेले उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना हे लांबलचक पक्षनाम व मशाल हे चिन्ह कायम ठेवलंय. पक्षनाम व चिन्ह यासाठी उद्धवजींना पुन्हा आयोगाकडे जावेच लागणार आहे. थोडक्यात, उद्धव ठाकरेंची सध्या लाक्षागृहातील पांडवांसारखी अवस्था झालीय.

या सर्व घडामोडींवर अनेक राजकीय विश्लेषक, विविध अंदाज चाचणी घेणारे असं नोंदवताहेत, की सामान्य जनता, मतदार यांची सहानुभूती मोठ्या प्रमाणावर उद्धव ठाकरेंच्या बाजूने आहे. कारण शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांचे दावे काहीही असले, तरी बाळासाहेब ठाकरेंनी रक्त, घाम ओतून व असंख्य आव्हांनाचा सामना करत, प्रसंगी तडजोड करत महाराष्ट्रात विशेषत: मुंबईत मराठी माणसाचा बाणा व कणा ताठ ठेवणाऱ्या शिवसेना नामक चार जादुई अक्षरांच्या संघटनेचा कोर्टकचेऱ्या करून त्याला जोडून येणारी ठाकरे नावाची ऐतिहासिक ओळखच पुसून टाकण्याची ही तथाकथित राजकीय खेळी सर्वसामान्य सेना मतदार, ठाकरेंचा कडवट सैनिक यांना पटलेली नाही. शिवाय ही खेळी भाजपच्या मदतीने करून ठाकरे घराणं सत्तेवरून पायउतार करत आपण सत्ताधीश व्हावं, या शिंदेंच्या बंडाला जनतेचा पाठिंबा किती हे निवडणुकीतूनच कळेल. तोवर उद्धवजीही सहानुभूती आपल्याला आहे या राजकीय अंदाजपंचेगिरीवर पुढील लढाईसाठी किमान बळ गोळा करू शकतात.

यात सर्वात लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे, की उद्धव ठाकरेंना मिळणारी सहानुभूती त्यांच्या आजवरच्या कार्यकृतीला १०% आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यकृतीला व स्मृतीला ९०% किंवा त्याहून जास्तच असावी!

**शिवसैनिक बदल पचवत होते**

बाळासाहेबांच्या हयातीतच उद्धव ठाकरे यांच्याकडे शिवसेनेची धुरा अधिकृतपणे आली. पण जनसामान्य व लाखो शिवसैनिक त्यावेळी प्रतिबाळासाहेब वाटणाऱ्या, दिसणाऱ्या, खास ठाकरी शैलीत बोलणाऱ्या आणि विद्यार्थी सेनेपासून सेनेत कार्यरत राज ठाकरे यांनाच बाळासाहेबांचा नैसर्गिक वारस मानत होते. पण जेव्हा निर्णयाची वेळ आली तेव्हा बाळासाहेबांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांकडूनच व राज ठाकरे यांनाच अनुमोदन द्यायला लावून उद्धवची आपला उत्तराधिकारी म्हणून निवड केली. निवड होत असताना मात्र बाळासाहेब अनुपस्थित होते. त्यांना आल्यावर निर्णय सांगताच ते चिडले! म्हणाले, माझ्या अपरोक्ष निर्णय होतो? उद्या माझ्यावर घराणेशाहीचा आरोप झाला तर? हा निर्णय तुम्ही घेतलाय, तुम्हाला मान्य आहे ना? नसेल तर आत्ताच सांगा, वगैरे नाट्यपूर्ण घटना घडली वा घडवली; पण राज ठाकरे यांना जो मिळायचा तो संदेश मिळाला. पुढे त्याची परिणती बाळासाहेबांच्या हयातीतच राज यांनी मनसेची स्थापना व पहिल्याच फटक्यात १३ आमदार स्वबळावर निवडून आणण्यात झाली.

बाळासाहेबांच्या हयातीतच व ते सक्रिय असतानाच छगन भुजबळांनी बंड केलं. पुढे उद्धव कार्याध्यक्ष झाल्यावर मात्र सेनेची कार्यशैली बदलली. त्या नव्या शैलीमुळेच नारायण राणे, गणेश नाईक व नंतर राज ठाकरेंनी सेना सोडली. पहिल्या युती सरकारच्या काळात मातोश्रीवर समांतर सत्ताकेंद्र झालेल्या स्मिता ठाकरे यांनासुध्दा उद्धव ठाकरेंनी बाहेरचा रस्ता दाखवला.

बाळासाहेब सक्रिय नव्हते; पण ते मातोश्रीत होते. भेटीगाठी होत. पुढे वयोमानपरत्वे त्यांच्या तब्येतीच्या तक्रारी वाढल्यावर मात्र त्यांच्या भेटीगाठी, वार्तालाप यावर आपोआपच निर्बंध पडले वा ते सकारण घातले गेले. इथूनच उद्धव ठाकरेंच्या दरबारी राजकारणाची सुरुवात झाली. बाळासाहेब त्यांच्या सक्रिय काळात नेते, कार्यकर्ते, सैनिक यांच्या कायम संपर्कात. मग ते सेनाभवन असो, की मातोश्री!

उद्धव ठाकरेंची कारकीर्द सुरू झाली तीच मुळी सेनेची राडेबाज प्रतिमा बदलत. त्यांच्या भेटीगाठी मर्यादित. लॅन्डलाईन फोन सचिव नार्वेकरांच्या ताब्यात. नंतर मोबाईल येऊनही उद्धवजी नॉट रिचेबल असायचे. अगदी पक्षातील व मित्रपक्षातील ज्येष्ठ नेते, पत्रकार यांच्यासाठीही!


तरीही बाळासाहेब हयात असताना, साहेब आहेत या जाणिवेनेच शिवसैनिक बदलती सेना पचवून घेत होता. अगदी नेतेही शाळकरी वेषात पाहिलेल्या उद्धवला 'उध्दवजी' असे संबोधू लागले. काहींनी तर पायलागूपर्यंत मखलाशी करून पाहिली. पण संवाद, समन्वय यांचा अभाव चढत्या भाजणीत वाढत राहिला. पुत्र आदित्यचं तर बाळासाहेबांच्या साक्षीनेच शिवतीर्थावरच लोकार्पण झालं होतं! नंतर 'वहिनी साहेबांचं' महत्त्वही वाढत गेलं. कायम रस्त्यावर लढणाऱ्या सेनेत किचन कॅबिनेट तयार झालं. तरीही साहेब आहेत या श्रद्धेने सैनिक मातोश्रीवर येत राहिले, भेट मिळो वा ना मिळो!

जोवर बाळासाहेब सदेह मातोश्रीवर होते, तोवर कार्याध्यक्षांच्या निर्णयांना बाळासाहेबांची संमती वा मान्यता आहे, असंच गृहीत धरलं जात होतं. पण वस्तुस्थिती तशी नव्हती, हेही अनेक ज्येष्ठ नेत्यांसह सामान्य सैनिकांपर्यंतही विविध मार्गांनी पोहचत होतं. पण कडवट शिवसैनिकांसाठी स्वत:चे आईबाप वा परमेश्वरापेक्षाही 'साहेब' हेच दैवत असल्याने ते सर्व बदल पचवत होते आणि अखेर नोव्हेंबर २०१२ मध्ये साहेब गेले आणि निष्ठावान, कडवट सैनिक पोरका झाला. बाळासाहेब ठाकरेंचे राजकारण, कार्यशैली, विचार, हिंदुहृदयसम्राट म्हणून बिरूदावली मिळाल्यावर मुसलमानांविषयीची त्यांची मते, भाषा यांचा एक मोठा चाहता वर्ग सेनेबाहेर इतर पक्षांसह सामान्य जनतेत होता. त्याचप्रमाणे वरील सर्व गोष्टींना तीव्र विरोध करणारे राजकीय पक्ष, विविध सामाजिक तसेच मानवाधिकार, लोकशाहीवादी संघटना, व्यक्ती या बाळासाहेब ठाकरेंचे कडवे विरोधक राहिले. त्या सर्वांना साहेबांच्याच आदेशांवरून वा मूकसंमतीतून सैनिकांच्या शाब्दिक व थेट शारीरिक हल्ल्याला सामोरे जावे लागले. याबाबत ठाकरेंवर काही कारवाई झाली वा तुरूंगात जावे लागले असे फक्त एकदाच ६९ साली घडले. सीमा प्रश्नावरून झालेल्या आंदोलनात दंगल भडकली व बाळासाहेबांना अटक झाली.

आठ दिवस ते तुरुंगात होते. ही त्यांची पहिली व शेवटची अटक!

कम्युनिस्ट व समाजवाद्यांचा संयुक्त महाराष्ट्र समितीमुळे वाढलेला प्रभाव रोखण्यासाठी काँग्रेसने शिवसेनेला फ्री हॅन्ड दिला. आपल्या या उपद्रवमूल्याची योग्य ती वसुली शिवसेनाप्रमुखांनी केली व मुंबईसह ठाण्यात शिवसेना नावाची दहशत पसरवली. मराठी माणसावरचा अन्याय दूर करण्याच्या उद्देशाने स्थापित शिवसेनेला मुंबईत पाय रोवायला जमीन उपलब्ध करून देण्यात आली.

शिवसेना ही फक्त आणि फक्त बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशावर चालली; अगदी त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत. संघटनेला ना विशिष्ट धोरण, ध्येय, कालबद्ध कार्यक्रम ना पक्ष घटना, ना पक्षांतर्गत लोकशाही. ऐंशीच्या दशकात शिवसेनेला राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळाल्यावर निवडणूक आयोगाच्या नोटिसीमुळे सेनेची घटना अस्तित्वात आली. (सध्या त्याच घटनेवरून उलटसुलट आरोपप्रत्यारोप सर्वोच्च न्यायालयात चालू आहेत.) घटनेतसुद्धा सर्वाधिकार शिवसेनाप्रमुखांना म्हणजेच बाळासाहेबांना होते.



**बाळासाहेबांनी हिंदुत्वाचं वारं अचूक हेरलं**

नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीला देशात पेटलेल्या मंडल-कमंडल वादात बाळासाहेबांनी ओबीसीबहुल सेना हिंदुत्वाच्या रथाला जोडली. कारण त्यांच्या लक्षात आले होते, महाराष्ट्रभर पसरायचे तर मराठीचा मुद्दा टिकणार नाही. भाजप बाल्यावस्थेत होता. देशभर निर्माण होत असलेल्या हिंदुत्वाच्या वाऱ्याला महाराष्ट्रातून जहाल नेतृत्वाची गरज होती. ही पोकळी अचूक हेरून बाळासाहेबांनी आपला पांढरी सुरवार, पांढरा झब्बा व पांढरी शाल कपाटात ठेऊन ते नखशिखान्त भगव्या पेहेरावात अवतरले ते शेवटपर्यंत!

भाजपच्या रामाला महाराष्ट्रात वानरसेनेची गरज होतीच. ती शिवसैनिक मावळ्यांनी भागवली. एकीकडे रामाच्या नावाने हिंदुत्व व दुसरीकडे छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार करत मुस्लिमांना शत्रू पक्षात उभा करण्यासाठी भाजप बाळासाहेबांना शरण गेला. आपल्या पारंपरिक मुस्लिम शत्रूत्वाच्या राजकारणाला सेनेची, बाळासाहेबांची ढाल करून भाजप पुढच्या पन्नास वर्षांची रणनिती आखत होता!

सेना हा एकखांबी तंबू आहे. पक्ष वा संघटना म्हणून रीतसर दुसरी, तिसरी फळी वा कार्यानुसार विभागणी वगैरे काही नाही. त्यात पहिल्या युती सरकारच्या काळातच बाळासाहेबांचे उत्तराधिकारी राज वा उद्धव होणार. त्यांच्या हाती सूत्रे येतील तेव्हा आजच्या सेनेतील नेते साठीपार गेलेले असतील व राज व उद्धवचा वकूब बघता बाळासाहेबांनंतर शिवसेना निर्नायकी होईल व तोवर भाजप काँग्रेसची जागा घेऊन महाशक्ती झालेला असेल. शिवसेनेचे ना सहयोग मूल्य उरले असेल, ना उपद्रवमूल्य! हा त्यावेळचा महाजन, मुंडे व भाजपचा रोडमॅप तंतोतंत प्रत्यक्षात आला. पण तो बघायला ना बाळासाहेब राहिले, ना महाजन, मुंडे!

**सेना सत्तेत राहून विरोधकांसारखी वागली**

बाळासाहेबांनंतर २०१४ ला भाजप-सेना लोकसभा युतीत लढली व केंद्रात सत्तेत आली; पण २०१४ च्या विधानसभेला २५ वर्षांची युती तुटली वा तोडली. तरीही सेनेचे ६० च्या आसपास आमदार निवडून आले. राष्ट्रवादीने बाहेरून पाठिंबा देत सेनेचं विक्रीमूल्यच संपवले व भाजप सत्तेत आला! नंतर वरातीमागून घोडे नेत उद्धव ठाकरे निकालोत्तर युती करून सरकारात सामील झाले!

उद्धव ठाकरेंचा धरसोडपणा, संघटनेतील मनमानी आणि साहेबांसारखा रिमोट होण्याची महत्त्वाकांक्षा यातून युतीतील दुरावा वाढत गेला. फडणवीसांनी आपल्या पहिल्याच डावात मुख्यमंत्रीपद सांभाळताना पक्षातील विरोधक जसे संपविले, तसेच सेनेचे विशेषत: उद्धव ठाकरेंचे फुत्कार झेलत टर्म पूर्ण केली. सेना ५ वर्षे सत्तेत राहून विरोधकांसारखी वागली.

**उद्धव यांच्या पतनाचे अध्याय लिहायला सुरुवात**

२०१९ ला मोदी शहांनी १४ ते १९ दरम्यान दुरावलेल्या, दुखावलेल्या मित्रपक्षांना पुन्हा आलिंगन देत एनडीए पुनरूज्जीवित केली. महाराष्ट्रात स्वत: शहा मातोश्रीवर गेले व लोकसभेसह विधानसभेसाठीही पुन्हा युतीची घोषणा उद्धव ठाकरेंना सोबत घेऊनच जाहीर केली. मोदी शहांची शंका चुकीची निघाली. मतदारांनी भाजपलाच २०१४ पेक्षा जास्त मते देत विनाएनडीए स्वबळावर

दिल्लीत पुन्हा सत्ता दिली. महाराष्ट्रातही युतीचेच बहुमत आले व सत्ताग्रहण हा सोपस्कार उरला असतानाच उद्धव ठाकरे अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदासाठी अडून बसले. शहांसोबत तसे एकांतात बोलणे झाले तेही बाळासाहेबांच्या खोलीत! हे त्यांनी एवढे लावून धरले, की निकाल लागून, युती बहुमतात असून सरकार स्थापनच होईना!

घड्याळाचे काटे फिरले, पंजा हळूवार गोंजारू लागला व उद्धव ठाकरेंनी निवडणूकपूर्व युती तोडत निकालोत्तर सेना, राष्ट्रवादी व काँग्रेस अशी मविआ म्हणजेच महाविकास आघाडी केली व सत्तास्थापनेचा दावा केला! भाजपसाठी हा धक्का होता, धोका होता. पण उद्धव ठाकरे हटत नव्हते. पुढचे पहाटेच्या शपथविधीसह घडलेले महाभारत आता सर्वांना तोंडपाठ आहे.

पवार आणि सोनिया यांनी उद्धव ठाकरेंनाच मुख्यमंत्रीपदाच्या घोड्यावर बसवून ठरवून बाराती झाले! मरणासन्न बाळासाहेबांना शिवसेनेचा शिवसैनिक मुख्यमंत्रीपदी बसवेन, असं वचन दिलं होतं उध्दवजींनी. ते वचन पूर्ण केलं. फक्त फरक एवढाच होता शिवसेनेचा शिवसैनिक नाही, तर कार्याध्यक्षच मुख्यमंत्रीपदी बसला!

हट्टाने राज्यारोहण करून घेतलेल्या उद्धव ठाकरेंच्या या राज्याला खालसा करण्याची योजना समांतरपणे भाजपचे चाणक्य, वाल्मिकी, व्यास, शकुनी जेवढे कुणी होते त्यांनी आखली. उद्धव यांच्या पतनाचे अध्याय लिहायला सुरुवात केली होती. विश्वासघाताला विश्वासघातानेच उत्तर देण्याची सनदशीर, कायदेशीर संहिता लिहिली जात होती.

इकडे राज्यारोहण होऊन महिना-दोन महिने होत नाहीत तोच जागतिक महामारी आली. तोही इतिहास आता सर्वश्रूत. पण या महामारीने मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना कार्यक्षमतेचा किताब मिळवून दिला व त्यांचे घोडे जमीन सोडून हवेत उडू लागले. मंत्रिमंडळात बाळराजे आदित्यला घेऊन ते समांतर सत्ताकेंद्र झाले. त्यात उद्धवजींना जीवघेणा आजार जडला. अशावेळी शिवसेनेचेच ज्येष्ठ मंत्री, गटनेते एकनाथ शिंदेंकडे कार्यकारी कारभार देऊन पक्षांतर्गत दिलासा देता आला असता; पण आपणच सर्वोत्तम व सुप्रीम या अहंगडातून आजारपणातही कार्यकर्ते दूर ठेवत पुत्रप्रेमालाच भरते आले. बाळराजे अनभिषिक्त राजे झाले!

**भाजपला नायक सापडला**

भाजपचे कथानक पूर्ण झाले व ते नायकाच्या शोधात होते. सरकारात राष्ट्रवादीची दादागिरी, काँग्रेसची सोयीस्कर सत्ताभिलाषा यात सेनेचे आमदार, मंत्री पक्षाचाच मुख्यमंत्री असताना अनाथ झाले होते. खदखद वाढत होती. निरोप दिले जात होते. पण पितापुत्र सत्तानंदात मित्रपक्षांची खातिरदारी करण्यात धन्यता मानत होते. शेवटी अनाथांचे नाथ बनले एकनाथ आणि भाजपला नायक सापडला. तसंही ठाणे विरुद्ध मातोश्री हे शीतयुद्ध आनंद दिघे विरुद्ध बाळासाहेब व पुढे वारशाने एकनाथ शिंदे विरुद्ध उद्धवजी असे सुरूच होते.

मातोश्री विरोधात मुंबईबाहेरचाच शिलेदार उभा राहू शकतो, हे हेरून भाजपने एकनाथ शिंदेंवर लक्ष केंद्रित करून राज्यसभा व विधानपरिषद निवडणुकात गटनेते शिंदेंची जी उपेक्षा केली गेली तो क्षण पकडून भाजपने वातीला काडी लावली आणि उठावाचा बार उडवला गेला!.

पुढचाही इतिहास पाठ झालाय सर्वांना. पण सुरुवातीला सुरत, गुवाहाटी, गोवा या प्रवास निवासापुरतीच पाठीशी महाशक्ती असेल, हा कयास चुकीचा ठरला. महाशक्तीने पक्षांतर्गत उठाव, बंडखोरी नाही वा पक्षांतर नाही वा नवा पक्ष स्थापना नाही, तर मूळ पक्षावरच नाव चिन्हासह दावा याचीही सर्व कायदेशीर व्यवस्था राजभवन ते सर्वोच्च न्यायालय व्हाया निवडणूक आयोग महाशक्तीने करून ठेवली. हे आता जसजसा काळ पुढे सरकतोय तसे स्पष्ट होत चाललेय. साम, दाम, दंड, भेद सर्व प्रकार वापरून ठाकरेंच्या हातून व मातोश्री या देवस्थानातून शिवसेना हे पक्षनाम व धनुष्यबाण हे चिन्ह मुक्त करायचे. नवे शक्तीपीठ मुंबईबाहेर तयार करायचे. तसे ते आता ठाण्यात केले गेले. उपमुख्यमंत्री वा कार्यकारी मुख्यमंत्री या अपेक्षेत असलेल्या शिंदेंना थेट मुख्यमंत्रीपदी बसवून भाजपने जनतेलाही झटका दिला. त्यातून पुन्हा फडणवीसांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारून या सत्तानाट्यात आणखी नाट्य निर्माण केले.

हे सर्व करून भाजपने आज उद्धव ठाकरेंना शून्यस्थितीत आणलेय. पण या स्थितीला आणू देण्यात त्यांचा स्वत:चा मोठा वाटा आहे. आजही ते आत्मपरीक्षणापेक्षा इतरांवर द्वेषारोप, हेत्वारोप करताना दिसतात. ते आजही आपल्या आत बघायला तयार नाहीत.

उद्धव ठाकरेंनी शांत डोक्याने राजकीय संयम, मुत्सद्दीपणा दाखवण्यापेक्षा भावनिक उतावीळपणा दाखवला. भावनेच्या राजकारणावर तात्कालिक फायदे मिळवता येतात; पण दीर्घकालीन राजकारणासाठी प्रचंड संयम, मुत्सद्दीपणा, धोरणीपणा व संघटनकौशल्य वा संघटनेवर मजबूत पकड लागते. उद्धव ठाकरे या सर्वच कसोट्यांत जवळपास अनुत्तीर्ण झाले.

स्वत: मुख्यमंत्रीपदी बसल्यावर आघाडीतील स्वपक्षाचे स्थान बळकट करण्यावर भर देण्यापेक्षा ते आघाडीच्या शीर्षस्थ नेत्यांच्या गुडबुक्समध्ये राहण्यात गुंतले. स्वपक्षीय मंत्री, आमदार, विधिमंडळ पक्ष याकडे त्यांनी दुर्लक्ष केलं वा त्यांना गृहीत धरलं. २०१४ ला भाजपला सतत इशारे देणारे उद्धवजी इथे मुख्यमंत्री असून राष्ट्रवादी व काँग्रेस यांना ओव्हरपॉवर वा कट टू द साईज करू शकले नाहीत. याउलट याच गोष्टी त्यांनी स्वपक्षीयांवर केल्या. परिणामी एकनाथ शिंदेंच्या उठावाची कल्पना दिली गेली, तरी त्यांनी त्यांच्यासोबत कोणी जाणार नाही असं तुच्छतेने म्हणत हलक्यात घेतलं!

स्वत: मुख्यमंत्री असताना स्वपक्षाचे मंत्री, संरक्षणासह राज्य सीमा पार करतात तरी उद्धवजी ना गृहमंत्र्यांना विचारत ना गृहमंत्री सांगत. सुरुवातीला काही, मग काही, असे करत ४० आमदार उठाव करत परराज्यात गेले, तर मुख्यमंत्री म्हणून आघाडीची तातडीची बैठक बोलविणे वा स्वपक्षातील महत्त्वाच्या लोकांशी संयमित चर्चा करण्याऐवजी हे बॅगा भरून वर्षा सोडून निघाले मातोश्रीवर! भावनाकुल सैनिक म्हणजेच महाराष्ट्र अशा समजात असलेल्या उद्धवजींना कळले नाही, की ही कृती एक प्रकारे रणछोडदासगिरीत बसणारी ठरणार आहे.

त्यापुढे त्यांनी संसदीय वा विधिमंडळ राजकारणाला अत्यंत अडचणीचा ठरलेला त्यांच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. तोही फेसबुक लाईव्ह करून! अरे तुम्ही काय व्हॉटसॲप ॲडमिन

पद सोडताय, सोशल मिडियावरून सांगायला? बरं कुणी मागितला नसताना, विधिमंडळात अविश्वास ठराव आलेला नसताना वा राज्यपालांनी बहुमत सिद्ध करायला सांगितलं नसताना रूसलेल्या बाळासारखं मुख्यमंत्रीपद सोडून दिलं! शरद पवारांसह राष्ट्रवादी व काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी कपाळावर हात मारून घेतला असेल.

हे होत नाही तर एकनाथ शिंदेना गटनेताप्रमुख पदावरून हटवले. गल्लीतली कबड्डी टीम आहे का विधिमंडळ पक्ष? बरं त्यांच्याशी संवाद तर साधा. विचारा काय नाराजी ते! ते विचारायला शिवसेना नेते नाही, तर यांचे सचिव नार्वेकर जातात! ज्या नार्वेकरांवर सर्व नेते, कार्यकर्ते यांचा सर्वाधिक राग त्यांना पाठवतात? आदित्यला का नाही पाठवले?



एका अत्यंत चलाखीने रचलेल्या षड्यंत्राला कूटनितीने उलटविण्याऐवजी अत्यंत बालिश पद्धतीने, व्यक्तिगत रागलोभ आणि वडिलोपार्जित पुण्याईच्या जोरावर संवादाऐवजी विसंवादानेच सुरुवात केली व आता तर ते अशा टोकाला गेलेत, की त्यात स्वत:सह वडिलोपार्जित जे काही होतं ते ही गेलं!

तरीही राजकीय उत्तर देण्यापेक्षा देवघरातले धनुष्यबाण पत्रकारपरिषदेत मिरविण्याचा व पुन्हा सहानुभूती नि भावनिक शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रकार करत बसलेत. उठाव केलेल्या आमदारांचे आधीचे व्यवसाय काढून रिक्षावाला, भाजीवाला म्हणून हिणवणे म्हणजे तर श्रमसंस्कृतीला अपमानित करण्याचा हिणकसपणा होता. आजवर त्यांचे हे उद्योग डसले नव्हते तुम्हाला? आणि चांदीचा चमचा आजही तोंडात घेऊन फिरणाऱ्या बाळराजेंनी पन्नाशी शिवसेनेतच खर्ची केलेल्या कडवट शिवसेना नेत्यांना अर्वाच्च भाषेत बोलायचं? ज्या दिवशी प्रवेश त्याच दिवशी उपनेतेपद दिलेल्या सुषमा अंधारे तुमचा माऊथपिस होऊन राज्यभर कंठाळी, आक्रस्ताळी भाषणे करून स्टार वक्तेपदाला पोहचतात व ज्यांची हयात गेली ते साईडलाईन होतात? भास्कर जाधव काही दिवस अंधारे सोबतीने ताशा वाजवत फिरले, पुढे तेही वजा झाले.

आता ताजा कार्यक्रम जाहीर झालाय. नेत्यांना जिल्हे वाटून दिलेत! स्वत: एखादी सभा घेणार. पुण्याच्या पोटनिवडणुकीतही ऑनलाईन प्रचार म्हणजे आजही तोंडात फक्त मर्द मर्द असा जप; पण मातीत उतरायची तयारी नाही!

स्वकर्तृत्व, स्वभाव, राजकीय अपरिपक्वता, आजही माझे कुटुंब माझी जबाबदारी याच परिघात उद्धव ठाकरे गोलगोल फिरताहेत. समोरची महाशक्ती ही नुसती कागदावरची महाशक्ती नाहीए. तिने आताच कोर्टकचेऱ्या नि केंद्रिय यंत्रणांनी हेलपाटे घालायला लावून नाकात दम आणलेला असताना, आयोगाने विरोधात निकाल दिल्याबरोबर आयोगच कसा विकला गेलाय वगैरे प्रतिक्रिया म्हणजे राजकीय असंमजसपणा व संयम नसल्याची लक्षणे.अजून केसेस चालू आहेत. शेवटी कोर्टातून आयोगाकडेच जायचेय हे माहीत असूनही आधीच अशा प्रतिक्रिया? उद्धव ठाकरे नुसतेच राष्ट्रवादी व काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसले; पण लॉलीपॉपसारखं सहज हाती दिलेलं मुख्यमंत्रीपदासह पक्ष कसा टिकवावा, फुटीला आवर कसा घालायचा, डावाला प्रतिडाव कसा द्यायचा यातलं काहीच या राजकीय धुरंधरांकडून शिकले नाहीएत व आजही शिकायची तयारी दिसत नाही.

अशाने सहानुभूतीचे कितीही सर्व्हे आले, तरी मूळ स्वभाव व राजकारण बदलले नाही तर ठाकरे नावाचं जे संस्थान आहे त्यातून आयोगाने ठाकरे घराणं खालसा केलंच आहे, ते जनतेमधून पुन्हा उभारायचं तर चाल, चलन व राजकीय चारित्र्य बदलावं लागेल. अन्यथा इतिहासाच्या पानात विराजमान व्हायची तयारी ठेवावी लागेल.

नेहरू-गांधी घराण्यासह काँग्रेसला पन्नास खासदारात गोठवणाऱ्या महाशक्तीला सध्या तरी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गोठवायला डीप फ्रिझर नाही, तर आईसबॉक्सही पुरेसा आहे. कटू आहे; पण वास्तव हेच दिसतंय. ●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# कोणाच्या खांद्यांवर कोणाचे ओझे!



देवीदास तुळजापूरकर

**गेल्या तीन दशकांत म्हणजेच विशेष करून नवउदार धोरणे राबविण्यास सुरुवात झाल्यापासून एकानंतर एक अनेक विक्रमी रकमांचे घोटाळे उघडकीस आले आहेत. ज्यात भांडवलदारांनी हजारो नव्हे, तर लाखो कोटी रुपयांना लुटले आहे ते सार्वजनिक क्षेत्रातील संरचना संस्थाना वापरून घेऊन. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी गेल्या दहा वर्षांत १२ लाख कोटी रुपयांची कर्जे राईट ऑफ केली आहेत, ज्यामुळे या बँका अडचणीत आल्या होत्या. तेव्हा केंद्र सरकारने अर्थसंकल्पात तरतूद करून पाच लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे भांडवल या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना उपलब्ध करून दिले. अन्यथा या सार्वजनिक क्षेत्रातील बँका अडचणीत आल्या असत्या.**

न्यूयॉर्कस्थित एक वित्तीय संस्था हिंडनेबर्गने भारतातील अदानी उद्योग समूहाच्या उलाढालीवर प्रकाशझोत टाकणारा एक संशोधन अहवाल प्रसिद्ध केला आणि भारतीय वायदे बाजारात जणू एक भूकंपच झाला. हा अहवालदेखील अशा वेळी प्रसिद्ध झाला, ज्यावेळी या अदानी उद्योग समूहातील एक कंपनी अदानी एंटरप्रायजेस खुल्या बाजारातून २० हजार कोटी रुपयांचे भांडवल उभे करू पाहत होती. ओघानेच याचा परिणाम म्हणून वैयक्तिक गुंतवणूकदारांनी या शेअर खरेदीकडे पाठ फिरवली. पण अदानी समूहाच्या होणाऱ्या फसगतीपासून त्यांना वाचवण्यासाठी अंबानी आणि जिंदाल उद्योग समूह पुढे सरसावले. पण त्यानंतर स्वतः अदानी उद्योग समूहाने आपला भांडवल उभारणी कार्यक्रम रद्द केला आणि ज्या गुंतवणूकदारांनी यात गुंतवणूक केली होती, त्यांना ती परत केली आणि अदानी एंटरप्रायझेसच्या भांडवल उभारणी कार्यक्रमाच्या निमित्ताने सुरू झालेल्या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. भांडवली बाजारात मात्र हिंडेनबर्ग अहवालाचा परिणाम म्हणून अदानी उद्योग समूहाच्या शेअर्समध्ये चालू झालेली घसरण मात्र तशीच कायम राहिली. याचा परिणाम म्हणून अदानी उद्योग समूहाच्या मूल्यांकनात कितीने घट झाली? जगातील श्रीमंत व्यक्तीच्या मानांकनात अदानीची घसरण कुठून, कुठवर गेली? अदानी उद्योग समूहातील एलआयसीची गुंतवणूक किती? आणि गेल्या एक महिन्यात ती घसरून कुठवर पोहोचली? स्टेट बँकेचे अदानी उद्योग समूहाला कर्ज किती? आणि आता त्याचे काय होणार? स्टेट बँक सोडता इतर बँकांनी अदानी उद्योग समूहाला दिलेल्या कर्जाचे आता काय होणार? या आणि अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरांच्या शोधात आपण आहोत. या प्रत्येक प्रश्नाभोवती एक गूढ वलय आहे!

**त्यावर आपण अश्रू ढाळण्याचे काहीच कारण नाही**

हिंडेनबर्ग अहवालाला प्रत्युत्तर म्हणून अदानी उद्योग समूहाने एक पत्रक प्रसिद्ध केले. स्वतःचा एक युक्तिवाद पुढे आणला, ज्यात हिंडेनबर्ग संस्थेच्या हेतूबद्दल शंका उपस्थित केली गेली व स्वतःच्या भारतीयत्वाला ढाल म्हणून पुढे आणले गेले. या साठमारीत अदानी उद्योग समूहाचे काही बरेवाईट होईल त्यावर आपण अश्रू ढाळण्याचे काहीच कारण नाही. पण त्याबरोबर ज्या वैयक्तिक गुंतवणूकदारांनी घाम गाळून जमा केलेली बचत आदानी समूहाने विकलेल्या स्वप्नावर विश्वास ठेऊन त्यांच्या हाती बहाल केली, त्यांचे काय? एलआयसी ही भारत सरकारच्या मालकीची संस्था. या संस्थेने अदानी उद्योग समूहात केलेल्या गुंतवणुकीत त्यांना आजच्या तारखेत फटका बसलेला आहे, तो तीन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त. त्याचा परिणाम म्हणून जिवंतपणी आणि मेल्यानंतरदेखील विमाधारकांना साथ देण्याची भाषा करणाऱ्या या जीवन विमा निगमचे भवितव्य यामुळे धोक्यात येत आहे, त्याचे काय? स्टेट बँक, बँक ऑफ बडोदा या आणि इतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी अदानी उद्योग समूहाला दिलेल्या कर्जाचे भवितव्य जर उद्या धोक्यात आले, तर वैयक्तिक ठेवीदारांना काही क्षती कदाचित बसणार नाही. पण भारत सरकारला पुढाकार घेऊन करदात्यांनी दिलेल्या पैशातून तरतूद करून या बँकांना वाचवावे लागेल, त्याचे काय? करदाते याचा अर्थ पुन्हा सामान्य माणूसच आला.

आज या निमित्ताने सुरू झालेली चर्चा अदानी हे मोदींच्या किती जवळचे आणि शरद पवार यांचे संबंध किती दृढ, या प्रश्नांभोवती फिरत आहे. जे आज या अदानीच्या बाबतीत बोलले जाते, तेच उद्या इतर उद्योग समूहांच्या सत्ताधारी वर्गाशी असलेल्या जवळीकीवरून छेडले जाऊ शकते. आजदेखील काँग्रेसच्या संयुक्त संसदीय समितीतर्फे चौकशीच्या मागणीला इतर अनेक राजकीय पक्ष पाठिंबा का देत नाहीत, या प्रश्नाचे उत्तर शोधायला काही भविष्यवेत्याची आवश्यकता नाही.

**त्यातूनच हे मोठाले घोटाळे शक्य होतात**

भारतातील निवडणुका खर्चिक झाल्या आहेत. यासाठी येणारा पैसा काही लोकवर्गणीतून येत नाही, तर तो बड्या भांडवलदारांकडूनच येतो. जे निवडणूक निकाल लागल्यानंतर त्यांना पोषक धोरण आखण्यासाठी या राजकीय पक्षांना मजबूर करतात आणि त्यातूनच हे

मोठाले घोटाळे शक्य होतात. यात नवीन काहीच नाही. किंगफिशरचे डॉ. विजय मल्ल्या राज्यसभेत गेले ते कधी काँग्रेस तर कधी जनता दल तर कधी भाजपच्या पाठिंब्यावर. स्वातंत्र्यानंतर पहिल्या चार ते पाच दशकांत भांडवलदार राजकारण्यांना रसद पुरवत असत. सरकारच्या धोरणांवर प्रभाव टाकत असत. पण आता मात्र ते स्वतःच मैदानात उतरले आहेत. स्वतः तेच लोकप्रतिनिधी म्हणून कायदेमंडळात निवडून येत आहेत, धोरणे ठरवत आहेत.

**...आणि अदानी उद्योग समूह आकाशातून जमिनीवर झेपावला**

अदानी उद्योग समूहाने स्वतःच असं एक आभासी जग निर्माण केले. विदेशात कागदोपत्री कंपनीज काढल्या. भारतात विद्यमान राजवटीत स्वतःचे स्थान निर्माण केले, राजाश्रय मिळवला. बँक, विमा या वित्तीय संस्थांकडून वारेमाप कर्जे मिळवली. गुंतवणूक करून घेतली. राजाश्रयाचा वापर करत अमर्यादित नैसर्गिक संपत्ती जंगल, जमीन, पाणी, खाणी, बंदरे मिळवली आणि साम्राज्य वाढवत नेले. देशातील गुंतवणूक विदेशात कागदोपत्री स्थापित केलेल्या कंपनीकडे वळवली आणि त्यांच्यामार्फत भारतीय भांडवली बाजारात स्वतःच्या शेअरमध्ये गुंतवणूक करून घेऊन कृत्रिमरित्या शेअर्सचे भाव वाढवून घेतले आणि स्वतःची पत वाढवून घेतली. श्रीमंतांच्या मानांकनात शिडी चढत वर गेले. पण हिंडेनबर्ग अहवालाच्या निमित्ताने भ्रमाचा फुगा अखेर फुटला आणि अदानी उद्योग समूह एकदम आकाशातून जमिनीवर झेपावला.

**अन्यथा सार्वजनिक क्षेत्रातील बँका अडचणीत आल्या असत्या**

गेल्या तीन दशकांत म्हणजेच विशेष करून नवउदार धोरणे राबविण्यास सुरुवात झाल्यापासून एकानंतर एक अनेक विक्रमी रकमांचे घोटाळे उघडकीस आले आहेत. ज्यात भांडवलदारांनी हजारो नव्हे, तर लाखो कोटी रुपयांना लुटले आहे ते सार्वजनिक क्षेत्रातील संरचना संस्थाना वापरून घेऊन. खाजगी क्षेत्रातील येस बँकेला वाचवले ते सार्वजनिक क्षेत्रातील स्टेट बँकेने. खाजगी क्षेत्रातील सगळ्यात मोठी बिगरबँकिंग वित्तीय संस्था आयएल अँड एफएसला वाचवले ते सार्वजनिक क्षेत्रातील स्टेट बँक आणि एलआयसीने. हर्षद मेहता घोटाळा उघडकीस आल्यानंतर बुडणाऱ्या कराड बँकेला वाचवले ते सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ इंडियाने. केतन पारेख घोटाळा उघडकीस आल्यानंतर ग्लोबल ट्रस्ट बँकेला वाचवले ते सार्वजनिक क्षेत्रातील ओरिएंटल बँकेने. अडचणीत आलेल्या युनायटेड वेस्टर्न बँकेला वाचवले ते सार्वजनिक क्षेत्रातील आयडीबीआय बँकेने. खाजगी क्षेत्रातील व्होडाफोनला शेवटी वाचवले ते भारत सरकारने. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी गेल्या दहा वर्षांत १२ लाख कोटी रुपयांची कर्जे राईट ऑफ केली आहेत, ज्यामुळे या बँका अडचणीत आल्या होत्या. तेव्हा केंद्र सरकारने अर्थसंकल्पात तरतूद करून पाच लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे भांडवल या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना उपलब्ध करून दिले. अन्यथा या सार्वजनिक क्षेत्रातील बँका अडचणीत आल्या असत्या.

भांडवलदार हातोहात या संस्थांना गंडवणयात यशस्वी झाले ते उपलब्ध नियम, अटी, तरतुदी, धोरणे यातील त्रुटींचा फायदा घेऊन. म्हणूनच हजारो नव्हे, लाखो कोटी रुपयांना गंडवल्यानंतरदेखील हे घोटाळेबाज उजळ माथ्याने समाजात वावरू शकतात. कर्ज मंजुरीची प्रक्रिया, वसुलीची प्रक्रिया, वसुलीसाठीचा पाठपुरावा, वसुलीची कायदेशीर यंत्रणा या सर्व बाबतीत धोरणांच्या पातळीवर अशा त्रुटी आहेत, की या घोटाळेबाजाना लीलया या चक्रव्यूहातून बाहेर पडणे शक्य होते. प्रशासन, न्यायव्यवस्था, प्रतिनिधी मंडळ, या सर्व यंत्रणेवर आपला प्रभाव टाकून या व्यवस्थांना हवे तसे वाकवून स्वतःच्या हितसंबंधांना जपण्यासाठी, त्याना बढावा देण्यासाठी भांडवलदार आणि त्यांची यंत्रणा अहोरात्र काम करतात. त्यातूनच हे शक्य होते.

**व्यवस्थेने भरणपोषण करून निर्माण केलेले हे राजे आहेत**

जंगलचा राजा वाघ त्याचा स्वतःचा एक विभाग असतो, ज्यात तो राजा म्हणून वावरत असतो. पण तो जर दुसऱ्या वाघाच्या विभागात शिरण्याचा प्रयत्न करू लागला तर त्याला प्रथम त्या भागातल्या राजाशी म्हणजे वाघाशी तुंबळ युद्ध करावे लागते आणि नेमके हेच भारतीय भांडवलदारांच्या सुंदोपसुंदीत घडत आहे. अदानी उद्योग समूहाने एनडीटीव्ही घेण्याच्या निमित्ताने माध्यम जगतात प्रवेश केला. ते माध्यम जगतातील विद्यमान राजाला म्हणजेच अंबानी उद्योग समूहाला मान्य नव्हते काय? अदानी एंटरप्रायजेसचा भांडवल उभारणी कार्यक्रम अंबानी-जिंदाल उद्योग समूहाच्या सौजन्याने पूर्ण झाला होता. पण अदानी उद्योग समूहाने ते सौजन्य नाकारले. याचा अर्थ अंबानी-जिंदाल यांचा अदानी उद्योग समूहातील शिरकाव त्यांना मान्य नव्हता काय? या प्रश्नांची उत्तरे तर्काच्या कसोटीवर शोधली जाऊ शकतात. पण भांडवलशाही काम करते. ती स्वतःच्या हितसंबंधांच्या जपणुकीसाठी, हा एकच तर्क भांडवलशाहीला लागू होतो. आपण १९९१ पासून नवीन आर्थिक धोरण, वैश्वीकरण, उदारीकरण, खाजगीकरण स्वीकारले, त्याचेच हे आपत्य आहे. या व्यवस्थेने भरणपोषण करून निर्माण केलेले हे राजे आहेत. अधूनमधून त्यांच्यात होणाऱ्या आपसी लढाईतून आजची ही परिस्थिती उत्पन्न झाली. पण अखेर ते एकमेकांशी हस्तांदोलन करून आपल्या व्यापक हितासाठी एक होतात, हे चित्र आहे. अर्थात, त्या वर्गाचे हित जपले जाते ते 'नाही रे' वर्गाचा बळी देऊनच. पण हे त्याला जाणवू नये म्हणून त्याला कधी जात, तर कधी धर्म तर कधी भाषा या अफूच्या गोळ्या दिल्या जातात आणि त्यातच त्यांना मश्गुल ठेवले जाते आणि नेमके हेच गेल्या तीस वर्षांपासून भारतीय राजकारणात चालू आहे. जनतेच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांवर जनताच उभी राहायला तयार नाही तर अशी व्यवस्था, पर्यावरण निर्माण केले जात आहे, की त्यांना हे प्रश्नच पडू नयेत. जोपर्यंत या व्यवस्थेत बदल होणार नाहीत, तोपर्यंत डॉ. विजय मल्ल्या, हर्षद मेहता, सी.आर. भन्साळी अथवा आणखी कुणीतरी नवीन. ही नावे बदलत जातील, पण सामान्य जनतेची ही लूट तशीच चालू राहील. याला अटकाव घालण्यासाठी खराखुरा पर्याय आपण निर्माण करू शकलो पाहिजे, अन्यथा भूक, गरिबी, दारिद्र्य, भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी, विषमता या निकषावर काढण्यात येणाऱ्या जागतिक मानांकनात भारताचा क्रमांक कितवा? यावर आपल्याला विफल चर्चा करत बसावे लागेल. ●●●

**(लेखक बँकिंग क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ आहेत.)**

# राहुल गांधींचे काँग्रेसवर पुन्हा अधिपत्य!

**भारत जोडो यात्रेपूर्वीची राहुल गांधींची भाषणे आणि आताचे त्यांचे बोलणे यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक जाणवेल. भारत जोडो यात्रेमध्ये राज्या-राज्यांतील नेते सहभागी झाले म्हणून त्यांच्यातील भांडणे मिटलेली नाहीत. पक्षांतर्गत मतभेदांची तीव्रताही कायम राहिलेली आहे. पण पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण होऊ लागली आहे. राहुल गांधींच्या नेतृत्वाबद्दल त्यांना पुन्हा आशा वाटू लागली आहे. कार्यकर्ते राहुल गांधींच्या पाठीशी उभे राहिले, तर त्यांना आव्हान देण्याचे धाडस कोणी करणार नाही. राहुल गांधींच्या यात्रेचा उद्देश पक्षातील बंडखोरी मोडून काढणे हा नसला, तरी परिणाम तोच साधला गेला.**

**विचक्षण बोधे**

छत्तीसगढची राजधानी रायपूरमध्ये काँग्रेसचे तीन दिवसांचे महाअधिवेशन नवनियुक्त पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यासाठी आयोजित करण्यात आले होते. पण त्यामागील खरा उद्देश राहुल गांधी हेच काँग्रेसचे सर्वोच्च नेते असल्याचे पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मनात ठसवायचे होते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानंतर पक्षामध्ये इतकी अस्थिरता निर्माण झालेली होती, की हा राष्ट्रीय पक्ष चालवतो कोण असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडलेला होता. पक्षावरील पकड सुटू लागली असून आताच हालचाली केल्या नाहीत, तर पक्षांतर्गत मोठा संघर्ष करावा लागेल, हे गांधी निष्ठावानांच्या लक्षात आले होते. निवडणुकीच्या राजकारणात राहुल गांधी सातत्याने अपयशी ठरले. त्यांना परंपरागत अमेठी लोकसभा मतदारसंघही टिकवता आला नाही. के. सी. वेणुगोपाल यांनी वायनाड हा सुरक्षित मतदारसंघ शोधून काढला आणि राहुल गांधी कसेबसे लोकसभेत पोहोचले. वेणुगोपाल हे राहुल गांधींच्या अंतर्गत वर्तुळात जाऊन बसण्याचे हे प्रमुख कारण होते. मे २०१९ ते फेब्रुवारी २०२३ या चार वर्षांमध्ये काँग्रेसने आणि राहुल गांधींनी स्थित्यंतरे पाहिली. आता रायपूर महाअधिवेशनाद्वारे राहुल गांधींनी एक वर्तुळ पूर्ण केले, असे म्हणता येईल.

**राहुल गांधी मोदी-शहांपेक्षा अधिक संवेदनशील**

देशभर लोकांमध्ये, अगदी काँग्रेसबद्दल सहानुभूती दाखवणाऱ्या प्रसारमाध्यमांमधील प्रतिनिधींचाही समज झाला आहे, की राहुल गांधी माणूस म्हणून खूपच चांगले आहेत. मोदी-शहांपेक्षा ते अधिक संवेदनशील आहेत. पण या चांगुलपणाचा निवडणुकीच्या राजकारणात काहीही उपयोग नाही. राहुल गांधींकडे राजकारणामध्ये यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्य नाही. निवडणुकीच्या राजकारणामध्ये पक्षासाठी जागा जिंकून द्याव्या लागतात. राष्ट्रीय-परराष्ट्र धोरणच नव्हे, तर स्थानिक स्तरावरील राजकारणही समजून घ्यावे लागते. राजकीय समीकरणे आखावी लागतात, त्याची अंमलबजावणी करावी लागते, त्यासाठी स्वतःचा चमू बनवावा



लागतो. हे सगळे करण्याची राहुल गांधींची क्षमता नाही. ते मेहनतही घेत नाहीत!

राहुल गांधींवर आक्षेप घेणाऱ्यांच्या म्हणण्यामध्ये तथ्य नाहीच, असे नाही. राहुल गांधी मोदी-शहांप्रमाणे चोवीस तास निवडणुकीचे राजकारण करत नाहीत, निवडणुकीचे मशीन झालेल्या भाजपच्या विरोधात राहुल गांधींना लढावे लागणार असेल, तर त्यांनी बर्फामध्ये स्किईंग करायला न जाता विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारामध्ये अधिक वेळ दिला पाहिजे, असे म्हणणे चुकीचे नाही. त्यामुळे कदाचित राहुल गांधी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला केंद्रात सत्ता मिळवून देऊ शकणार नाहीत. पण यशस्वी राजकारणाचे हेच निकष लावायचे असतील, तर राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अधिक यशस्वी राजकारणी मानता येतील! कारण ते चोवीस

तास काम करतात. निवडणुकीच्या राजकारणासाठी आवश्यक सर्व कौशल्ये त्यांच्याकडे आहेत.

२०१४ ते २०१९ या पाच वर्षांमध्ये काँग्रेसच्या निवडणुकीचे राजकारण राहुल गांधींच्या हाती देण्यात आले होते. पक्षाची अपेक्षा होती, की राहुल गांधींनी मोदी-शहांप्रमाणे अहोरात्र काम करावे, प्रचारसभा गाजवाव्यात, आपल्या वाणीने लोकांना आकर्षित करावे आणि गर्दीचे रुपांतर मतांमध्ये करावे. हे झाले, की मोदी विरुद्ध राहुल असा सामना होऊन काँग्रेस आणि राहुल गांधी दोन्हीही विजयी होतील. केंद्रात पुन्हा काँग्रेसची सत्ता येईल. पण यापैकी काहीही झाले नाही. उपजत कौशल्याअभावी राहुल गांधी निवडणुकीच्या राजकारणात पूर्णपणे अपयशी ठरले. त्यांनी नैतिक जबाबदारी घेत पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिला.



**बंडखोरांनी काँग्रेसला संजीवनी दिली!**

मोदी-शहांकडे असलेले निवडणुकीच्या राजकारणात यशस्वी होण्याचे कौशल्य आजही राहुल गांधींकडे नाही. राहुल गांधी आजही एकहाती काँग्रेसला जिंकून देऊ शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. तरीही काँग्रेसची पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी राहुल गांधींशिवाय पर्याय नाही हेही खरे. हा काँग्रेसमधील मोठा विरोधाभास आहे! भाजपमध्ये हा प्रश्न उद्‌भवत नाही. कारण मोदी-शहा निवडणुका जिंकून देतात, त्यांना भाजपमधील इतर नेत्यांची गरज नाही. राज्यसभेत मोदींनी, सगळ्या विरोधकांना मी एकटा पुरून उरेन, अशी मखलाशी केली होती. मोदींकडे भाजप आणि संघ दोन्हींची ताकद आहे. त्यांचा मोदी एकहाती वापर करून घेत आहेत. राहुल गांधींकडे यापैकी काहीही नाही. त्यामुळे त्यांना स्वतःला आणि काँग्रेसला नव्याने उभे करावे लागत आहे. काँग्रेसमध्ये मधल्या अस्थिर काळात पक्षांतर्गत असंतोष वाढला, बंडखोरी वाढली. गुलाम नबी आझादांच्या नेतृत्वाखाली 'जी-२३' गट निर्माण झाला. त्यांनी राहुल गांधींविरोधात तीव्र संघर्ष केला होता. गांधी निष्ठावान या बंडखोर गटाविरोधात तुटून पडलेले होते. पण या बंडखोरांनी काँग्रेसला संजीवनी दिली, असे आता म्हणता येईल.

**राहुल गांधी काँग्रेसचे एकमेव नेते**

काँग्रेसमध्ये आत्ता दिसत असलेल्या बदलाची सुरुवात बंडखोर नेत्यांशी तत्कालीन पक्षाध्यक्ष सोनिया गांधींनी पाच तास केलेल्या चर्चेतून झाली. पक्षासाठी पूर्णवेळ काम करणार आणि कार्यकर्त्यांना उपलब्ध असणारा पक्षाध्यक्ष असला पाहिजे, ही बंडखोरांची प्रमुख मागणी होती. राहुल गांधी पक्षाध्यक्षपद स्वीकारायलाच तयार नव्हते, तर पूर्णवेळ देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. सोनिया गांधींना पूर्ण वेळ काम करणे शक्य नव्हते. प्रियंका गांधी-वाड्रा यांच्याकडे पक्षाची सूत्रे सोपवता येत नव्हती. त्यातून पक्षाध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्याचा तोडगा काढला गेला. त्या मार्गाने बंडखोरांची एक मागणी तरी पूर्ण झाली. मल्लिकार्जुन खरगे काँग्रेसचे गांधीतर पक्षाध्यक्ष झाले. आता प्रश्न उरला होता, राहुल गांधींचे काय करायचे? पक्षात त्यांचे स्थान काय? हा प्रश्न गांधी निष्ठावानांच्या अस्तित्वाबाबत निर्माण झालेल्या संभ्रमातूनही पुढे आलेला होता. राहुल गांधी नसतील तर आपल्यालाही पक्षांतर्गत सत्तेला मुकावे लागेल, ही चिंता त्यांना सतावत होती. त्यानंतर पक्षामध्ये पुन्हा राहुल गांधींचे निर्विवाद वर्चस्व निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाल्याचे नंतरच्या घटनांवरून दिसते. 'भारत जोडो यात्रा' ही अत्यंत चलाख रणनिती होती. ही यात्रा यशस्वी झाल्याचे परिणाम रायपूरमधील महाअधिवेशनामध्ये पाहायला मिळाले. पक्षाध्यक्ष खरगे असले, तरी आता पक्षाने राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली पुढे गेले पाहिजे, असे सोनिया गांधी आणि खुद्द खरगेंनीही सुचित केले. गांधी निष्ठावानांना रायपूरच्या महाअधिवेशनामध्ये राहुल गांधींना काँग्रेसचे एकमेव नेते म्हणून प्रस्थापित करण्यात यश आले आहे.

**'भारत जोडो यात्रे'ने माझ्यातील अहंकार निघून गेला**

'भारत जोडो यात्रे'मध्ये सहभागी झालेल्या प्रत्येकाच्या आकलनामध्ये गुणात्मक फरक पडलेला आहे. ''या यात्रेचे नेतृत्व राहुल गांधींनी केल्यामुळे त्यांनी इतरांपेक्षा अधिक जवळून भारत पाहिला, समजावून घेतला. दीडशे दिवस कन्याकुमारी ते काश्मीर हा साडेतीन हजार किमीचा प्रवास केल्यानंतर त्यांच्याजवळ जमा झालेल्या अनुभवांच्या गाठोड्यामध्ये बरेच काही असेल. एखादी गोष्ट आतून समजली, की व्यक्तिमत्वामध्ये आमूलाग्र बदल होतो. तसा झाला असल्याचे राहुल गांधींच्या बोलण्यातून जाणवते. या यात्रेने माझ्यातील अहंकार निघून गेला. सुरुवातीला मी लोकांना ज्ञान देण्याचा आटापिटा करायचो. नंतर मी लोकांचे ऐकू लागलो, त्यांच्या भावना-दुःख समजू लागलो. मी आतून शांत होत गेलो. जम्मू-काश्मीरला पोहोचेपर्यंत मी ध्यान लागल्यासारखा गप्प झालो. माझे लोकांशी असलेले नाते बदलून गेले'', असे राहुल गांधी महाअधिवेशनातील भाषणात म्हणाले. भारत जोडो यात्रेपूर्वीची राहुल गांधींची भाषणे आणि आताचे त्यांचे बोलणे यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक जाणवेल. भारत जोडो यात्रेमध्ये राज्या-राज्यांतील

नेते सहभागी झाले म्हणून त्यांच्यातील भांडणे मिटलेली नाहीत. पक्षांतर्गत मतभेदांची तीव्रताही कायम राहिलेली आहे. पण पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण होऊ लागली आहे. राहुल गांधींच्या नेतृत्वाबद्दल त्यांना पुन्हा आशा वाटू लागली आहे. कार्यकर्ते राहुल गांधींच्या पाठीशी उभे राहिले, तर त्यांना आव्हान देण्याचे धाडस कोणी करणार नाही. राहुल गांधींच्या यात्रेचा उद्देश पक्षातील बंडखोरी मोडून काढणे हा नसला, तरी परिणाम तोच साधला गेला.

**काँग्रेसची संघटना नव्याने बांधावी लागणार!**

आता राहुल गांधींच्या राजकीय आयुष्याचा नवा दीर्घकालीन टप्पा सुरू झाला आहे. राहुल गांधी कधीच मोदी-शहांप्रमाणे चोवीस तास सत्तेचे राजकारण करणार नाहीत. त्यांच्याकडे ते कौशल्य नाही आणि तसे करण्याची त्यांची इच्छाही नाही. ते अधूनमधून बर्फावर स्किईंग करताना दिसतील, तेव्हा त्याची खिल्लीही उडवली जाईल. पण मध्यममार्गी राजकीय पक्ष म्हणून भाजपविरोधात उभे राहण्यासाठी देशाला काँग्रेसची आजही गरज आहे. त्यासाठी काँग्रेसची संघटना नव्याने बांधावी लागणार आहे. हे काम पूर्णपणे राहुल गांधींवर सोपवले तर कदाचित अपयश आणि निराशा हाती येईल. गेल्या चार वर्षांमध्ये पक्षातील निर्नायकी पुन्हा येऊ शकेल. हे टाळायचे असेल, तर राहुल गांधींच्या राजकीय कौशल्याच्या मर्यादा लक्षात घेऊन गांधी निष्ठावानांना पक्षाची बांधणी करावी लागेल. घटनेमध्ये बदल करून पक्षांतर्गत आरक्षणाचा निर्णय अत्यंत योग्य असला, तरी त्याची खरोखर अंमलबजावणी केली पाहिजे. भाजपने अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींच्या मतांवर कब्जा केला आहे. त्यामुळे भाजपला ४० टक्क्यांहून जास्त मते मिळत आहेत. या तीनही मतांमध्ये विभाजन केले गेले, तर भाजपकडून केंद्रातील सत्ता हिसकावून घेता येईल. अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींना आकर्षित करण्यासाठी पक्षांतर्गत आरक्षण हा पर्यायांतील पहिला टप्पा असेल.

**काँग्रेस लोकसभा निवडणुकीत कितपत मजल मारू शकेल**

पण गांधी निष्ठावान राहुल गांधींना आताच पंतप्रधान करायला निघाले आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्त्वाखाली बिगरभाजप विरोधी पक्षांनी एकत्र आले पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरलेला आहे. त्यामुळेच महाअधिवेशनामधील राजकीय ठरावामध्ये प्रकर्षाने तिसऱ्या आघाडीला विरोध केलेला आहे. तिसऱ्या आघाडीचा भाजपलाच फायदा होईल हा ठरावातील मुद्दा योग्य असला, तरी राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली विरोधकांना एकत्र आणण्याचा खटाटोप यशस्वी होण्याची शक्यता नाही. 'भाजप जोडो यात्रे'मुळे राहुल गांधी यांच्या मागे नैतिक पाठबळ निर्माण झालेले आहे. ते काँग्रेसला पुढे घेऊन जाऊ शकेल. त्याचे रुपांतर काँग्रेसच्या लोकसभेतील जागा वाढण्यात झाले, तर मात्र विरोधी पक्षांना काँग्रेसच्या संभाव्य आघाडीचा गांभीर्याने विचार करावा लागेल. या वर्षी (२०२३) कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगढ या चार राज्यांमध्ये काँग्रेसची भाजपविरोधात थेट लढाई होईल. काँग्रेसने राजस्थान-छत्तीसगढची सत्ता टिकवली आणि कर्नाटक-मध्य प्रदेशची सत्ता पुन्हा मिळवली, तर आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला या चारही राज्यांमध्ये अधिक



जागा मिळू शकतात. हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसची सत्ता आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला दीडशेहून अधिक जागा मिळाल्या तरच विरोधी पक्षांची महाआघाडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या वर्षी विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या कामगिरीवर शक्याशक्यता अवलंबून असतील. विरोधी पक्षांवर काँग्रेसचे वर्चस्व सिद्ध होत नाही तोपर्यंत काँग्रेसच्या नेतृत्वाखाली महाआघाडी होऊ शकत नाही. राहुल गांधींच्या निवडणुकीच्या राजकारणातील मर्यादा पाहिल्या, तर काँग्रेस लोकसभा निवडणुकीत कितपत मजल मारू शकेल, हा विचार विरोधी पक्ष करत आहेत.

खरे तर, विरोधी पक्षांच्या काँग्रेसच्या विजयाच्या क्षमतेवरील शंकेचे निराकरण काँग्रेसला करता येऊ शकेल. निवडणूकपूर्व महाआघाडीचा खटाटोप करण्यापेक्षा आणि राहुल गांधींनी विरोधी पक्षांचे नेतृत्व करण्यापेक्षा भाजपशी थेट लढाऊ असलेल्या राज्यांमधील जागांवर काँग्रेसने लक्ष केंद्रित करून अधिकाधिक जागा जिंकण्याचा प्रयत्न केला, तर प्रादेशिक पक्षांनाही त्यांच्या राज्यांमध्ये भाजपविरोधात लढता येऊ शकेल. काँग्रेसशी आघाडी करून जागावाटपात नुकसान करून घ्यावे लागणार नाही. बिहार विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसशी युती करून राष्ट्रीय जनता दलाने काँग्रेसला अधिक जागा दिल्या. पण काँग्रेसला अपेक्षित यश मिळवता आले नाही. ही चूक प्रादेशिक पक्ष टाळू पाहात आहेत. त्यामुळे काँग्रेसने मध्य प्रदेश, राजस्थान अशा राज्यांमध्ये भाजपशी थेट लढत द्यावी. त्यासाठी राहुल गांधींचे नेतृत्व काँग्रेसला उपयोगी पडेल. महाराष्ट्र, बिहार आदी राज्यांमध्ये भाजपविरोधातील आघाडीमध्ये काँग्रेसचा समावेश आहेच, फक्त जागा जिंकण्याच्या शक्यतेवर काँग्रेसने जागांची मागणी करावी. काँग्रेसने ही आगामी लोकसभा निवडणुकीपूर्व तडजोड मान्य केली तर बिगरभाजप पक्षांना अधिक जागा जिंकता येऊ शकतात. भाजपचे संख्याबळ २७० पेक्षा कमी झाले, तर निवडणुकोत्तर महाआघाडीची शक्यता निर्माण होते. राहुल गांधींनी पक्षाध्यक्ष होण्यास नकार दिला होता, ते कदाचित पंतप्रधान होण्यासही नकार देऊ शकतील. हा संदेश विरोधकांपर्यंत थेट पोहोचला, तर विरोधकांच्या महाआघाडीचा मार्ग सुकर होईल. पण काँग्रेसमध्ये हा विचार कोण करणार, हा प्रश्न आहे. ●●●

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# रायपूर महाअधिवेशन : काँग्रेस पक्ष पुन्हा फ्रंटफुटवर खेळेल काय?



सुरेश भटेवरा

**जनतेत भाजपच्या विरोधात असंतोष आहे. भारतात सेक्युलर मूल्यांवर विश्वास असलेले कोट्यवधी लोक आहेत. कोट्यवधी बेरोजगार तरुणांचे तांडे सर्वत्र हिंडत आहेत. काँग्रेस पक्षाकडे देशभरातले असहाय लोक पुन्हा आशेने पहात आहेत. राजकारणाच्या समरांगणात काँग्रेस पक्ष आक्रमक आवेशात फ्रंटफुटवर खेळेल काय? निराशेच्या गर्तेतून या देशाला बाहेर काढील काय? आव्हान मोठे आहे; पण अवघड नाही. अशा आत्मविश्वासाने छत्तिसगडातल्या रायपूरमधे काँग्रेसने कात टाकली आहे.**

काँग्रेस पक्षाची विचारसरणी बंदिस्त चौकटीतली नाही. वैचारिक तटस्थता किंवा राजकीय साचलेपण ही काँग्रेसची ओळख नाही. अनेक वर्षांच्या अनुभवातून भारतातल्या १३८ वर्षांच्या या जुन्या पक्षाने आपली लवचिक विचारसरणी तयार केली आहे. बदलत्या सामाजिक व्यवस्थेत काळाशी सुसंगत धोरण राबवले आहे. सातत्य कायम ठेवून कालानुरूप बदलही स्वीकारले आहेत. समर प्रसंगांना धैर्याने सामोरे जाण्याची शक्ती त्यातूनच पक्षाला प्राप्त झाली आहे. गेली साडे आठ वर्षे काँग्रेस पक्ष केंद्रात आणि अनेक राज्यात सत्तेत नाही. या वास्तवाचे भान ठेवून काँग्रेस पक्षाने रायपूरला पुन्हा एकदा कात टाकली आहे. याचा ताजा प्रत्यय काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनातून नुकताच आला.

**रायपूरच्या महाअधिवेशनात एकूण ६ प्रस्ताव मंजूर**

राहुल गांधींच्या दिडशे दिवसांच्या 'भारत जोडो यात्रे'ची ३० जानेवारी २०२३ रोजी यशस्वी सांगता झाली. सामान्य जनतेशी संपर्क साधत कन्याकुमारीपासून काश्मिरच्या लाल चौकापर्यंत ३,५०० किलोमीटरचे अंतर या यात्रेने पार केले. यात्रेचे मार्गक्रमण सुरू असतानाच मल्लिकार्जुन खरगे यांची १७ ऑक्टोबर २०२२ रोजी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली. सोनिया गांधींच्या प्रदीर्घ कारकिर्दीनंतर गांधी नेहरू कुटुंबाबाहेरील ज्येष्ठ काँग्रेस नेत्याकडे पक्षाचे अध्यक्षपद सोपवले गेले. काँग्रेस पक्षावर सातत्याने घराणेशाहीचा आरोप होत होता. खरगेंच्या निवडीमुळे तो पुसला गेला. या दोन घटनांच्या पार्श्वभूमीवर छत्तिसगडची राजधानी रायपूरमधे फेब्रुवारीच्या अखेरच्या सप्ताहात काँग्रेसचे ८५ वे महाअधिवेशन संपन्न झाले.

काळ बदलतो तशा राजकीय पटलावर अनेक गोष्टी बदलतात. जनतेच्या आकांक्षा आणि अपेक्षाही बदलतात. नवी आव्हाने उभी राहिली, की त्यावर निर्धाराने मात करण्यासाठी नवे मार्गही शोधावे लागतात. भारताचे आगामी राजकारण आता अत्यंत महत्त्वपूर्ण टप्प्यावर येऊन ठेपले आहे. वर्षभरानंतर १८ व्या लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक आहे. समविचारी पक्षांना सोबत घेऊन या निवडणुकीला सामोरे जाण्याची काँग्रेसची इच्छा आहे. नवे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, तरूण पिढीचे आयकॉन राहुल गांधी आणि अन्य काँग्रेस नेत्यांची हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवूनच आत्मविश्वासपूर्ण भाषणे रायपूरला झाली. महाअधिवेशनात एकूण ६ प्रस्ताव मंजूर झाले. पक्षाच्या घटनेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले. मुख्यत्वे ५८ मुद्यांचा राजकीय ठराव काँग्रेसने मंजूर केला. पक्षाची आगामी वाटचाल कशाप्रकारे होईल, त्याची दिशा स्पष्ट करणारेच हे सारे ठराव आहेत.

**लक्षवेधी बदलाचा क्रांतिकारी निर्णय**

काँग्रेस पक्षात ब्लॉक पातळीपासून राष्ट्रीय कार्यकारिणीपर्यंत म्हणजे खालपासून वरपर्यंत अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी, अल्पसंख्य, महिला आणि तरुण घटकातल्या कार्यकर्त्यांसाठी पक्ष संघटनेत ५० टक्के आरक्षण निश्चित करण्याचा महत्त्वाचा ठराव महाअधिवेशनात मंजूर झाला. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत अनुसूचित जाती-जमातींसाठी जशा राखीव जागा असतात, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींसाठी जसे आरक्षण ठेवले जाते. त्याच धर्तीवर लक्षवेधी बदलाचा हा क्रांतिकारी निर्णय पक्षाने घेतला आहे. काँग्रेस पक्षात असा बदल यापूर्वी कोणीही घडवला नव्हता. सामाजिक न्याय आणि सबलीकरणाच्या ४६ मुद्यांचा समावेश असलेल्या या प्रस्तावाचे नेमके स्वरूप काय? त्याचा पूर्वेतिहास काय? मुख्य प्रवाहातील माध्यमे अन् समाजमाध्यमांना या बदलांची दखल घ्यावीशी वाटली नाही. देशभर काँग्रेस कार्यकर्त्यांनाही त्याची पुरेशी कल्पना नाही. ठरावाचे तपशील सर्वसामान्य जनतेलाही कळायलाच हवेत.

**नवा 'रोहित वेमुला कायदा' मंजूर करण्याचा मानस!**

एक जुनी आठवण या निमित्ताने सांगावीशी वाटते. स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काळात काँग्रेसचे राष्ट्रीय तसेच राज्यस्तरिय नेतृत्व उच्चशिक्षित सवर्ण समाजातले असायचे. अल्पसंख्य समाज, दलित व आदिवासी समाजातले निवडक नेते त्यात असायचे. ओबीसी समाजाच्या नेत्यांचे स्थान मात्र त्यात अगदीच नगण्य होते. काँग्रेसने ही चूक आता दुरूस्त केली आहे. प्रस्तुत ठरावात ओबीसींना सामावून घेण्यात आले आहे. केंद्रीय सत्तेची संधी मिळाली, तर काँग्रेस पक्ष भारतीय न्यायिक सेवा (Indian Judicial Service) ची स्थापना करणार आहे. याखेरीज राष्ट्रीय विकास परिषदेच्या धर्तीवर नॅशनल कौन्सिल फॉर सोशल जस्टीसचे गठनही केले जाईल, हा ठरावातला दुसरा महत्त्वाचा

मुद्दा. नव्या न्यायिक सेवेत, भारताच्या उच्च व सर्वोच्च न्यायालयापर्यंत SC, ST, OBC समाज घटकांचे आरक्षण ठेवण्यासाठी काँग्रेस कसोशीने प्रयत्न करील. इतकेच नव्हे, तर केंद्र व राज्य स्तरावर जसे आदिवासी कल्याण मंत्रालय आहे, त्याच धर्तीवर स्वतंत्र ओबीसी मंत्रालयही कार्यरत केले जाईल. रोहित वेमुला नामक विद्यार्थ्याला केंद्रीय विद्यापीठात मानसिक अत्याचार आणि छळाला सामोरे जावे लागले. त्याने थेट आत्महत्या केली. देशात पुन्हा कुठेही अशा दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, या उद्देशाने तमाम शिक्षण संस्था आणि विद्यापीठांमधे दलित, आदिवासी आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर होणारा अत्याचार व छळ, याला कायदेशीर प्रतिबंध घालण्यासाठी नवा 'रोहित वेमुला कायदा' मंजूर करण्याचा मानसही महाअधिवेशनाच्या याच प्रस्तावात नमूद करण्यात आला आहे. सत्तेत असो की नसो, विरोधी बाकांवर असतानाही या साऱ्या मागण्या काँग्रेस पक्षातर्फे नेटाने रेटल्या जातील, अशी ग्वाही पक्षाने दिली आहे.

**काँग्रेसने आपली पूर्वीची भूमिका बदलली**

संसदेत व विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण मंजूर करण्याबाबत काँग्रेस पक्ष पूर्वीपासून वचनबद्ध आहे. सोनिया गांधींच्या अथक पाठपुराव्यामुळे २०१० साली हे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले. लोकसभेत मात्र ते रखडले. मुलायमसिंगांचा समाजवादी पक्ष, लालूप्रसाद यादवांचा राष्ट्रीय जनता दल, शरद यादव आदींचा या विधेयकाला मुख्यत्वे विरोध होता. ३३ टक्के आरक्षणांतर्गत, SC, ST, OBC समाजातल्या महिलांसाठीही आरक्षण असावे, असा या सर्वांचा आग्रह होता. कोट्यांतर्गत आरक्षणाचा हा कोटा काँग्रेसला मान्य नव्हता. यादव मंडळींच्या प्रखर विरोधामुळे आणि भाजपच्या विघ्नसंतोषी वृत्तीमुळे या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊ शकले नव्हते. रायपूरच्या महाअधिवेशनात काँग्रेसने आपली पूर्वीची भूमिका बदलली. समाजवादी आणि राजदच्या मागणीला पाठिंबा द्यायचा, असे काँग्रेसने आता ठरवले आहे.

**...तर धार्मिक ध्रुवीकरणाला पुरेपूर पायबंद बसेल**

भारतात २०२१ साली होणारी राष्ट्रीय जनगणना, विविध कारणांमुळे रखडली आहे. जातवार गणनेनुसार ही जनगणना व्हावी, अशी मागासवर्गीय समाजांची मागणी आहे. काँग्रेसचा जातवार जनगणनेला पाठिंबा आहे. जोडीला उच्चवर्णिय जातीतल्या आर्थिक दुर्बलांसाठीही आरक्षण असावे, असा काँग्रेसचा आग्रह आहे. (बिहारच्या CPI ML या डाव्या पक्षाचा मात्र या मुद्याला विरोध आहे) पुढल्या वर्षीच्या सार्वत्रिक निवडणुकीत, जातवार जनगणना हा मोठा मुद्दा असेल. बिहारमधे नितीशकुमारांनीही हाच मुद्दा लावून धरला आहे. या मुद्याला निवडणुकीत अनपेक्षित प्राधान्य प्राप्त झाले, तर (भाजप पुरस्कृत) धार्मिक ध्रुवीकरणाला पुरेपूर पायबंद बसेल, याची सेक्युलर पक्षांना खात्री वाटते. अडवाणींच्या राम रथयात्रेचा प्रभाव रोखण्यासाठी ९० च्या दशकात विश्वनाथ प्रतापसिंगांनी 'कमंडल विरुद्ध मंडल'चे अस्त्र वापरले होते. भाजपच्या राजकारणाला त्याचा मोठा फटका बसला होता. दलित, आदिवासी आणि ओबीसी समाजाचा पाठिंबा मतांमधे परावर्तित करणे प्राय: अवघड असते. भाजपने मात्र चातुर्याने व्यूहरचना करीत २०१४ पासूनच्या विविध निवडणुकांमधे टप्प्याटप्प्याने हे यश संपादन केले. भाजपच्या राजवटीविषयी या समाज घटकांमधल्या अनेकांचा आता बऱ्यापैकी भ्रमनिरास झाला आहे. विरोधकांना राजकारणात यश प्राप्त करायचे असेल, तर सर्वप्रथम भाजपची जातीची समीकरणे तोडावी लागतील. पक्षांतर्गत आरक्षणाचा काँग्रेसचा मार्ग त्या दृष्टीने केलेला ठळक प्रयत्न आहे. मोदी-शहांच्या जोडीलाही सर्वाधिक भीती आज याच मुद्याची वाटते. गतकाळातल्या अनेक चुकांबाबत काँग्रेस पक्षाला उपरती झाली आहे, उपरोक्त ठरावांमुळे याचा प्रत्यय महाअधिवेशनात आला. आगामी काळात देशाचे राजकारण कोणत्या दिशेने जाणार आहे, त्याचे दर्शनही या ठरावातून घडले.

**विरोधकांच्या महाआघाडीचे नेतृत्व नेमके करणार कोण?**

सार्वत्रिक निवडणुकीत भाजपचा पराभव करायचा असेल, तर देशात समविचारी पक्षांनी तातडीने एकत्र येण्याची गरज आहे. बिगर भाजप पक्षांच्या एकजुटीसाठी काँग्रेस सर्वतोपरी मदत करील. विरोधी पक्षांची तिसरी आघाडी मात्र भाजपच्या फायद्याची ठरेल, अशी स्पष्ट भूमिका महाअधिवेशनाच्या राजकीय प्रस्तावात काँग्रेसने मांडली आहे. विरोधकांच्या एकजुटीसाठी बऱ्यापैकी लवचिक धोरण अवलंबण्याचे संकेतही काँग्रेसने दिले आहेत. भाजप आणि रा.स्व.संघाशी वैचारिक लढा उभारण्यासाठी बिगर भाजप पक्षांनी आपसातले मतभेद व व्यक्तिगत अहंकार बाजूला ठेवून एकत्र आले पाहिजे, अशी साद काँग्रेसने घातली आहे. विरोधी पक्षांना तत्वत: हा मुद्दा मान्य आहे, मात्र विरोधकांच्या महाआघाडीचे नेतृत्व नेमके करणार कोण? हा तिढा कायम असल्याने विरोधकांची एकत्रित मोट बांधणे वाटते तितके सोपे नाही.

**काँग्रेस पक्षाचे खरे केंद्रबिंदू राहुल गांधीच**

'भारत जोडो यात्रे'ला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. या यशानंतर काँग्रेस पक्षाचे खरे केंद्रबिंदू राहुल गांधीच आहेत, हे रायपूरच्या महाअधिवेशनात आपोआपच अधोरेखित झाले. या प्रतीकासह काँग्रेस पक्ष पुढे सरसावला आहे. प्रादेशिक पक्षांची ताकद त्या त्या राज्यांपुरती मर्यादीत आहे. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. सार्वत्रिक निवडणुकीनंतर लोकसभेत अन्य कोणत्याही पक्षापेक्षा काँग्रेसला अधिक जागा मिळतील. मग काँग्रेसला केंद्रस्थानी ठेवूनच विरोधकांची महाआघाडी करावी लागेल, अशी काँग्रेसजनांची धारणा आहे. तथापि, हा युक्तिवाद भाजप विरोधी काही प्रादेशिक पक्षांना पटत नाही. बंगालमधे ममता बॅनर्जींचा तृणमूल काँग्रेस, दिल्लीत केजरीवालांचा आम आदमी पक्ष, तेलंगणात के. चंद्रशेखरराव यांची भारत राष्ट्र समिती, ओडिशात नविन पटनायकांचा जनता दल, ईशान्य भारतात काही छोटे पक्ष राहुल गांधींचे नेतृत्व मान्य करायला तयार होतील का? हा मुद्दा तूर्त अनुत्तरित आहे. विरोधकांची निवडणूकपूर्व महाआघाडी २०१९ साली याच तिढ्यामुळे अस्तित्वात येऊ शकली नव्हती. विरोधकांचा भाजपसमोर एक संयुक्त उमेदवार, हा प्रयोग अव्यवहार्य आहे. वास्तवाच्या कसोटीवर असले कल्पनाविलास कधी टिकत नसतात.

**अनेक राजकीय विश्लेषक 'आप'ला भाजपची 'बी टिम' संबोधतात!**

प्रत्येक राज्यातल्या जनतेने 'भारत जोडो यात्रे'ला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शेतकरी, कामगार, बेरोजगार तरुण, आदिवासी, दलित, महिला, अल्पसंख्य, लहान मोठे व्यापारी, विद्यार्थी, अभिनेते, कलाकार अशा सर्वस्तरांतल्या लोकांशी राहुल गांधींनी या यात्रेत थेट संवाद साधला. स्वयंसेवी संस्थांचे क्रियाशील कार्यकर्तेही मोठ्या संख्येने यात्रेत सहभागी झाले. जागोजागी मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे काँग्रेसजनही प्रचंड संख्येत यात्रेत सामील झाले. पक्षातली मरगळ त्यामुळे बऱ्याच अंशी दूर

झाली. यात्रेचा खरा उद्देश काँग्रेसला नवसंजीवनी मिळावी हाच होता. संयोजकांनी मोकळेपणाने तो मान्यही केला. प्रवास जसजसा पुढे सरकत गेला, ही यात्रा काँग्रेसच्या राजकारणाचे केंद्र बनत गेली. राहुल गांधींमधे परिपक्व राजकीय नेत्याचे आश्वासक दर्शन देशाला घडले. भाजपला पर्याय म्हणून यूपीए आघाडी केंद्रात पुन्हा सत्तेवर येऊ शकते, असा (धूसर का होईना) विश्वास लोकांच्या बोलण्यात जाणवू लागला. तृणमूल काँग्रेस, भारत राष्ट्र समिती, आम आदमी पक्ष, समाजवादी पक्ष आदी विरोधी पक्षांनी देशात तिसरी आघाडी तयार करण्याचा खटाटोप या पार्श्वभूमीवर सुरू केला. अरविंद केजरीवाल यांचा 'आप' आणि असाउद्दिन ओवेसींचा एमआयएम, या पक्षांनी आजवर काँग्रेस आणि अन्य सेक्युलर पक्षांच्या मतविभागणीचा प्रयोग विविध राज्यांमधे केला. त्याचा सर्वाधिक लाभ भाजपलाच झाला. पंजाबमधे अतिरेक्यांनी पुन्हा डोके वर काढल्याने केजरीवाल यांच्या 'आप'बाबत राज्यात असंतोष आहे. अनेक राजकीय विश्लेषक 'आप'ला भाजपची 'बी टिम' संबोधतात. काँग्रेसने 'आप'च्या राजकारणाला कडाडून विरोध केलेला नाही. तरीही राजकीय वाटचालीत असे अडथळे येणारच याची मानसिक तयारी काँग्रेसने ठेवली आहे.

**मग भाजपला कसे रोखणार?**

राजकीय आघाडीवर काँग्रेसने कितीही लवचिक धोरण अवलंबले, तरी विरोधी पक्षांची निवडणूकपूर्व महाआघाडी शक्य होईल, असे वाटत नाही. मग भाजपला कसे रोखणार? असा यक्षप्रश्न सामान्य जनतेच्या मनात आहे. भारतीय राजकारणाचे विद्यमान वास्तव कसे बदलले आहे, याचे तपशील मात्र सर्वांनाच अवगत नाहीत. जिथे आवश्यक आहे त्या प्रादेशिक स्तरावर विरोधी पक्षांची आघाडी अगोदरच अस्तित्वात आली आहे. महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना (ठाकरे गट) यांची महाविकास आघाडी प्रामाणिकपणे एकत्र लढली, तर निकाल काय लागतो, त्याचा ताजा प्रत्यय पुण्याच्या कसबा मतदारसंघात, मुंबईत अंधेरी मतदारसंघात, नागपूर आणि अमरावतीच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघात अलीकडेच आला आहे. तामिळनाडूत काँग्रेस आणि द्रमूक एकत्रच लढतात. बिहारमधे नितिशकुमार आणि राजदचे तेजस्वी यादव यांच्या महागठबंधनात काँग्रेसचा समावेश आहे. झारखंड मुक्ती मोर्चाशी झारखंडमधे काँग्रेसने पूर्वीच आघाडी केली आहे. त्रिपुरात भाजप आघाडीची मते १० टक्क्यांनी कमी झाली आहेत. काँग्रेस आणि डाव्या आघाडीतले पक्ष त्रिपुरात नुकतेच एकत्र लढले. 'तिप्रा मोथा' पक्षाला काँग्रेसने आपल्या आघाडीत सामावून घेतले असते, तर हे राज्य भाजपच्या हातून हमखास निसटले असते, अशी चर्चा आहे. कर्नाटक, मध्यप्रदेश, छत्तिसगड, राजस्थान, हिमाचल प्रदेश, हरयाणा, गुजराथ अशा ७ राज्यांमधे प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व नगण्य आहे. पंजाब विधानसभेत 'आप'ला बहुमत मिळाले, तरी या राज्यात काँग्रेसचे अस्तित्व संपलेले नाही. काँग्रेसला या राज्यांमधे भाजपच्या विरोधासाठी महाआघाडीची आवश्यकता नाही. जिथे प्रादेशिक पक्षांशी आघाडी शक्य नाही, तिथे विरोधक या नात्याने एकमेकांना अप्रत्यक्ष मदत करण्याची भूमिका काँग्रेस वठवू शकतो. राहुल गांधींसह काँग्रेसचे प्रमुख नेते बंगालच्या विधानसभा निवडणुकीत प्रचारापासून दूर राहिले होते. ममता बॅनर्जींना त्याचाच लाभ झाला. लोकसभेच्या निवडणुकीत अशीच रणनीती विरोधकांना आखता येईल.

**...तर केंद्र सरकारचे नेतृत्व आपोआपच त्याच्याकडे चालत येईल**

सार्वत्रिक निवडणुकीत जिथे भाजपशी काँग्रेसची थेट लढत आहे अशा ८/९ राज्यांमधे जास्तीत जास्त जागांवर विजय मिळवण्यासाठी काँग्रेसला कसोशीने झटावे लागेल. काँग्रेसला या राज्यांमधे अधिक जागा मिळाल्या, तर भाजपचे संख्याबळ आपोआप कमी होईल. अन्य राज्यांमधे भाजपला रोखण्यासाठी प्रादेशिक पक्ष आपापल्या परीने पूर्ण शक्ती पणाला लावतील. उत्तरेत काही राज्यांमधे काँग्रेस उमेदवार विजयी ठरले, तर भाजपला आताचे संख्याबळ टिकवता येणार नाही. बहुमतापासून भाजप दूर गेला, तर केंद्रात पुन्हा सत्ता स्थापण्याची त्याची संधी हुकेल आणि विरोधकांना प्राप्त होईल. विरोधकांची निवडणुकोत्तर महाआघाडी अशावेळी हमखास अस्तित्वात येईल. काँग्रेसने शंभर खासदारांपेक्षा अधिक संख्याबळ प्राप्त केले, तर केंद्र सरकारचे नेतृत्व आपोआपच त्याच्याकडे चालत येईल. काँग्रेसचे परंपरागत विरोधकही सत्तेवर येऊ घातलेल्या गैरभाजप सरकारला अशावेळी पाठिंबा देतील. पूर्वीही असे घडल्याचा इतिहास आहे. तो फारसा जुनाही नाही. विरोधकांच्या महाआघाडीसाठी काँग्रेसने फार आटापिटा म्हणूनच करू नये. भाजपच्या पराभवासाठी विरोधकांनी एकत्र आले पाहिजे. काँग्रेस त्यासाठी पुढाकार घेईल, असे प्रामाणिक आवाहन, काँग्रेसने रायपूर अधिवेशनात राजकीय ठरावाद्वारे केले. अनेक अर्थाने ते सूचक आहे.

'भारत जोडो यात्रे'ने माझ्या कारकिर्दीची सांगता होत आहे, याचे मला समाधान आहे,' असे उद्गार सोनिया गांधींनी रायपूरला काढले. काँग्रेसजनांच्या दृष्टीने हा भावनाप्रधान क्षण होता. विपरीत स्थितीशी अविरत झुंज देत १९९८ पासून २०२२ पर्यंत (राहुल गांधींच्या अध्यक्षपदाचे १९ महिने वगळता) सलग २२ वर्षे सोनियांनी काँग्रेसचे अध्यक्षपद सांभाळले. काँग्रेस पक्षाला २००४ व २००९ साली केंद्रीय सत्तेत विराजमान केले. दाराशी चालत आलेल्या पंतप्रधानपदाचा त्याग करून डॉ. मनमोहनसिंग यांच्यासारख्या विद्वान गृहस्थाकडे देशाचे पंतप्रधानपद त्यांनीच सोपवले. काँग्रेस पक्षाच्या इतिहासात सर्वाधिक काळ अध्यक्षपद भूषवणाऱ्या त्या एकमेव नेत्या आहेत. सक्रिय राजकारणातून प्रकृतीच्या कारणास्तव निवृत्त व्हायचे मात्र त्यांना वेध लागले आहेत.

**जनतेत भाजपच्या विरोधात असंतोष**

काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदाची मल्लिकार्जुन खरगेंसारख्या अनुभवी व बुजुर्ग नेत्याची नवी इनिंग सुरू झाली आहे. काँग्रेसचे ते ६१ वे अध्यक्ष! पक्षांतर्गत निवडणुकीत खरगेंनी सामंजस्य साधले. त्यांच्या भूमिकेमुळे 'जी २३' गटाचा अतिउत्साह पूर्णतः मावळला. काश्मिरमधे गुलाम नबी आझाद यांच्यासोबत बाहेर पडलेले काँग्रेसजन स्वगृही परतले. मोदी सरकारभोवती संकटांची मालिका उभी आहे. सरकारचा निर्बुद्ध कारभार बहुसंख्य लोकांना पटलेला नाही. जनतेत भाजपच्या विरोधात असंतोष आहे. भारतात सेक्युलर मूल्यांवर विश्वास असलेले कोट्यवधी लोक आहेत. कोट्यवधी बेरोजगार तरुणांचे तांडे सर्वत्र हिंडत आहेत. काँग्रेस पक्षाकडे देशभरातले असहाय लोक पुन्हा आशेने पहात आहेत. राजकारणाच्या समरांगणात काँग्रेस पक्ष आक्रमक आवेशात फ्रंटफुटवर खेळेल काय? निराशेच्या गर्तेतून या देशाला बाहेर काढील काय? आव्हान मोठे आहे; पण अवघड नाही. अशा आत्मविश्वासाने छत्तिसगडातल्या रायपूरमधे काँग्रेसने कात टाकली आहे. महाअधिवेशनाची सांगता याच नोटवर झाली आहे. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व लेखक आहेत.)**

# कृषी क्षेत्राच्या आत्मनिर्भरतेचा वेध

देशातील जवळजवळ अर्ध्यापेक्षा जास्त कुटुंबांची उपजीविका भागवणारे साधन म्हणून कृषी क्षेत्राकडे पाहिले जाते. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये तरी कृषी क्षेत्राला (शेतीला) कमी ठरवता येणार नाही. सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) कृषी क्षेत्राचे योगदान १५ ते १७ टक्क्यांच्या दरम्यान असले, तरी कृषी उत्पादनात वाढ झाली आहे हे मात्र निश्चित. यामुळेच देश अन्न-धान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला आहे. २०१९-२० च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार देशातील एकूण अन्नधान्य उत्पादन २९१.९५ दशलक्ष टन असल्याचा अंदाज होता. तर भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (ICAR) अंदाजानुसार, २०३० पर्यंत अन्नधान्याची मागणी ३४५ दशलक्ष टनांपर्यंत वाढेल. ही वाढलेली मागणी कृषी क्षेत्रालाच पूर्ण करावी लागेल. त्यासाठी ध्येय आणि धोरणे आखून आर्थिक गुंतवणूकदेखील वाढवावी लागणार आहे. भारतीय शेती ही सर्व प्रकारच्या बदलत्या हवामानामध्ये तग धरून राहू शकते. त्यामुळे विविध प्रकारची पिके घेण्यास ती पोषक आणि सक्षम आहे. त्यामुळेच भारत देश मसाले, कडधान्ये, चहा, काजू आणि ताग ही पिकांमध्ये अव्वल. तर तांदूळ, गहू, तेलबिया, फळे आणि हिरव्या भाज्या, ऊस आणि कापूस यांमध्ये दुसरा सर्वात मोठा उत्पादक आहे. एवढे सर्व असतानाही इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशातील अनेक पिकांची सरासरी उत्पादकता खूपच कमी का, हा प्रश्न आहे. येणाऱ्या काळात देशाची लोकसंख्या जगातील नंबर एकवर येण्याची चिन्हे आहेत. या सर्व लोकसंख्येला अन्नधान्य पुरवणे ही एक मोठी समस्या असणार आहे. या भविष्यकालीन समस्यांचा विचार करता, भारतीय शेतकरी सन्मानजनक आर्थिक उत्पन्न मिळवेल अशा स्थितीत असायला हवा होता. मात्र अलीकडे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात आणि शेतमालाच्या उत्पादनात घसरण होताना दिसून येते. स्वातंत्र्योत्तर ७५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीत कृषी क्षेत्रात धोरणात्मक वाटचाल आणि नियोजन केल्यानंतरही, बहुसंख्य शेतकरीवर्ग विविध अडथळे आणि समस्यांनी ग्रासलेला आहे. अद्यापही शेतकरीवर्ग शाश्वत शेतीचे उत्पादन आणि उत्पन्न मिळण्याच्या धोरणाची वाट पाहत आहेत.



डॉ. सोमिनाथ घोळवे

**काही प्रमुख अडथळे-समस्या :**

भारतीय शेतीमधील काही प्रमुख अडथळे-समस्या नोंदवायची झाल्यास कोणते? याचा विचार केला असता, प्रामुख्याने सहा अडथळे दिसून येतात. १) २०११ सालच्या कृषी जनगणनेनुसार एकूण शेतकऱ्यांपैकी ८५ टक्के शेतकरी हे २ हेक्टरपेक्षा कमी जमीनधारणा असलेले शेतकरी आहेत. या शेतकऱ्यांना आपण अल्पभूधारक, सीमांत शेतकरी असे म्हणतो. २) बहुतांश शेतकरी अल्पभूधारक असतानाही त्यांचे शेती हेच उदरनिर्वाहाचे प्राथमिक स्त्रोत बनले आहे. त्यामुळे हेच सीमांत शेतकरी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया बनलेले आहेत. ३) शेतकरीवर्ग हा असंघटित असणे. शिवाय उत्पन्न अगदीच काठावरील असल्याने कृषी निविष्ठा खरेदीच्या अनेक पातळ्यांवर मर्यादा येत आहेत. ४) कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाचा कमी वापर, यांत्रिकीकरण आणि खराब उत्पादकता यामुळे शेतकरी कुटुंबांच्या वार्षिक उत्पन्नवाढीवर मर्यादा येऊ लागल्या आहेत. ५) विकसित देशाच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांचा स्तर कमी असून, अत्यंत कमी मूल्यवर्धन आणि शेतमाल प्रकिया उद्योग नगण्य आहेत. ६) शेतीच्या खराब पायाभूत सुविधा आहेतच. शिवाय शेतमाल विक्रीव्यवस्था ही विपणन आणि पुरवठा साखळीवर अवलंबून आहे. या मूलभूत समस्यांना भारतीय शेतकरी सामोरे जात आहे. ह्या समस्या-अडथळे जर पार करावयाची असतील, तर अल्पभूधारक शेतकऱ्यांना संस्थात्मक आणि संघटनात्मक आधारावर उत्पादन प्रकिया-उद्योग आणि पणन मूल्यसाखळी व्यवस्थेत स्थान द्यावे लागेल. तसेच प्राथमिक आणि दुय्यम प्रकिया उद्योग, पुरवठासाखळी, संसाधने, कृषी पायाभूत सुविधा, जोडव्यवसाय या प्रक्रियेत स्थान देऊन सर्व पातळ्यांवर पारदर्शकता आणावी लागेल. याशिवाय पणन व्यवस्थेतील मध्यस्थी, व्यापारी कमी करावे लागतील. बदलत्या हवामानात नैसर्गिक संसाधने आणि पर्यावरण संवर्धन करण्याची आवश्यकता आहे.

**आर्थिक स्त्रोतामध्ये घसरण :**

देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि जीवनशैलीसाठी शेतकऱ्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र हाच शेतकरी घटक गेल्या तीन दशकांपासून बदलते हवामान, दुष्काळ, अतिवृष्टी, शेतमाल विक्रीप्रश्न, रासायनिक खते, बियाणे आणि शेती अवजारे यांच्या वाढलेल्या किमती अशा अनेक समस्यांनी पेचप्रसंगात सापडलेला आहे. बहुतांश शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, अत्यंत गरिबीची स्थिती आणि जीवनाचा दर्जा खालावलेला दिसून येतो. शिवाय दोन वर्षांपूर्वी आलेल्या जागतिक कोरोना महामारीने शेतकऱ्यांच्या समस्यांमध्ये आणखी भर पडलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्त्रोतांमध्ये मोठी घसरण झालेली दिसून येते. परिणामी अनेक शेतकरी स्वतःला टिकवणे (उपजीविका भागवणे) कठीण झाल्याने आत्महत्या करत आहेत. उदा. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये,१९ जुलै २०२२ रोजी, विरोधी पक्षनेत्यांनी गेल्या ४५ दिवसांमध्ये १३७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती दिली. अर्थात, दररोज ३ पेक्षा जास्त शेतकऱ्यांची आत्महत्या होत असल्याचे दिसून येते.

२०१६ च्या एनएसएसओच्या (NSSO) अहवालानुसार, भारतीय शेतकऱ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न सुमारे ७७,११२ रुपये आहे किंवा कमवतो. यामध्ये शेतकरी कुटुंबाच्या मिळणाऱ्या कौटुंबिक

उत्पन्नापैकी फक्त ५० टक्के किंवा त्याहून कमी उत्पन्न हे शेतीतून येते. त्यामुळे शेतकरी कुटुंबाला जगण्यासाठी शेतीशिवाय उत्पन्नाचे इतरही दुय्यम स्त्रोत वापरावे लागत आहेत. उदा. शेतीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न घसरले असल्याने, उपजीविकेसाठी अनेक कुटुंबांना छोटे-छोटे व्यावसायिक कामे, सेवा क्षेत्रातील कामे, बिगारी रोजंदारीवरची कामे-उद्योग, वाहनांचे ड्रायव्हर, सुरक्षारक्षक, फेरीवाले, छोटे दुकानदार, दुग्धव्यवसाय, पशूपालन इत्यादी स्वरूपातील मिळेल ती कामे करावी लागतात. मात्र कोरोना रोगामुळे केलेल्या लॉकडाऊनने अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या उत्पन्नाचा दुसरा स्त्रोत गमावला आहे. त्यामुळे आधीच्या ताणलेल्या (बिकट) परिस्थितीत पुन्हा भर पडलेली दिसून येते.

शेतीतील गुंतवणुकीचा वाढलेला खर्च आणि शेतमालाला मिळणारा कमी मोबदला यामुळे अनेक शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकले आहेत. ग्रामीण भागातील उपजीविकेचे साधन असलेली शेती वाचवण्यासाठी आणि उपजीविका भागवण्यासाठी बहुतांश शेतकरी विविध बँका, सोसायटी, खाजगी सावकार, मायक्रो फायनान्स कंपनी यांच्याकडून कर्ज मिळवण्याचा प्रयत्न करतात. मात्र शेतकऱ्यांना अनेकदा शासकीय कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था कर्जपुरवठा करण्यास टाळतात. त्यामुळे अलीकडे ग्रामीण भागात मायक्रो फायनान्स कंपन्या (खाजगी सावकारी संस्था) कर्ज देण्यासाठी पुढे आल्या आहेत. मात्र या विविध संस्थांकडून कर्ज घेऊन शेतमालाच्या मिळणाऱ्या परताव्यातून घेतलेले कर्ज फेडता आले नाही, तर कर्जबाजारी होऊन आत्महत्या केल्याची उदाहरणे गावोगाव दिसून येतात. राहायला चांगले घर नाही... खायला कष्ट केल्याशिवाय मिळत नाही. शिवाय सकस आहार मिळत नाही. अंगात घालायला चांगले कपडे नाहीत. आरोग्यावर फारसा खर्च करू शकत नाहीत. कर्जबाजारीपणाचा कलंक कुटुंबाला लागणे, मुलांना चांगले शिक्षण देऊ शकत नाही. सोयी-सुविधा मिळत नाहीत. आयुष्यात प्रत्येक दिवशी कष्ट-श्रम केले तरीही पोटाला पोटभर मिळत नाही. राहणीमान-जीवनशैली सुधारू शकत नाही असे बरेच घटक या शेतकऱ्यांच्या बाबतीत सांगता येतील. उद्याचा दिवस कसा जाईल या चिंतेने झोप येत नाही. अशा निराशाजनक परिस्थितीत बहुतांश शेतकरी अडकले आहेत. या परिस्थितीतून सुटका करून घेण्याच्या मानसिकतेत शेतकरीवर्ग आहे.

**निरंतरपणे येत असलेला कर्जबाजारीपणा :**

२०११ च्या जनगणना अहवालानुसार भारतात जवळजवळ ८० टक्क्यांपेक्षा जास्त शेतकरी पाच एकरपेक्षा कमी (दोन हेक्टरपेक्षा कमी) जमिनीवर काम करतात. जवळपास ८२ टक्के शेतकरी हे अल्प आणि अत्यल्प भूधारक आहेत. त्यामुळे लहान शेतकरी हाच कृषी उद्योगाचा कणा आहे. असे असूनही शेती हा एक अस्थिर आणि खर्चिक व्यवसाय बनला आहे. अनेक लहान शेतकऱ्यांना उपजीविका भागवणे तसेच गरिबीच्या चक्रातून सुटका करून घेण्यासाठी उत्पन्नाच्या इतर स्त्रोतांचा आधार घ्यावा लागत आहे. परिणामी अनेक शेतकरी कुटुंबे उत्पन्नाच्या दुसऱ्या स्त्रोतांसाठी शेती व्यवसायातून बाहेर पडत आहेत. दुसरे, बदलते हवामान आणि शेतमालाची विक्रीव्यवस्था बाजारकेंद्रित असल्यामुळे शेतमाल उत्पादनातील जोखमीने लहान शेतकऱ्यांचे जीवनमान अधिकच अस्थिर बनले आहे. शेतीतील शेतमाल घेण्यासाठी गुंतवणुकीचा वाढलेला खर्च, सिंचन व्यवस्थेचा अभाव, दुष्काळ, अतिवृष्टी, पूरस्थिती, रोगराई आणि शेतमाल परताव्यातून मिळणारे अपयश हे सर्व घटक शेती व्यवसायात अव्यवहार्यता आणतात आणि शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला कारणीभूत ठरतात. याव्यतिरिक्त शासनाची धोरणे अनुकूल नसणे आणि बाजारपेठेत शेतमाल विक्री व्यवस्थेतून होणारी लूट असे घटक शेतकऱ्यांचे उत्पन्न घसरवत आहेत. कारण हक्काची आणि हमी असणारी बाजारपेठ उपलब्ध नाही. शेतीवरील खर्च (शेतीतील गुंतवणूक) आणि मिळणारे अस्थिर उत्पन्न यामुळे अनेक शेतकऱ्यांना आणखीच कर्जबाजारी व्हावे लागते आहे.

**शेती (कृषी) क्षेत्राला संजीवनी मिळण्यासाठी:**

शेतकऱ्यांच्या शेतीतील गुंतवणुकीवर अधिक परतावा मिळण्यासाठी दर्जेदार बियाणे, भेसळमुक्त रासायनिक खते, पिकांचे संरक्षण करणारी कीटकनाशके-रसायने, अनुकूल शेती यंत्रे, शेतमाल साठवण यंत्रणा, नासाडी कमी करणारे व्यवस्थापन आणि वाहतूक व्यवस्था, कृषी नियोजन आणि व्यवस्थापन इत्यादी घटकांमध्ये परिवर्तन घडवावे लागेल. पर्यावरणास अनुकूल आणि रोगप्रतिरोधक, हवामान प्रतिरोधक, अधिक पौष्टिक आणि चवदार बियाणांचे वाण विकसित करणे खूप महत्त्वाचे आहे. शिवाय शेतीचा पोत राखला जाण्यासाठी माती परीक्षण-आधारित निर्णयांसह अचूक कृषी उत्पादनावर लक्ष केंद्रित करावे लागेल. शेतीला जोडव्यवसाय म्हणून पशूपालनातून मांस उत्पादन आणि दुग्धविकास घडवावा लागेल. त्यासाठी जनावरांचे-पशूचे दर्जेदार खाद्य, पशू आरोग्य, नियोजन आणि व्यवस्थापन क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी लागणार आहे. तसेच खाजगी कंपन्या, सहकारी किंवा शेतकरी उत्पादक संस्था (FPO) यांच्या मदतीने लहान आणि अल्पभूधारक शेतकरीदेखील शेतीची यंत्रे आणि तंत्रज्ञानाचा वापर करतील याकडे लक्ष केंद्रित करावे लागेल. शेतमालाची गुणवत्ता टिकवण्यासाठी आणि सुरक्षितता वाढविण्यासाठी नॅनो-तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल. अलीकडे हवामान बदल, शहरीकरण आणि चुकीचे विकास मॉडेल यामुळे झपाट्याने कमी होत असलेल्या जलस्रोतांचे संवर्धन करण्यासाठी सरकार, सामाजिक संस्था आणि लोकांना एकत्र यावे लागेल.

विपणन क्षेत्रात सुधारणा करावी लागेल. पर्यायी धोरणात्मक व्यवस्था आणण्याऐवजी आहे त्याच धोरण व्यवस्थेची तंतोतंत अंमलबजावणी आणि सुधारणा कशी करता येईल, याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. शिवाय शेतमाल साठवण आणि नासाडी टाळण्यासाठी शासकीय आणि खाजगी क्षेत्रातील गोदामांची संख्या वाढवावी लागेल, जेणेकरून बाजारपेठेतील शेतमालाची मागणी आणि पुरवठा यांचा समतोल राखला जाईल. तसेच बाजारातील कृषी उत्पादनांचा भाव स्थिर ठेवण्यास मदत होईल. यामुळे शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात शाश्वती निर्माण होण्यास मदत होऊन, शेतीला उज्ज्वल भवितव्य मिळण्याशी शक्यता वाढेल. ●●●

**(लेखक : शेती, दुष्काळ, पाणी प्रश्नांचे अभ्यासक असून 'द युनिक फाउंडेशन, पुणे' येथे वरिष्ठ संशोधक आहेत.)**

# अशी झाली मानवी हक्कांची जडण घडण



नागार्जुन वाडेकर

**मानवी हक्क ही संकल्पना काही एका दिवसात अवतरलेली नसून अनेक वर्षांच्या कालखंडात विकसित झालेली आहे. विविध देशांत उदयास आलेल्या संस्कृती, इतिहास, तत्त्वज्ञांचे विचार, स्वातंत्र्यलढे तसेच न्यायालयीन निवाडे इत्यादींच्या योगदानातून माणसांचे हक्क ही संकल्पना रुजत गेली आहे. या लेखात आपण मानवी हक्कांचा इतिहास पाहणार आहोत.**

माणसाला आपले जीवन आनंदी करता यावे, आपल्या व्यक्तित्वाचा विकास करता यावा, सन्मानाने जगता यावे आणि आपले आयुष्य अर्थपूर्ण करता यावे यासाठी त्याच्या भोवतालचे वातावरण पोषक आणि सुरक्षित असणे गरजेचे आहे. या गरजेतून मानवी हक्कांच्या ऐतिहासिक आवश्यकतेतून मानवी हक्क मान्यता पावले आहेत.

**प्राचीन कायदेविषयक संहिता**

हक्कांविषयीच्या संकल्पनांचा बायबल, प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीमध्ये विकास झाला. अनेक पाश्चात्य देशांच्या इतिहासकालीन कायदेविषयक विकासामुळे मानवी हक्कांच्या मूळ उगमांचा शोध घेण्यास मदत झालेली आहे. प्राचीन मध्य पूर्वेच्या इतिहासकालीन राजांच्या काळात नागरिकांच्या आणि व्यावसायिकांच्या नियमनासाठी वेळोवेळी कायदेविषयक संहिता निर्माण करण्यात येत होत्या. त्या दगडावर कोरलेल्या आढळतात. त्यावेळी लोकांची एक सार्वत्रिक समज गृहीत धरली जात असे, की कायदा हा देवाकडून आलेला असतो आणि राजा हा फक्त त्या कायद्याची अंमलबजावणी करणारा प्रशासक असतो. मेसोपोटेमियामधील प्रभावी घराण्यांच्या राजांनी केलेले कायदे कसे विकसित होते गेले ते पाहणे उद्बोधक ठरेल.

**उर-नम्मूची संहिता**

मेसोपोटेमियामध्ये ख्रिस्तपूर्व २४ व्या शतकात उरुकागीना संहितेची निर्मिती झाली होती, असा काही संदर्भग्रंथात केवळ उल्लेख आढळतो. मात्र तिसऱ्या सुमेरिअन घराण्याचा संस्थापक ऊर देशाचा राजानम्मू याने ख्रिस्तपूर्व २०५० च्या कालखंडामध्ये निर्माण केलेल्या सर्वात जुन्या कायद्याची संहिता इराकमध्ये सापडली आहे. यात बहुसंख्य गुन्ह्यांसाठी कठोर दंड अनावश्यक मानला गेला. कारण लोकांनी एकमेकांशी कसे वागावे हे त्यांना समजते असे मानले गेले, तसेच कसे वागावे याचे स्मरण राहावे म्हणून आर्थिक दंड पुरेसा आहे, असे मानले गेले. उर-नम्मूची राजवट शांततापूर्ण होती आणि सभ्यतेच्या प्रत्येक क्षेत्रात या प्रदेशाची भरभराट होत असल्याने हे कायदे प्रभावी ठरले असावेत, असे म्हटले जाते.

**लिपीत-इश्तार संहिता**

इशित घराण्याच्या राजा लिपीत-इश्तारने ख्रिस्तपूर्व १९४० मध्ये कायद्याची एक संहिता निर्माण केली. त्याने सार्वजनिक कामांसाठी लोकांना श्रमदान बंधनकारक केले, योग्य कर आकारणीचे नियम केले, तसेच संपत्तीविषयक वाद, विवाह, वारसा हक्कांसंदर्भातील कायदे केले.



**हम्मुराबी संहिता**

बॅबिलॉन हे त्यावेळचे एक वैश्विक बौद्धिक आणि व्यापार केंद्र होते. इजिप्त आणि ग्रीसपर्यंतच्या सर्व प्रदेशातील लोक ते आकर्षित करत होते. त्यामुळे मेसोपोटेमियामध्ये पाळल्या जाणाऱ्या पारंपारिक कायद्याच्या पद्धतीच्या तसेच इतर देशांच्या कायदेशीर परंपरा किंवा लोकांच्या समजुतीच्या पलीकडे जाणारा कायदा तयार करावा लागणार होता. त्यानुसार बॅबिलोनियन राजा हम्मुराबीने ख्रिस्तपूर्व १७७२ मध्ये एक अधिक तपशीलवार कायदेविषयक संहिता निर्माण केली आणि दगडी खांबावर कोरून ती लोकांना वाचण्यासाठी चौकात स्थापित केली.

**सायरस संहिता**

पार्शियन (इराण) साम्राज्याने राजा सायरसच्या राजवटीमध्ये ख्रिस्तपूर्व ६ व्या शतकात मानवी हक्कांची अभूतपूर्व तत्त्वे प्रस्थापित केली. राजा सायरसने निर्माण केलेल्या वृत्तचित्तीवरील कायदेविषयक संहितेस मानवी हक्कांचा पहिला दस्तऐवज म्हणून पाहिले जाते. त्यानुसार नागरिकांना आपापल्या धार्मिक उपासना व परंपरेची जोपासना करण्यास परवानगी देण्यात आली, गुलामगिरी नष्ट केली,

गुलामांना बांधकाम केल्याचा मोबादला दिला, राज्यकर्त्यांचे राजवाडे पगारी मजुरांकडून बांधून घेण्यात आले, यहुदी धर्माच्या अनुयायांची गुलामगिरीतून मुक्तता केली आणि त्यांना त्यांच्या भूमीवर पुन्हा स्थलांतर करण्यास मुभा दिली याचा उल्लेख आहे. सन १८७९ मध्ये शोधून काढण्यात आलेली ढोलकीच्या आकाराची सदर दगडी वृत्तचित्ती आता ब्रिटिश वस्तूसंग्रहालयामध्ये, तर तिची प्रतिकृती संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयामध्ये ठेवण्यात आलेली आहे.

**सम्राट अशोक शासन**

प्राचीन भारतातील मौर्य साम्राज्याने ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील सम्राट अशोकाच्या राजवटीमध्ये नागरी हक्कांची अभूतपूर्व तत्त्वे प्रस्थापित केली. सम्राट अशोकाने ख्रिस्तपूर्व २६५ मध्ये कलिंगवर स्वारी करून पाशवी विजय मिळविला. या विजयामुळे आनंद होण्याऐवजी झालेली हिंसा, विधवा आणि अनाथ मुलं पाहून सम्राट अशोकाला आपण केलेल्या कृत्याबद्दल अतिशय पश्चाताप झाला आणि त्याचा परिणाम म्हणून त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्या क्षणापासून क्रूर 'अशोक' हा 'पवित्र अशोक' या नावाने ओळखला जाऊ लागला.

सम्राट अशोकाने आपल्या राजवटीमध्ये अहिंसेचे अधिकृत धोरण राबविले. प्राण्यांचा संहार करणे किंवा त्यांचे देह छिन्नविच्छिन्न होण्यास कारणीभूत ठरणारे शिकारी खेळ खेळणे व डाग देणे या प्रथांवर त्याने बंदी आणली. सम्राट अशोकाने कैद्यांवरदेखील दया दाखविली, त्यांना प्रत्येक वर्षी एक दिवस तुरुंगाबाहेर जाण्यास परवानगी दिली. सामान्य नागरिकांस विद्यापीठांमध्ये विनामूल्य शिक्षण देऊ केले. प्रजेला जात-पात, धर्म वा राजकारण यांचा भेदभाव न करता समान वागणूक दिली. मानव व पशू या दोघांसाठी मोफत रुग्णालयांची निर्मिती केली. सम्राट अशोकाने अहिंसेचे पालन करणे, सर्व पंथ आणि धर्मांची सहिष्णुता राखणे, पालकांच्या आज्ञेचे पालन करणे, गुरुजनांचा आदर राखणे, मित्रांशी मैत्रीपूर्ण राहणे, नोकरवर्गास माणुसकीने वागविणे (त्या वेळी भारतामध्ये गुलामगिरी अस्तित्वात नव्हती), सर्वांशी प्रेमाने वागणे अशी मुख्य तत्त्वे लागू केली. या सुधारणा सम्राट अशोकाच्या आज्ञापत्रामध्ये वर्णन करण्यात आलेल्या आहेत. पुढे त्या त्याने साम्राज्यभरात उभ्या केलेल्या 'अशोक स्तंभांवर' कोरल्या आहेत.

अशा तऱ्हेने प्राचीन काळी हक्क आणि कर्तव्ये बहुधा धार्मिक तत्त्वावर पार पाडली जात असत. देवाने मानवाची निर्मिती केलेली आहे, त्यामुळे सर्व मानव समान आहेत, अशी हक्कांविषयीची मर्यादित जाणीव आधुनिक युगापर्यंत प्रबळ होती. मानवी हक्कांची निर्मिती करण्यात आलेली नाही किंवा ते गृहीत धरण्यात आलेले नाहीत, तर ते प्रत्येक व्यक्तीच्या स्वाभिमानावर आणि समानतेवर आधारित आहेत. मानवी हक्क म्हणजे असे सर्व हक्क जे प्रत्येकास निसर्गतःच मिळालेले असतात असे, या घटनाक्रमामुळे यथावकाश स्वीकारण्यात आले. अशा प्रकारे मानवी हक्कांच्या कल्पनेचा विकास विविध मार्गांनी शोधता येऊ शकतो आणि त्याचे अभिजात व आधुनिक विचारसरणी असे वर्गीकरण करता येते.

**अभिजात विचारसरणी**

पाश्चात्य विचारांतून झालेल्या उत्क्रांतीचा मानवी हक्कांच्या



जाणिवेवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला आहे. पाश्चात्य विचारसरणीतील अभिजात परंपरांचा उगम ग्रीक आणि रोमन संस्कृतींमधून शोधून काढता येऊ शकतो. या दोन परंपरांमधील विचारवंतांनी प्रथमच योग्य मार्गाने हक्कांची संकल्पना साकारण्याचा प्रयत्न केला.

**ग्रीक परंपरा**

ग्रीक-रोमन स्टॉईक्स तत्त्ववेत्त्यानी मांडलेल्या नैसर्गिक कायद्याच्या सिद्धांतामध्ये मानवी हक्कांच्या आधुनिक विचारांचे बीज सापडते. स्वाभाविक कायदा हा सर्व मानवांना समानतेने लागू असून तो वैश्विक नैतिक तत्त्वांचा मुख्य भाग आहे, असे स्टॉईक्सनी मांडले. मानवी वर्तनास नैसर्गिक कायद्यानुसार न्याय दिला पाहिजे आणि मानवी वर्तनाचा नैसर्गिक कायद्याबरोबर मेळ घातला पाहिजे. मानवी हक्कांना नैसर्गिक हक्कांइतके महत्त्व प्राप्त झाले. स्वाभाविक हक्क म्हणजे असे हक्क जे स्वभावतः रुजतात.

सॉक्रेटिस आणि प्लेटोच्या ग्रीक परंपरेनुसार, विश्वाचे स्वाभाविक आदेश ज्या कायद्यामध्ये प्रतिबिंबित होतात, अशा कायद्याला नैसर्गिक कायदा असे म्हणतात. ग्रीकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे हक्क (इसोगोरिया), कायद्यासमोरील समानतेचे हक्क (इसोनोमिया) आणि समतेचे हक्क (इसोटीमिया) यांना मान्यता दिली. तथापि, हे हक्क स्त्रिया आणि गुलामांना देण्यास नकार दिला गेला. प्लेटोच्या मतानुसार, प्रत्येकाकडे सद्गुण असतात आणि त्या सद्गुणांनुसार प्रत्येकाचे हक्क आणि कर्तव्ये असतात. ॲरिस्टॉटलच्या मते, जगामध्ये वेगवेगळ्या सामाजिक वर्गांचे अस्तित्व आहे, तसेच त्यात नेहमीच खालच्या जातीच्या आणि गुलाम वर्गाचा समावेश असतो. कायदा ही अधिकारवश तर्कशक्ती आहे आणि कायदे समाजाचे नैतिक संकेत असतात.

ग्रीक परंपरेमध्ये हक्कांची संकल्पना वर्गानुसार होती. समानतेची संकल्पना हक्कांच्या संकल्पनेशी जोडली गेलेली नव्हती. समानतेची संकल्पना हक्कांच्या संकल्पनेशी जोडली गेलेली नव्हती. ग्रीक परंपरेमध्ये गुलामगिरी प्रचलित आणि संपूर्णपणे न्याय्य होती.

हल्लीच्या मानाने त्या वेळी हक्कांची संकल्पना परिपूर्ण नव्हती. पण हक्क हे सर्वांसाठी आहेत आणि कोणत्याही राज्याच्या कायद्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत, ही वस्तुस्थिती मान्य करणे महत्त्वाचे आहे.

**रोमन परंपरा**

रोमन लोकांनी न्यायव्यवस्थेसाठी कायदेशीर नियमावलींच्या स्वरूपातील स्वाभाविक कायद्यासंबंधीच्या स्टॉईक्स सूत्ररूप रचनेचा वापर केला. प्राचीन रोममध्ये नैसर्गिक हक्कांची कल्पना पुढे चालू राहिली. रोमन कायदेपंडित उल्पीमनचा असा विश्वास होता, की कुठलीही व्यक्ती मग ती रोमन असो किंवा नसो, अशा प्रत्येक व्यक्तीस नैसर्गिक हक्क असतात.

रोमचा सर्वात मोठा वारसा म्हणजे त्यांची ज्ञानी न्यायव्यवस्था होय. ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकाच्या मध्यामध्ये रोमन कायद्याच्या विकासास १२ तक्त्यांनी प्रारंभ झाला. एक हजार वर्षांपेक्षा अधिक काळ रोमन कायदेपंडितांनी कायद्याच्या सर्व पैलूंबाबत मूल्यवान अशी साहित्यनिर्मिती केली. उदाहरणार्थ, मालमत्ता, विवाह, पालकत्व आणि करार, चोरी आणि वारसा, इत्यादींच्या संबंधात ही साहित्यनिर्मिती झाली. रोमन कायद्याने बहुतेक पाश्चात्य नागरी आणि फौजदारी कायद्यांचा पाया घातला. रोमन परंपरेतील व्याख्येनुसार, कायदा म्हणजे जे न्याय्य आणि सत्य आहे ते निवडण्याची कल्पना आणि तत्त्व. यामध्ये असेही म्हटलेले आहे, की जेव्हा राज्यामध्ये कायद्याची उणीव भासते, तेव्हा ते खऱ्या अर्थाने राज्य उरत नाही.

**ख्रिस्ती परंपरा**

लॅटिन चर्चचे सर्वात महत्त्वाचे फादर सेंट ऑगस्टिन (३५४–४३०) यांनी बायबलमधील मजकुराच्या आधारावर खाजगी मालमत्तेच्या हक्कांबाबतच्या समस्येविषयी लिहिलेले आहे. त्यांनी या समस्येला गरिबी आणि भुकेची जोड दिलेली आहे. त्यांच्या मते, अल्पसंख्य श्रीमंतांची अधिक संपत्ती मिळविण्याची अभिलाषा आणि जास्तीत जास्त मालमत्तेवर त्यांचे असलेले वर्चस्व हे मानवी समस्येचे मूळ आहे. प्रत्येकास मर्यादित मालमत्तेचे हक्क असतात आणि अशी मालमत्ता निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. राज्य आणि प्रत्येक व्यक्ती यांना केवळ चर्च नीतिमत्तेचा मार्ग दाखवू शकेल, यावर ऑगस्टिनचा विश्वास आहे. हक्कांची ही कल्पना अत्यंत धार्मिक आहे.

प्रभावशाली इटालियन धर्मगुरू सेंट थॉमस ॲक्विनास (१२२४–१२७४) यांच्या मतानुसार, समाजाच्या हितासह स्वाधीन केलेल्या सामायिक फायद्यांसंबंधीचे आदेश म्हणजेच कायदा होय. कायद्याद्वारे हित साधले गेले पाहिजे आणि त्याचे अनुसरण केले पाहिजे आणि वाईट गोष्टी टाळल्या गेल्या पाहिजेत, हा कायद्याचा प्राथमिक हेतू आहे, नैसर्गिक कायद्याच्या सर्व नियमांचा हा पाया आहे. कायदा म्हणजे हेतूशी संबंधित मानवी वर्तणुकीचा नियम आणि आदर्श होय. ॲक्विनास आणि अन्य ख्रिस्ती मानववंशशास्त्रज्ञांनी असे प्रतिपादन केलेले आहे, की दैवी कायदा हा अन्य कायद्यांपेक्षा श्रेष्ठ कायदा आहे. चर्चच्या संस्थेमार्फत दैवी कायद्याची लोकांना जाणीव करून देण्यात आली म्हणून चर्चचे स्थान हे राज्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. राज्य शासनास आणि कायद्यास सामुदायिक हिताचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचे अधिकार असतात, ते त्यांचे कर्तव्य असते.



पुनरुज्जीवन कालावधीमध्ये चर्चच्या अधिकारांचा संकोच होताना आणि त्यानंतर व्यक्तीच्या अधिकारांना अधिक महत्त्व दिले जात असलेले दिसून येते. जसे अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात (४ जुलै १७७६) म्हणतो, की आम्ही ही सत्ये स्वयंस्पष्ट मानतो, की सर्व माणसे समान निर्माण केली गेली आहेत. त्यांना त्यांच्या निर्मात्याने काही अविभाज्य अधिकार दिले आहेत, यापैकी जीवन, स्वातंत्र्य आणि आनंदाचा शोध आहे. हे अधिकार सुरक्षित करण्यासाठी, शासनकर्त्यांच्या संमतीने त्यांचे न्याय्य अधिकार प्राप्त करून शासनाची स्थापना मानवांमध्ये केली जाते, म्हणजे जेव्हा जेव्हा सरकारचे कोणतेही स्वरूप या उद्दिष्टांसाठी विनाशकारी होते, तेव्हा ते बदलणे किंवा रद्द करणे आणि नवीन सरकार स्थापन करणे हा लोकांचा अधिकार आहे. अशा तत्त्वांवर त्याचा पाया घालणे आणि त्यांच्या शक्तींना अशा स्वरूपात संघटित करणे, त्यांच्या सुरक्षितता आणि आनंदात परावर्तीत होण्याची शक्यता जास्त आहे.

तसेच पुढे १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्याचे पहिले कलम म्हणते, की सर्व माणसं स्वतंत्रपणे जन्माला येतात आणि हक्क व प्रतिष्ठेच्या बाबतीत समान असतात. तर्क आणि विवेकाने ते संपन्न असतात आणि त्यांनी एकमेकांशी बंधुभावाच्या भावनेने वागले पाहिजे.

सुमेरिअन ऊर राजा नम्मूच्या ख्रिस्तपूर्व २०५० च्या दगडावर कोरलेल्या कायद्याच्या संहितेमध्ये लिहिल्याप्रमाणे, लोकांनी एकमेकांशी कसे वागावे हे त्यांना समजते असे मानले गेले आहे. हे जवळपास पाच हजार वर्षांचे वर्तुळ इथे पूर्ण होते. आजचा आपला आधुनिक समाज एकमेकांशी सद्सद्विवेकबुद्धीने वागेल अशी आशा करूयात!

**(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत.)**

# मराठी भाषा धोरणाविनाच राज्य किती काळ चालवणार?



डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

**कोणत्याही धोरणाविना राज्य चालवणे हेच जणू राज्यकर्त्या वर्गाचे धोरण झालेले आहे. त्याला कोणत्याही पक्षांची सरकारे निदान महाराष्ट्रात तरी अपवाद ठरलेली नाहीत. तसे नसते तर गेल्या सात वर्षांपासून सरकारकडे प्रलंबित असलेले मराठी भाषा धोरण जाहीर न करता व ते अंमलातच न आणता सरकारने मराठीविषयक निर्णय राज्याच्या कोणत्याही त्याबाबतच्या धोरणाशिवाय घेण्याचे काहीच कारण उरले नसते. अशा कोणत्याही धोरणाअभावी व त्यावर अंमल करणाऱ्या स्वतंत्र कायदेशीर यंत्रणेअभावी घेतले जाणारे निर्णय हे शेवटी कोण घेते? संबंधित सचिव, मराठी भाषा विभाग, प्रशासन संबंधित मंत्री? असा प्रश्नदेखील आपल्या एकाही पक्षाचा निवडून येणारा एकही जनप्रतिनिधी, मग तो आमदार, खासदार, मंत्री कोणीही असो, चुकूनही उपस्थित का करत नाही?**

दरवर्षीप्रमाणे यंदाही २७ फेब्रुवारीला 'नेमेचि येतो मग पावसाळा' पद्धतीने राजभाषा मराठीबाबत उत्सवी आणि व्यासपीठीय कार्य आणि कार्यक्रम, जे प्राधान्याने साह्यकेंद्रीच अधिक आणि भाषाकेंद्री नगण्यच असतात, ते आयोजित करून झाले. अजूनही होतील.




या निमित्ताने मराठीची छान जपणूक करणाऱ्यांची माहिती पुरवणारे लेखही प्रकाशित झाले. लोक आपापल्या व्यक्तिगत पातळीवर आपली भाषा बोलत, जपत, ती टिकवतच असतात, हेदेखील लोकांना कळलेच पाहिजे.

मात्र मराठीची शक्य तितकी अवहेलना नेहमी नेमकी कुठे होते, कोणाकडून आणि कशाकरता व ती तशीच सुरू का राहते, याबाबत मात्र फारसे कोणी लिहीत, बोलत नाही. तरीही तीच ती चारदोन मंडळी, जी मराठीविषयक मागण्या, सूचना, निवेदने, ठराव इ. चा पिच्छा पुरवण्यात तज्ज्ञ समजली जातात, ती मंडळी आपले काम करीतच राहते. शासनही त्याकडे दुर्लक्ष करण्याचे काम निष्ठेने सुरूच ठेवते. याबद्दल आता कोणाच्याही मनात शंका उरलेली नाही.

**हा प्रश्न आपण का विचारत नाही?**

जणू काही सरकारकडे निवेदने देणारी, मागण्या करणारी मंडळी ही तज्ज्ञ, अभ्यासक, विद्वान, लेखक असोत अथवा सामान्य कार्यकर्ते असोत, यांना काही कामच नसल्याने वेळ घालवण्यासाठी ते हे सारे करत असावेत, असा शासनाने जणू समजच करून घेतला आहे. कोणत्याही धोरणाविना राज्य चालवणे हेच जणू राज्यकर्त्या वर्गाचे धोरण झालेले आहे. त्याला कोणत्याही पक्षांची सरकारे निदान महाराष्ट्रात तरी अपवाद ठरलेली नाहीत. तसे नसते तर गेल्या सात वर्षांपासून सरकारकडे प्रलंबित असलेले मराठी भाषा धोरण जाहीर न करता व ते अंमलातच न आणता सरकारने मराठीविषयक निर्णय राज्याच्या कोणत्याही त्याबाबतच्या धोरणाशिवाय घेण्याचे काहीच कारण उरले नसते. अशा कोणत्याही धोरणाअभावी व त्यावर अंमल करणाऱ्या स्वतंत्र कायदेशीर यंत्रणेअभावी घेतले

जाणारे निर्णय हे शेवटी कोण घेते? संबंधित सचिव, मराठी भाषा विभाग, प्रशासन संबंधित मंत्री? असा प्रश्नदेखील आपल्या एकाही पक्षाचा निवडून येणारा एकही जनप्रतिनिधी, मग तो आमदार, खासदार, मंत्री कोणीही असो, चुकूनही उपस्थित का करत नाही?

भाषिक राज्य मुळात आपण संघर्ष करून मिळवली कशासाठी? हा प्रश्न आपले शासन, प्रशासन, मंत्री, आमदार, खासदार यांना आपण का विचारत नाही? सर्व संबंधित प्रश्न हे आता समूह माध्यमांवर चर्चा करणारे एकमेकांनाच तेवढे व तेही अशा थाटात विचारतात, विशेषतः कार्यकर्त्यांनाच,जणू ते मराठीचे काम करतात म्हणून केवळ तेच त्याची उत्तरे देणे लागतात. मराठी भाषिक समाजाचीच मराठीविषयीची ही घोर उदासिनता हीच खरे तर मराठीविषयी सरकारकडे वर्षानुवर्षे केवळ पडून असलेल्या अनेक मागण्या, सूचना, निवेदने, इ. कडे दुर्लक्ष करण्यासाठी सरकारला बळ देणारी बाब झाली आहे.

**...ते आपले कर्तव्य आहे असे वाटतच नाही**

भाषा धोरण जाहीर केले नाही, मराठीला अभिजात दर्जा दिला नाही, मराठी विद्यापीठ स्थापन केले नाही, मराठी ही आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, विकास, रोजगाराच्या संधी यांची भाषा केली नाही, मराठी विषय पदवीपर्यंत ठेवला नाही, मराठी माध्यमाच्या शाळा बंद पाडल्या व पुनः सुरूच केल्या नाहीत, मराठी भाषेच्या सार्वजनिक वापराकडे कितीही घोर दुर्लक्ष केले, शासनाच्या भाषाविषयक तज्ज्ञांचा समावेश असलेल्या संस्था, समित्या, मंडळे यांचे सल्ले केवळ बासनात गुंडाळून ठेवले, त्यांची, त्या संस्था, समित्या, मंडळे, त्यावरील तज्ज्ञांची कितीही उपेक्षा केली, त्यांचा अवमान केला, मराठी भाषा विकास प्राधिकरण स्थापण्याचा कायदा केलाच नाही, मराठीऐवजी इंग्रजी माध्यमाच्या कितीही शाळा सुरू केल्या व मराठीच्या बंद झालेल्या बंदच ठेवल्या, शासनाच्या भाषा, साहित्य, संस्कृतीविषयक संस्थांना स्वायत्तता दिलीच नाही व परस्पर मंत्र्यांनीच निर्णय घेतले, यातले काहीही झाले तरी कोणत्याही पक्षाचा कोणताही उमेदवार मराठीच्या प्रश्नावर निवडून येणार नाही, असे होत नाही. कारण मराठी भाषिक मतदारांना आपली भाषा हा आपला मुळात लोकशाही आणि स्वराज्याशी संबंधित असणारा अधिकार आहे, याचीच जाणीव करून दिली जात नाही. असली तरी तो वापरण्यासाठी आपण काही करणे लागतो व ते केले पाहिजे, ते आपले कर्तव्य आहे असे वाटतच नाही. जिथे हे लेखक, विचारवंत, प्रकाशक, प्राध्यापक वर्गाला, आपल्या तथाकथित शासकीय अनुदानाश्रयी साहित्य संस्थांनाच वाटत नाही, तिथे इतरांना ते वाटावे याचे प्रयत्न करणार तरी कोण?

**अशी ही बेफिकीर वृत्ती?**

राज्यकर्ता वर्ग भाषेच्या प्रश्नावर एखादी तरी निवडणूक हरत नाही तोवर त्यांना कोणताच फरक पडणार नाही. मराठी भाषिक समाजाचाच त्यांच्या राज्यकर्त्यांवर, जनप्रतिनिधींवर काडीचाही दबाव नाही. जनप्रतिनिधींचा या संदर्भात कार्यकर्ते, तज्ज्ञ, संस्था इ. शी काडीचाही संवाद नाही. ते तो राखूही इच्छित नाहीत. लोकही तो राखायला त्यांना बाध्य करत नाहीत. कारण काही संस्थांना, संमेलनांना लाख, कोटी दिले, लेखकांना, पारितोषिके, लाभांचे वितरण केले आणि लोकांचे मनोरंजन करणारे, गर्दीचे, करमणूकप्रधान कार्यक्रम कितीही रिकाम्या खुर्च्यांसमोर घेतले तरी मराठीचे जणू फार मोठे काम केले, अशी त्यांची धारणा आपणच करून दिली आहे. या दुष्टचक्रात अडकून पडण्याचे सुख कोणालाच त्यागायचे नाही आहे आणि तरीही झालेच तर मराठीचे आपल्याला खार न लागताच भले व्हावे, अन्यथा नाही झाले तरी काही फरक पडत नाही, अशी ही बेफिकीर वृत्ती आहे. तरीही केवळ राज्यकर्ते, राजकारणी व प्रशासन यांनाच तेवढे दोषी धरणे हा मराठी भाषिकांचा आवडता छंद आहे. दुसरा छंद मराठी भाषिक इंग्रजीचा दु:स्वास कसा करतात हे सांगण्याचा आहे.

समाज म्हणून, जबाबदार मराठी भाषिक नागरिक म्हणून आपली काही व्यक्तिगत पातळीवरील मराठी जपण्याव्यतिरिक्त काही सामाजिक, संस्थात्मक कर्तव्ये आहेत व ती आपण पार पाडली पाहिजेत. सरकारवर आपल्या भाषिक, सांस्कृतिक अधिकारांचा वापर करणारा संघटित दबाव वाढवला पाहिजे, असे जर कोणाला वाटतच नसेल, तर यातले काहीच आपोआपच होणार नाही.

**यंत्रणांचे अधिकाधिक केंद्रीकरणच केले जाते**

भाषिक अधिकार हा मानवाधिकारांचा भाग आहे. विकासाचा अधिकार हा जसा मानवाधिकार म्हणून गृहीत आहे, तसा भाषिक, सांस्कृतिक विकास हादेखील विकासाचाच अपरिहार्य भाग असल्याने तोदेखील मानवाधिकाराचा गृहीत भाग आहे. मुळात आपले अस्तित्व, आपली ओळख, आपले असणे हेच, आपली भाषा, भाषिक संस्कृती सिद्ध करत असते. सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाचा आग्रह हा सकारात्मक असण्याचा अर्थच ज्याची त्याची ओळख, अस्तित्व पुसून टाकले न जाता, अनिष्ट, अवांछित, असांस्कृतिक, अविवेकी, अशास्त्रीय बाबींच्या विरोधातले इष्ट वर्तन असाच आहे.

मानवी प्रतिष्ठा आणि व्यक्तीचे भाषिक, सांस्कृतिक स्वातंत्र्य आणि अस्मिता हे मराठी भाषिक समाजाला, त्यांच्या संस्थांना उपभोगताच का येत नाही? शासन, प्रशासनदेखील ते जपण्यात हतबलच ठरते आहे ते का, याचा विचारदेखील करायला तो तयार नाही.

विशिष्टच वैचारिक छापाचीच तेवढी ओळख व तिचा आग्रही प्रचार हा भाषा, संस्कृती, भाषिक, सांस्कृतिक मानवाधिकार यांना नेहमीच बाधक ठरत असतो. राज्याने जे निर्णय घ्यायला हवेत, ते निर्णय घेण्याचे राज्य टाळते, सतत पुढे पुढे ढकलते. राज्याचे स्वतःचेच सांस्कृतिक धोरण दहा-दहा वर्षे विनाअंमल, त्यासाठी एक पैशाचीही स्वतंत्र तरतूद न करता स्थगितच ठेवले जाते व त्याबाबतीत कोणीच कोणाला जाबही विचारत नाही. राज्याचे तयार असलेले भाषा धोरण जाहीर करण्याचे टाळलेच जाते. भाषिक, सांस्कृतिक मानवाधिकार जपले जाण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर यंत्रणा निर्माण करण्याचे टाळले जाते. अस्तित्वात असलेल्या यंत्रणांना स्वायत्त दर्जा देण्याचे, त्यांचे विभागीय विकेंद्रीकरण टाळत, लोकसहभाग वाढवण्याचे टाळत उलट त्यांचे अधिकाधिक केंद्रीकरणच केले जाते.

यात भर पडली आहे ती जागतिकीकरणाची, बहुसंख्याकवादी

राजकारण संरक्षित करण्यात गुंतलेल्या हितसंबंधांची. त्याचा सर्वाधिक परिणाम स्वभाषा, स्वभाषा माध्यम व संस्कृती यांचे उन्मूलन होण्यावर होतो. असे सांगितले जाते, की इंग्रजी, स्पॅनिश, अरेबिक, रशियन, चायनीज, बंगाली, मराठी, या भाषिकांची लोकसंख्या ही जगाच्या एकूण लोकसंख्येच्या अर्धी असूनही प्रत्यक्षात मात्र त्या बोलल्या जाण्याचे प्रमाण ०.१ ते ०.१५ टक्का एवढे होते आहे. जगातील एकूण भाषांपैकी २५ टक्के भाषा ०.०२ टक्का लोकांचे प्रतिनिधित्व करतात आणि आज अस्तित्वात असलेल्या भाषांपैकी अर्ध्याहून अधिक भाषा या शतकाच्या अंतापर्यंत, त्यांच्या जतन, संवर्धनाअभावी संपुष्टात येणार आहेत.

असे असूनही स्वभाषा माध्यमातून शिक्षणाचा आग्रह हा शास्त्रीय असला तरी राज्यकर्ते मात्र या शास्त्रीय बाजूने उभे नाहीत आणि उच्चभ्रू वर्ग हा इंग्रजीच्या दु:स्वासाचा आरोप करीत राहतो. याचा अर्थ, भाषिक, सांस्कृतिक अधिकार हा मानवाधिकाराचा भाग समजून जपलाच जात नाही असाच होतो. तो जपला जाणे आवश्यक आहे. भाषिक, सांस्कृतिक अधिकार याबाबतची मराठी भाषिक समाजाची साक्षरता त्यासाठी वाढवणे गरजेचे आहे.

**राज्यकर्त्या वर्गाचे हितसंबंध इंग्रजीत गुंतलेले!**

जागतिकीकरणाचे भीषण आणि भयावह उद्दिष्ट हे संपूर्ण जग एकसारख्या मेंदूचे, रूची, अभिरूचीचे, त्यासाठी एकाच भाषेचे तसेच एकाच आर्थिक-सांस्कृतिकतेचे करण्याचे आहे.अर्थात, ही भाषा व संस्कृती केवळ आणि केवळ इंग्रजी आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

**इंग्रजीचा असा वाढता वंशवाद आणि अन्य भाषांचे त्यायोगे उन्मूलन ही जागतिकीकरणाची परिणती आहे, हे अध्ययनपूर्वक दाखवून देणारे कितीतरी ग्रंथ उपलब्ध आहेत. मात्र राज्यकर्त्या वर्गाचे हितसंबंध स्वभाषेत नव्हे, तर इंग्रजीत गुंतलेले आहेत.**

स्थानिक भाषा, संस्कृती व समाज यांचे नियंत्रण हे जागतिक बाजाराने तथाकथित विकासाच्या नावावर करण्याचे आता गृहीतच धरण्यात आलेले आहे. त्याच्या बदल्यात स्वभाषा आणि संस्कृती जपण्याचे व्यक्तींचे अधिकार गहाण टाकण्याची किंमत मोजूनच हे केले जात असेल, तरी त्यात काही गैर आहे असे स्थानिक शासन, प्रशासन, लोक, राज्ययंत्रणा, विचारवंत इत्यादींना वाटू नये, ही सर्वाधिक गंभीर बाब आहे.

स्वभाषा व संस्कृती या त्यामुळे क्षयग्रस्त झाल्या असून हा रोग दूर सारायचा तर भाषिक, सांस्कृतिक अधिकार, भाषा व संस्कृती आधारित विकास, त्यासाठी संस्थात्मक यंत्रणा यांचा आग्रह धरला जाणे याला अन्य पर्याय नाही.

**यंत्रणांना अधिकाधिक क्षीण केले जाते**

प्रचंड भांडवली गुंतवणुकीतून प्रचंड अनिर्बंध नफा कमावून देणाऱ्या विकासाची चटक लागलेल्यांच्या हाती त्यांना हवे तसे सोयीचे कायदे करून देणारी राज्य यंत्रणा आल्याने, तिला खूष राखणारे अशा विकासाला दिवास्वप्न म्हणून निकालात काढू बघताहेत हेदेखील लक्षात घेतले पाहिजे. मात्र हे गृहीत धरूनच युनेस्कोच्या २००५ च्या संबंधित परिषदेने सदस्य राष्ट्रांवर, भाषिक, सांस्कृतिक विविधतेचे संरक्षण करण्याची जबाबदारी टाकलेली आहे. ही भाषिक, सांस्कृतिक मानवाधिकार जपण्याची जबाबदारी आहे. मात्र सदस्य राष्ट्रे कागदावर धोरणे तेवढी आखून ती पार पाडण्याचे पुरावे देत असली, तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणाच निर्माण करत नाहीत. ज्या आहेत त्यांना सक्षम आणि समर्थ न करता अधिकाधिक क्षीण केले जाते. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण हे तर याचे साक्षात उदाहरण आहे. भाषिक, सांस्कृतिक संबंधात शासनाने नेमलेल्या तज्ज्ञ समित्यांचे अहवाल आणि शिफारशी वर्षानुवर्षे तशाच धूळ खात ठेवल्या जातात. तयार करून घेतलेली धोरणेदेखील वर्षानुवर्षे जाहीर केली जात नाहीत. महाराष्ट्र राज्याचे तयार असणारे पण जाहीरच केले जात नसलेले भाषाधोरण हेदेखील याचे एक महत्त्वाचे उदाहरण.

**तिसरीच संस्था निर्माण करण्याचा घाट**

अजून एक तितकेच किंबहुना त्याहूनही महत्त्वाचे उदाहरण म्हणजे राज्य मराठी विकास संस्था आणि राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचे विसर्जन करून तिसरीच संस्था निर्माण करण्याचा जो घाट घातला गेला होता ते. हा घाट प्रशासनाची सोय, पदांची संख्याकपात आणि खर्च वाचवून दाखविणे यासाठी घातला गेला होता. मुख्य म्हणजे हा घाट एका थोर विभूतीला पुढे करून त्यांच्यामार्फत घालण्यात आला होता व त्यांनीही त्यासाठी त्यांचा उपयोग करून दिला होता. मात्र भाषिक, सांस्कृतिक मानवाधिकारांच्या संबंधात सजग असणाऱ्यांनी तो प्रयत्न वेळीच हाणून पाडला होता. राज्यभर भाषा, साहित्य, संस्कृती क्षेत्रात त्या निर्णयाला प्रचंड विरोध केला गेला. विरोधाची धार एवढी तीव्र होती, की महाराष्ट्र सरकारला त्याची दखल घ्यावीच लागली होती. त्या निर्णयाचे पुढे काय करायचे किंवा कसे, यासाठी शासनाने एक समिती नेमली होती. त्या समितीने दिलेल्या मुदतीत आपले काम करून शिफारशी आणि अहवाल २०१३ मध्येच सादर केलेला होता. त्यातल्या शिफारशी यापुढील किमान पन्नास वर्षे तरी भाषिक, सांस्कृतिक अधिकारांचे जतन करणाऱ्या महत्त्वाच्या संस्थात्मक यंत्रणा उभारून भाषिक, सांस्कृतिक विकास साधणाऱ्या होत्या. त्या काय होत्या व पुढे त्याचे काय झाले हे ठाऊक करून घेणेही आवश्यक आहे.

या राज्यातील भाषिक समाजाचे भाषिक, सांस्कृतिक अधिकार जपले जाणे यासाठी जर पायाभूत साधनसामुग्री, संस्थात्मक यंत्रणाच राज्य निर्मितीनंतर साठ वर्षे होऊनही निर्माणच केल्या जात नसतील, तर हा भाषिक समाज त्याच्या भाषिक, सांस्कृतिक विकासाच्या अधिकारांपासूनच वंचित राखला जातो आहे, असा याचा अर्थ होतो. शासनाला हे भान आणून देण्याची ज्यांची जबाबदारी आहे, तो वर्गदेखील याला तितकाच जबाबदार आहे. कारण त्यालाही याचे गांभीर्य नाही. तोदेखील पुरेसा भाषा आणि संस्कृतीसाक्षर नाही. केवळ शासन, प्रशासनाला दोष देऊन, त्यांच्याकडेच तेवढे बोट दाखवून सुटणारे हे प्रश्न नाहीत. ●●●

**(लेखक अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष आहेत.)**

# काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह : एका ऐतिहासिक सत्याचे अधोरेखन



डॉ. अनमोल शेंडे

**आजही आंबेडकरवादी समाजाच्या हक्कांकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले जाते. दिवसेंदिवस जातीधर्मांच्या अस्मिता टोकदार होताना दिसतात. जातीधर्मांच्या नावावर अनेक पातळ्यांवरून शोषण केले जाते. देश समृध्द व्हावा असे वाटत असेल तर समतेशिवाय पर्याय नाही. सर्वांना समान लेखल्याशिवाय, समान हक्कांची वाटणी केल्याशिवाय पर्याय नाही. बाबासाहेबांनी उभारलेले काळाराम मंदिर प्रवेशाचे आंदोलन याच बाबी अधोरेखित करणारे होते. खरे तर, विषमतेची मुळे उद्ध्वस्त करून देशाच्या उन्नतीचा निरभ्र नकाशा तयार करणारे हे आंदोलन होते; परंतु या सत्याग्रहामध्ये स्पृश्य हिंदूंची टोकाची विकृत मानसिकता समोर आली.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हक्क आणि अस्मितेसाठी अनेक आंदोलने केली. त्यामध्ये २० मार्च १९२७ रोजी महाड येथील सार्वजनिक चवदार तळ्याचे पाणी अस्पृश्यांना प्राशन करता यावे यासाठी केलेला सत्याग्रह होता. २५ डिसेंबर १९२७ रोजी हिंदू धर्मातील भेदभाव आणि शोषणाला समर्थन देणाऱ्या तसेच स्त्रियांना गुलामीत ढकलणाऱ्या मनुस्मृती दहनाचा सत्याग्रह होता. अमरावती येथील प्राचीन अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून पंजाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली २६ जून १९२७ रोजी केलेला सत्याग्रह होता. तर २ मार्च १९३० ला अस्पृश्यांना नाशिक येथील काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून केलेला सत्याग्रह होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले हे सर्वच सत्याग्रह एका विशिष्ट भूमिकेतून आकारास आलेले होते. परंपरेने ग्रासलेल्या भारतीय मनोवृत्तीचे दर्शन घडविणारे हे सर्व सत्याग्रह होतेच; किंबहुना न्याय आणि अन्याय याची स्पष्ट सीमारेषा अधोरेखित करणारेही हे सत्याग्रह होते.

**अनेक अधिकारांपासून अस्पृश्य समाजाला वंचित ठेवले गेले**

अस्पृश्य समाज हा हिंदू समाजाचा एक भाग मानला जात असला, तरी असंख्य सोयी- सवलतींपासून आणि अनेक अधिकारांपासून या समाजाला वंचित ठेवले गेले. सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक अशा अनेक क्षेत्रांतर्गत येणाऱ्या लाभांपासून अस्पृश्य समाजाला मुद्दामहून दूर ठेवले गेले. जगाच्या पाठीवर गोऱ्यांनी निग्रोंवर अनन्वित अन्याय- अत्याचार केलेत. माणूस म्हणून त्यांचे अधिकार हिरावून घेतलेत. माणुसकीलाच शिसारी यावी अशी गुलामगिरी निग्रोंच्या वाट्याला आली. भारतीय समाजामध्येही चातुर्वर्ण्य व्यवस्थेने गुलामगिरीचे प्रदर्शन मोठ्या दिमाखदार पद्धतीने केले. गुलामगिरीच्या पिंजऱ्यातून अस्पृश्य समाज बाहेर येऊ नये म्हणून अनेक क्लृप्त्या लढविल्या. अशा या गुलामगिरीला संपूर्ण ताकदीनिशी आग लावण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषाने केले. गुलामगिरीच्या दुष्ट व्यवस्थेत वर्षानुवर्षांपासून खितपत पडलेल्या अस्पृश्य समाजाला बाहेर आणण्याचे महत्कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यासाठी त्यांना फार मोठ्या संघर्षाला सामोरे जावे लागले.

**राजकीय हक्क मिळवण्याकडे बाबासाहेबांचा अधिक कल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी जे लढे

उभारले, त्यामध्ये नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश लढ्याचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. भेदाभेदावर अखंड विश्वास ठेवणाऱ्या हिंदूंना जाग यावी, इंग्रजांनाही या विषमतेचे दर्शन व्हावे आणि अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या शोषितांच्या अधिकाराचे जाहीर प्रदर्शन करावे, या हेतूपोटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा लढा उभारला. या लढ्याची सुरुवात बाबासाहेबांनी २ मार्च १९३० ला केली आणि पुढील तब्बल पाच वर्षे हा लढा चालला. बाबासाहेबांच्या काही अनुयायांना ही जाणीव झाली, की काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळत नाही, काळाराम मंदिर प्रवेशापासून अस्पृश्यांना रोखले जाते. त्यामुळे १९२९ साली नाशिक येथील बाबाासाहेबांच्या अनुयायांनी बाबासाहेबांना विनंती केली, की आपण हा लढा उभारला पाहिजे आणि या लढ्याचे नेतृत्व बाबासाहेबांनी स्वत: करावे. खरे तर, सुरुवातीला या लढ्याचे नेतृत्व करण्यासाठी बाबासाहेबांनी नापसंती दर्शविली. कारण मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह करण्यापेक्षा राजकीय हक्क मिळवण्याकडे बाबासाहेबांचा अधिक कल होता; परंतु अनुयायांचा आग्रह पाहून बाबासाहेबांनी या लढ्याचे नेतृत्व करण्यासाठी सकारात्मकता दर्शविली.

**हा सारा प्रकार अस्पृश्यांना डिवचण्याचा**

म मंदिराच्या या लढ्यात सुमारे एक हजार लोकांनी आपली नावे नोंदवली. नाशिक जिल्ह्यातील महारांचा संघही स्थापन करण्यात आला. पुरूषांबरोबर स्त्रियाही या लढ्यात अग्रेसर होत्या. भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे, पतीत पावन दास, शंकरदास बुवा यांचा या लढ्यात प्रमुख सहभाग होता. हे दलितांचे प्रतिनिधी म्हणून लढ्यात सहभागी झाले होते. गंगाधरराव सहस्त्रबुद्धे, बाळासाहेब खेर, डी.व्ही. प्रधान, देवराव नाईक, स्वामी आनंद बाळकृष्ण, जनार्दन मराठे ही सर्व दलितेतर मंडळी बाबासाहेबांना सहकार्य करण्यासाठी तत्पर होती. ३ मार्च १९३० रोजी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली सुमारे ३०० लोकांचे पथक काळाराम मंदिराजवळ मिरवणुकीने आले. हा लढा मंदिर व्यवस्थापनाला पूर्वसूचना देऊन शिस्तबद्ध पद्धतीने लढला गेला. शांततेने पुकारलेल्या या लढ्यात सहभागी लोकांना मंदिर प्रवेश नाकारला, तर सत्याग्रह करण्याचा इशाराही मंदिर व्यवस्थापक समितीला देण्यात आला. सत्याग्रही मंदिराजवळ पोचताच पुजाऱ्यांनी देवळाचे दरवाजे बंद केले. जिल्हाधिकाऱ्यांनी तसा आदेश पुजाऱ्यांना दिला होता. प्रत्येक वर्षी रामनवमीला रथयात्रेत रथ ओढून नेण्याच्या प्रक्रियेत सवर्णांबरोबर दलितही सहभागी होत असत. तशी परंपरा वर्षानुवर्षांपासून चालत आलेली होती; परंतु या वेळेला नियोजन आखून आणि दलितांना डावलून सनातन्यांनी रथ व विमान आधीच ओढून नेण्यास प्रारंभ केला. अस्पृश्यांना डिवचण्याचा हा सारा प्रकार होता.

**सत्याचा आग्रह धरणाऱ्या दलित बांधवांनाच घेतले ताब्यात**

सनातन्यांनी रथ व विमान आधीच ओढून नेल्यामुळे आणि अस्पृश्यांना बाजूला केल्यामुळे अस्पृश्य मंडळी रथाच्या मागे धावायला लागली; परंतु सवर्णांना हे आवडले नाही. अस्पृश्य मंडळींना या प्रक्रियेत सामील करून घ्यायचेच नाही हा त्यांचा इरादा पक्का होता. त्यामुळे सवर्णांनी अस्पृश्य मंडळींना दगडाने मारणे सुरू केले. या दगडांच्या वर्षावात महार जसे जखमी झाले तसे काही सवर्णही जखमी झाले. या घटनेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कमालीचे व्यथित झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई येथे जाऊन गृहमंत्री अर्नेस्ट हॉटसन यांची भेट घेतली; परंतु बाबासाहेबांच्या भेटीची त्यांनी फारशी दखल घेतली नाही. त्यामुळे २५ मे १९३० रोजी बाबासाहेबांनी सत्याग्रह तहकुब करण्याचा अनिच्छेने का होईना पण निर्णय घेतला; परंतु ही तात्पुरतीच प्रक्रिया होती. कारण काळाराम मंदिर प्रवेशाबाबत अस्पृश्य बांधव अधूनमधून जनजागृती करीत होतेच! सभा भरवणे, जनजागृती करणे, प्रचार करणे या कार्यात सत्याग्रहींनी कुठेच खंड पडू दिला नाही. शिवाय मंदिर प्रवेश चळवळ परत सुरू करावी, हा विचार बाबासाहेबांच्या डोक्यात अधूनमधून येतच होता. त्यासाठी ते १४ मार्च १९३१ ला नाशिकला गेले आणि ही चळवळ परत सुरू करण्याबाबत कार्यकर्त्यांसमोर सूतोवाच केले. ५ नोव्हेंबर १९३१ रोजी ५ हजार अस्पृश्यांची मिरवणूक काळाराम मंदिराच्या दिशेने शांततेने काढण्यात आली. दलितांना जर प्रवेश मिळत नसेल तर सवर्णांनाही मंदिर प्रवेश मिळू नये, यासाठी दलितांनी मंदिराभोवती पहारा दिला; परंतु पुजाऱ्यांनी आपल्या घरातून सवर्णांना प्रवेश दिला आणि दलित बांधव चिडले. आपल्यालाही प्रवेश मिळावा म्हणून दलितांनी पुजाऱ्यांच्या दरवाज्यातून मंदिरात प्रवेश करण्यासाठी जबरदस्तीने प्रयत्न केला. सवर्णांच्या आणि पुजाऱ्यांच्या बाजूने कायदे असल्यामुळे पोलिसांनी सत्याचा आग्रह धरणाऱ्या दलित बांधवांनाच ताब्यात घेतले. ४ जानेवारी १९३२ ला दीडशे दलित सत्याग्रही जेव्हा मंदिराजवळ आले, तेव्हा सनातन्यांनी या दलित सत्याग्रहींवर पुन्हा दगडांचा मारा केला, त्यांना हुसकावून लावले. १५ एप्रिल १९३२ रोजी अस्पृश्यांनी रामनवमीच्या दिवशी काळाराम मंदिरात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. या वेळेला १४ महिला व १४ पुरूषांना अटक केली गेली. इतकेच नाही तर तीन महिन्यांची शिक्षाही सुनावण्यात आली.

**अस्पृश्य बांधवांच्या भूमिकेचे समर्थन**

काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा न्याय-अन्यायाची स्पष्ट सीमारेषा प्रदर्शित करीत असल्यामुळे हा लढा अविरत सुरू ठेवावा, असे अस्पृश्य बांधवांना सारखे वाटत होते. सवर्णांनी मंदिरात प्रवेश करायचे आणि आपल्याला मात्र काळाराम मंदिर प्रवेशाची अनुमती असू नये ही परंपरा अस्पृश्य बांधवांना अन्यायकारक वाटत होती. न्याय-अन्यायाचे हे तर्कशास्त्र बाबासाहेब चांगल्या पद्धतीने समजले होते. त्यामुळे त्यांनी अस्पृश्य बांधवांच्या या भूमिकेचे समर्थन तर केलेच; शिवाय या सत्याग्रहाचे नेतृत्वदेखील त्यांनी आपल्या शिरावर घेतले. काळाराम मंदिर प्रवेशाच्या भूमिकेवर सनातनी संतप्त झाले असले, तरी तोडीस तोड उत्तर देण्यासाठी अस्पृश्य बांधव जराही मागे हटले नाहीत. जेव्हा-जेव्हा आवश्यकता वाटली, तेव्हा-तेव्हा अस्पृश्यांनी सनातन्यांच्या या नीच वृत्तीला कडाडून विरोध केला, जशास तसे उत्तर दिले. २४ मार्च १९३४ रोजी रामनवमीला काळाराम मंदिर प्रवेशाची ही चळवळ पुन्हा जोमाने सुरू करावी, असा विचार बापूसाहेब राजभोज यांच्या मनात आला. भाऊराव गायकवाड यांच्यासोबत त्यांनी चर्चा केली. भाऊराव गायकवाड यांनी यासंदर्भात बाबासाहेबांना पत्र पाठवले; परंतु या वेळेला मात्र बाबासाहेब काळाराम मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाची चळवळ पुन्हा

हाती घ्यावी, या विचारात नव्हते. कारण हा सत्याग्रह मार्च १९३० ते ऑक्टोबर १९३५ एवढ्या दीर्घकाळपर्यंत लढला गेला. हा लढा इथेच थांबवण्यामागे बाबासाहेबांच्या काही स्पष्ट भूमिका होत्या. अस्पृश्यांच्या भल्यासाठीचे काही निश्चित धोरणे होती.

**हा सामाजिक समतेचा प्रश्न होता**

काळाराम मंदिर प्रवेश करण्यामागे बाबासाहेबांची दूरदृष्टी उभी होती. ईश्वर वा मोक्ष या संकल्पना तर बाबासाहेबांना अत्यंत खुळचट वाटत होत्या. उच्चवर्णीयांनी स्वत:चे उखळ पांढरे करण्याकरिता असंख्य भाकडकथा निर्माण केल्यामुळे देव आणि देवळे बाबासाहेबांच्या परिवर्तनवादी मनाने केव्हाच निकालात काढले होते. हिंदू समाजाचे आपण समान घटक असूनही नाशिकच्या काळाराम मंदिरात आपल्याला का प्रवेश मिळू नये, हा बाबासाहेबांचा खडा सवाल होता. हा सामाजिक समतेचा प्रश्न होता. हिंदू धर्मातील विषम परंपरेने याआधीही आपल्या अनेक पिढ्या गारद केल्या. यात देवाने कुठलीही ढवळाढवळ केली नाही. कारण विनाकारण उभा केलेला देव नावाचा हा निर्जीव बागुलबुवा काहीच करू शकत नाही याचा चांगला अभ्यास बाबासाहेबांनी केला होता. देव आणि धर्माच्या नावाने अस्पृश्यांचे शोषण करीत रहावे हाच एक अजेंडा घेऊन हजारो वर्षे वैदिक संस्कृतीने कुठलाही गुन्हा नसताना अस्पृश्यांचे प्रचंड हाल केले. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश करायचा ते केवळ स्पृश्यांच्या बरोबरीने आपला हक्क बजावता यावा म्हणून बाबासाहेबांनी ही चळवळ सुरू केली. त्यामुळेच 'आज आपण मंदिर प्रवेश करणार आहोत, मंदिर प्रवेशाने तुमचा प्रश्न सुटेल असे मुळीच म्हणता येत नाही' मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाला आरंभ करताना २ मार्च १९३० रोजी अशा पध्दतीने बाबासाहेबांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती.

**परंतु गांधीजींनी आपली भूमिका जाहीर केली नाही**

म मंदिरात अस्पृश्य बांधवांना प्रवेश नाकारणे हा या देशाचा काळाकुट्ट इतिहास आहे. शिवाय अस्पृश्यांनी मंदिर प्रवेश करू नये यासाठी हिंदूंनी ज्या क्लृप्त्या लढवल्या त्या अत्यंत घाणेरड्या होत्या. अस्पृश्यांच्या बाबतीत स्पृश्य हिंदूंच्या मनात कसे चौफेर विष दाटून आहे, हेच या आंदोलनाने पुन्हा एकवार सिद्ध केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा महापुरूष नाशिक काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह का करतो? हा सत्याग्रह करण्याची त्याला का गरज वाटते आहे? हे हिंदूंनी जराही लक्षात घेतले नाही. अर्थात, कुठल्याही परिस्थितीत बाबासाहेबांचे त्यांना ऐकायचेच नव्हते. खऱ्या-खोट्यांमधील फरक त्यांना जाणून घ्यायचाच नव्हता आणि समतेच्या मार्गातील अवरोध आणखी पक्के करायचे होते. समता-विषमतेची ही लढाई सुरू ठेवण्यातच त्यांना स्वारस्य होते. खरे तर, या लढ्यासंदर्भात महात्मा गांधींची भूमिका निर्णायक ठरली असती. कारण महात्मा गांधींना मानणारा मोठा वर्ग या देशामध्ये होता; परंतु गांधीजींनी आपली भूमिका जाहीर केली नाही. बाबासाहेबांच्या लढ्यातील सहकारी भाऊराव गायकवाड यांनी गांधीजींना एक पत्र पाठविले आणि या पत्रातून काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहास पाठिंबा देण्याची विनंती केली होती; परंतु 'मंदिर प्रवेशाचा प्रश्न हाती घेण्याची ही योग्य वेळ नाही' असे उत्तर गांधीजींनी दिले होते. गांधीजींना अस्पृश्यता मान्य नसली तरी चातुर्वर्ण्य व जातीव्यवस्थेच्या विरुद्ध जाण्यास ते तयार नव्हते. वेद, गीता, स्मृतीही त्यांना पूज्यनीय वाटत. परंपरेला थेट छेद देणे गांधीजींच्या तत्त्वात बसणारे नव्हते. जुजबी आणि नाममात्र सुधारणा करण्याकडेच त्यांचा अधिक कल होता. दलित वर्गाला मिळालेले राखीव हक्क गांधीजींना पसंत पडले नाहीत. हे हक्क रद्द करण्यासाठी त्यांनी २० सप्टेंबर १९३२ ला आमरण उपोषण सुरू केले. त्यासाठी त्यांनी प्राण पणाला लावले; परंतु अशी आक्रमक भूमिका बाबासाहेबांनी चालविलेल्या काळाराम मंदिर प्रवेश चळवळीबद्दल त्यांना घ्यावीशी वाटली नाही. अस्पृश्य बांधवांच्या मंदिर प्रवेशाला असलेल्या स्पृश्य हिंदूंच्या भूमिकेचा विरोध त्यांना करावासा वाटला नाही.

या देशाच्या राजकीय प्रक्रियेत काँग्रेसचे फार मोठे स्थान होते. अनेक महत्त्वाचे विषय सहजरित्या मार्गी लावण्याची काँग्रेसमध्ये क्षमता होती. नाशिक येथील काळाराम मंदिर व पुण्याचा पर्वतीचा सत्याग्रह फार दीर्घकाळ म्हणजे १९३५ पर्यंत डॉ. आंबेडकरांनी चालविला होता. रंगा अय्यर यांनी १९३३ मध्ये केंद्रीय कायदेमंडळात मंदिर प्रवेश बिल सादर केले. हे बिल अत्यंत महत्त्वाचे होते. या बिलास काँग्रेसच्या सदस्यांनी प्रारंभी अनुकूलता दर्शविली; परंतु याच वेळेला नवीन निवडणुका घेण्याकरिता कायदेमंडळ बरखास्त करण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्यावेळेला लगेच कायदेमंडळातील काँग्रेस सदस्यांनी अस्पृश्यांच्या या महत्त्वपूर्ण मंदिर प्रवेश बिलास दिलेला पाठिंबा काढून घेतला. खरे तर, काँग्रेस सदस्यांची ही भूमिका हिंदू समाजाच्या बुरसटलेल्या मानसिकतेला बळकट करणारी तर होतीच; शिवाय समतेच्या लढ्यावर प्रश्नचिन्हही निर्माण करणारी होती. अस्पृश्यांनी चालविलेल्या या सामाजिक लढ्याला खो देणारी ही भूमिका होती. शेवटी नाईलाजास्तव रंगा अय्यर यांना हे बिल परत घ्यावे लागले.

**उच्चवर्णीय हिंदूंनी आम्हांला कुत्र्यामांजरांपेक्षाही हीन लेखले**

काळाराम मंदिर प्रवेशाची चळवळ चालविताना बाबासाहेबांची भूमिका हीच होती, की त्या निमित्ताने सामाजिक समतेचा हक्क बजावता यावा. ही मानवतेची चळवळ आहे आणि ही चळवळ विरोधाकरिता विरोध करणारी नसून माणुसकीचे हक्क प्रस्थापित करू पाहणारी ही चळवळ आहे. 'शेकडो वर्षे उच्चवर्णीय हिंदूंनी आम्हाला माणुसकीच्या हक्कांपासून दूर ठेवले, तेच हिंदू आपल्याला माणुसकीचे अधिकार देण्यास तयार आहेत की नाही, हाच एक प्रश्न या मंदिर प्रवेश सत्याग्रहातून निर्माण होणार आहे. हिंदू मन खऱ्याखुऱ्या माणसाला माणूस मानायला तयार आहे की नाही, हाच प्रश्न या सत्याग्रहातून दृष्टोत्पत्तीस येणार आहे. उच्चवर्णीय हिंदूंनी आम्हांला कुत्र्यामांजरांपेक्षाही हीन लेखले. पण आता तरी तेच हिंदू आपल्यासारख्या माणसांना माणूस म्हणून किंमत देणार आहेत की नाही, याच प्रश्नाचे उत्तर आपल्याला या सत्याग्रहातून मिळणार आहे,' ही बाबासाहेबांची स्पष्ट भूमिका होती. कारण मंदिरातला दगड हा निर्जीव आहे. त्याचे दर्शन केल्याने, पूजा केल्याने हाती काही लागणार नाही. शिवाय त्यामुळे काही मूलभूत प्रश्न सुटण्यासही मदत होणार नाही, हे बाबासाहेबांना पक्के ठाऊक होते. या देवांनी आजपर्यंत कुणाचे काही भले केले नाही. केवळ हिंदूंचे मतपरिवर्तन करणे आणि समानतेचा आवाज बुलंद करणे हा एकमेव उद्देश या मंदिर

प्रवेश आंदोलनामागे बाबासाहेबांचा होता. सार्वजनिक स्थळांचा उपभोग घेणे ही काही कुणाची मालकी नसते. त्यावर सर्वांचाच समान अधिकार असतो. असे असतानाही अस्पृश्य बांधवांनी चालविलेल्या या मंदिर प्रवेश चळवळीला प्रचंड विरोध केला गेला. सामाजिक न्यायाची भूमिका स्पष्टपणे झिडकारली गेली. बाबासाहेबांच्या या चळवळीला नामोहरम करण्यात जेवढी ताकद लावता येईल तेवढी ताकद स्पृश्य हिंदूंनी लावली. हा शुद्ध दुष्टपणा होता. अस्पृश्य लोकांना माणूस म्हणून नाकारण्याची ही विकृत मानसिकता होती. एका कवीने या संदर्भात फार मार्मिक टिप्पणी केली आहे. कवी म्हणतो,

**'एक पत्थर को छुना भी**
**हमारे लिए चोरी थी**
**ए कालाराम... क्या तुझे भी**
**जातीवाद की बिमारी थी ?**
**बात ना मजबुरी की थी**
**ना गद्दारी की थी**
**मेरे भीम तेरे चौखट पर आए**
**क्योंकी बात बराबरी की थी'**

समानतेच्या दिशा संसुचन करण्यासाठी ही मंदिर प्रवेशाची लढाई असताना हिंदूंनी मात्र कुठल्याही परिस्थितीत अस्पृश्यांना सामाजिक न्याय देण्याचे स्पष्टपणे नाकारले. एक चांगली लढाई मारण्याचे घोर पातक हिंदूंनी केले.

नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत जाणीवपूर्वक थांबवला. कारण उच्चवर्णीय हिंदूंची माणुसकीच्या हक्कांपासून दूर ठेवण्याची भूमिका बाबासाहेबांना समजली होती. या लढ्यात तब्बल ५ वर्षांचा कालावधी गेला. या काळात पैसे वाया गेले, कष्ट वाया गेले. दुसरे असे, की अनेक सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक प्रश्न बाबासाहेबांसमोर होते, जे अत्यंत मूलभूत नि महत्त्वाचे होते. या काळात हे प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी बाबासाहेब फारसा वेळ देऊ शकले नाहीत. या प्रश्नांच्या अस्वस्थेपोटी बाबासाहेबांनी या आंदोलनाला पूर्णविराम देण्याचा निर्णय घेतला. 'या प्रश्नांना आता सत्याग्रहाची भूमिका पसंत नाही, त्याची आता आवश्यकताही नाही. ते आंदोलन तहकूब करावे. एवढेच नव्हे तर सत्याग्रहाचा विचारच या प्रश्नांवर सर्वस्वी रद्द करावा' असे स्पष्ट मत भाऊराव गायकवाड यांना पाठविलेल्या पत्रात बाबासाहेबांनी स्पष्टपणे नोंदवले.

**दलित समाजाच्या आक्रमकतेचा परिचय झाला**

नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनाने बाबासाहेबांना पुरते निराश केले. या लढ्यात अनेक वाईट अनुभव बाबासाहेबांना आले. अस्पृश्यांना झिडकारण्याची सामाजिक विषमता जोपासणारी हिंदू धर्माची मानसिकता बाबासाहेबांच्या लक्षात आली. हिंदू धर्म किती निगरगट्ट आहे, माणुसकीला कलंकित करणाऱ्या अनेक वाईट परंपरा त्यांना किती प्रिय आहेत, हेही त्यांच्या लक्षात आले. आपल्या प्रामाणिक प्रयत्नांकडे हिंदू समाज कसे हेतूपुरस्सर दुर्लक्ष करतो आणि या समाजातील विद्याविभूषित मनेही किती पूर्वग्रहदूषित आणि जातीयवादी, धर्माभिमानी आहेत हेही बाबासाहेबांना समजले. वरून सुधारणावादी वाटणारे आणि तसे भासवणारे किती ढोंगी, किती स्वार्थी नि किती पोकळ आहेत याचाही अंदाज या निमित्ताने बाबासाहेबांना घेता आला. हे सगळे वाईट अनुभव असल्यामुळे नंतरच्या काळात बाबासाहेब फार काळजीपूर्वक नियोजन करताना दिसतात. रचनात्मक कार्याला विधायक वळण कसे देता येईल यासाठी प्रयत्न करताना दिसतात. दुसरे असे, की धर्मपरिवर्तन करण्याची आकांक्षा बाबासाहेबांच्या मनात याच आंदोलनामुळे निर्माण झाली. जो धर्म समान दर्जा देत नाही, ज्या धर्मात माणुसकीने वागविले जात नाही, त्या धर्मात राहणे योग्य नाही, असा मनाचा निर्धारही याच आंदोलनामुळे निर्माण झाला. एक लक्षात घेतले पाहिजे, की मंदिर प्रवेशाचे आंदोलन करीत असतांना बाबासाहेब आजुबाजुच्या वास्तवाकडे फार बारकाईने लक्ष पुरवितात. कुठलाही विपरित परिणाम न होता आपल्या चळवळीची गती अधिक तेज कशी होईल, याची ते सतत काळजी वाहताना दिसतात. नंतरच्या काळात दलित समाजामध्ये धर्मभोळेपणा, दैववाद वाढू नये यासाठी ते सतत मार्गदर्शन करतात. दलित समाजाचे ऐक्य अभंग रहावे याची ते काटेकोर काळजी घेतात. कारण दलित समाजातील ऐक्याच्या भरोशावरच अनेक महत्त्वाची कामे करता येऊ शकतात, या निष्कर्षापर्यंत बाबासाहेब आले होते. नाशिकच्या सत्याग्रहातून एकीचे दर्शन घडले. दलित समाजाच्या आक्रमकतेचा परिचय झाला. या सत्याग्रहाची वार्ता तर 'लंडन टाईम्स' मध्ये प्रकाशित झाली होती. यावरून या सत्याग्रहाने किती व्यापक स्वरूप धारण केले होते, याची साक्ष पटेल. बाबासाहेबांनी दलितांच्या उत्थानासाठी पुढे जी काही राजकीय गणिते मांडली आणि यशस्वी केली त्यामध्ये अशा अनेक आंदोलनांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

आता काळ फार बदलला आहे. कुठल्याही मंदिर प्रवेशाची चळवळ आंबेडकरवादी समाज आपल्या हाती घेणार नाही. दलित समाजाच्या अजेंड्यातला हा विषय केव्हाचाच हद्दपार झाला आहे; परंतु आजही आंबेडकरवादी समाजाच्या अस्मितेचे असे अनेक विषय आहेत, जे विषय पूर्णत्वाला जावेत यासाठी आंबेडकरवादी समाज अनेक आघाड्यांवरती लढतांना दिसतो, आंदोलन करताना दिसतो; परंतु आजही आंबेडकरवादी समाजाच्या हक्कांकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले जाते. दिवसेंदिवस जातीधर्माच्या अस्मिता टोकदार होताना दिसतात. जातीधर्माच्या नावावर अनेक पातळ्यांवरून शोषण केले जाते. देश समृध्द व्हावा असे वाटत असेल तर समतेशिवाय पर्याय नाही. सर्वांना समान लेखल्याशिवाय, समान हक्कांची वाटणी केल्याशिवाय पर्याय नाही. बाबासाहेबांनी उभारलेले काळाराम मंदिर प्रवेशाचे आंदोलन याच बाबी अधोरेखित करणारे होते. खरे तर, विषमतेची मुळे उद्ध्वस्त करून देशाच्या उन्नतीचा निरभ्र नकाशा तयार करणारे हे आंदोलन होते; परंतु या सत्याग्रहामध्ये स्पृश्य हिंदूंची टोकाची विकृत मानसिकता समोर आली. कुठलाही गुन्हा नसताना अस्पृश्य बांधवांचा नानाविध पद्धतीने छळ करण्यात आला. ही चूक इतिहासाने पुन्हा कधी करू नये. कारण एखादी चूकही समाजजीवन दूषित करण्यास आणि देशाला मागे नेण्यास पुरेशी असते. अनेक वर्षे त्यामुळे आपण मागे खेचले जात असतो. ●●●

**(लेखक परिवर्तनवादी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**



# आंबेडकरी विचारांचा प्रेरणादायी पँथर : यशपाल सरवदे

**– शीतलकुमार शिंदे**

तेंव्हा नुकतेच रिपब्लिकन ऐक्य झाले होते. एकीकृत रिपब्लिकन पक्षाचा अध्यक्ष म्हणून कुठल्याही एका नावावर एक मत होतं नव्हते. एकीकृत रिपब्लिकन पक्षाचा अध्यक्ष आपल्याच गटाचा व्हावा असे, प्रत्येक गटाला वाटत होते. या महत्वकांक्षेतून पक्षात आणखी फाटाफूट होऊ नये म्हणून सर्वानुमते एक अध्यक्षीय मंडळच बनवण्यात आले होते. अध्यक्षीय मंडळात प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, नामदेव ढसाळ, राजा ढाले, रा. सु. गवई, भाई संगारे, टी. एम. कांबळे, जोगेंद्र कवाडे इत्यादींसह दहा नेत्यांचा समावेश होता. या एकीकृत रिपब्लिकन पक्षाची पहिली जंगी सभा तत्कालीन औरंगाबाद (आत्ताचे छत्रपती संभाजी महाराज नगर) शहरातील आमखास मैदानात भरली होती. सभेत एकएका नेत्यांची आवेशपूर्ण भाषणे होत होती.

नामदेव ढसाळांचेही भाषण सुरू झाले होते. त्याचवेळी अचानक ढसाळांना बाजूला ढकलून, त्यांचा माईक हिसकावून दुसराच कोणीतरी आगंतुक भाषण करू लागला होता. एकीकृत रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षीय मंडळाबद्दल अक्षरशः अभद्र बोलू लागला होता. यावेळी मंचावर विराजमान अध्यक्षीय मंडळासह संपूर्ण मंच हातप्रभ होऊन हे पहात होता. समोरील लोकांचा जमावही गोंधळा होता. असले अपमानित करणारे वर्तन किंवा चाळे गप्पबसून पहात राहणे हे यशपाल सरवदे यांच्या तत्वात बसणारे नव्हते. यशपालजी सरवदे यांनी लगोलग प्रसंगवाधान राखून, उपद्रव माजवणाऱ्या त्या व्यक्तीला स्टेजवरच धडा शिकवला. वाघाच्या चपळाईने त्यांनी, त्याची गचांडी पकडून त्याला स्टेजवरून अक्षरशः खाली फेकून टाकले. खाली गणवेशात आणि शिस्तीत असलेल्या समता सैनिक दलाच्या लोकांनीही प्रसंगावधन राखून त्या आगंतुकास दंडुक्याचा चांगलाच प्रसाद दिला. यामुळे ऐक्याची सभा पूर्ववत सुरू झाली. अन्यथा सभेत मोठा गोंधळ झाला असता. ती सभा उधळून लावली गेली असती. उपद्रवखोरांचा तोच हेतू असावा. मात्र यशपाल सरवदे यांच्या धाडसामुळे, प्रसंगावधानामुळे सभेत गोंधळ घालून सभा उधळवून लावण्याचे विरोधकांचे मनसुबे बेचिराख झाले होते. त्यांच्या या धाडसाचे, प्रसंगावधानाचे तत्कालीन सर्व नेते मंडळींनी कौतुक केले होते. सर्व वरिष्ठ नेते मंडळी यशपालजींवर खुश होती. सभेनंतर उस्मानाबादला परतताना कांही अघटित होऊ नये म्हणून आम्ही नेलेल्या वाहनावरील उस्मानाबाद' अशी लिहलेली नावे पुसून टाकण्याच्या सूचना अध्यक्षीय मंडळातील कांही नेत्यांनी केल्या होत्या. मात्र यशपालजींनी ती लिहिलेली नावे पुसली नाहीत. असे बेडर आणि बेदरकार होते यशपालजी सरवदे.

सन २००० साली भारतीय संविधानाचे अर्धशतक देशभर साजरे होत होते. या काळात रिपब्लिकन पक्षाच्या वतीने रामदास आठवले यांनी राज्यात संविधान गौरव महामार्च काढला होता. या महामार्चचे उस्मानाबाद शहरात जंगी स्वागत करण्यात आले होते. संविधानाच्या मोठमोठ्या प्रतिकृती तयार करून त्यांची शहरातून मोठी मिरवणूक काढण्यात आली होती. उस्मानाबाद नगरपालिकेच्या प्रांगणात आणि शहराच्या भीमनगरातील क्रांती चौकात भारतीय संविधानाची उद्देशिक संगमरवरात कोरून उभारण्यात आली होती. आशा प्रकारे संविधानाबद्दल लोकांत जागृती निर्माण व्हावी म्हणून एक रचनात्मक उपक्रम तेंव्हा यशपाल सरवदे यांनी मराठवाड्यात प्रथमच राबविला होता. या उपक्रमाचे नंतर देशभरात ठिकठिकाणी अनुकरण करण्यात आले. संगमरवरी दगडात कोरलेल्या भारतीय संविधानाच्या उद्देशिक नंतर शहराशहरात दिसू लागल्या.

पँथरसह रिपब्लिकन आदी आंबेडकरी चळवळीतील शीर्ष नेत्यांशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. माईसाहेब अर्थात डॉ. सविता आंबेडकर यांच्याशीही त्यांचे संबंध जिव्हाळ्याचे आणि दृढ होते. प्रा. अरुण कांबळे यांच्या अध्यक्षीय काळापासून माईसाहेबांचे पंथरामध्ये एक स्थान होते. अरुण कांबळे पँथरचे अध्यक्ष असताना रामदास आठवले हे पँथरचे संघटक होते. तेंव्हा पासून यशपालजी आणि आठवले साहेबांचे घनिष्ठ संबंध होते. अरुण कांबळे यांच्या नंतर रामदास आठवले यांना पँथरचे अध्यक्ष करण्यात यशपाल सरवदे यांच्या नेतृत्वाखालील उस्मानाबाद जिल्हा आणि मराठवाड्याचा महत्वाचा वाटा होता. आठवले यांच्या विरोधात तेंव्हाचे दिग्गज पँथर नेते अध्यक्षपदासाठी इच्छूक होते. मात्र तेंव्हा यशपाल सरवदे रामदास आठवले यांच्याबाजूने ठाम राहिले आणि रामदास आठवले पँथरचे अध्यक्ष झाले. आणि पुढचा इतिहास आपल्याला ज्ञात आहेत. अर्थात रामदास आठवले यांचे नेतृत्व घडविण्यात यशपाल सरवदे, तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा आणि मराठवाड्याचे खूप मोठे सहकार्य आहे. हे येथे मुद्दाम नमूद करायला हवे. आशा प्रकारे यशपालजींच्या कर्तृत्वाला अनेक पैलू होते, हे स्पष्ट होण्यास मदत होते. यावरून आपण किती मूल्यवान नेत्याच्या सानिध्यात होतो हे ही दिसून येते.

संसदीय राजकारणात विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा

आणि राज्यसभा या सर्वोच्च सभागृहाना अनन्यसाधारण महत्व आहे. बाबासाहेबांच्या नंतर चळवळीतील कांही मोजक्या शीर्ष नेत्यांनाच या सभागृहात जाता आले. आंबेडकरी चळवळीतील बहुतांश नेत्यांना या सभागृहात जाण्यापासून प्रस्थापितांनी येनकेन प्रकारे रोखले. विषारी प्रचारकरून, सर्वस्व पणाला लावून रोखले. अशाच प्रकारे सन १९८९ साली काँग्रेस – रिपब्लिकन युतीकडून यशपाल सरवदे यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब राखीव मतदार संघातून हत्ती या चिन्हावर निवडणूक लढवली. मात्र मित्रपक्ष म्हणून सोबत असलेल्या काँग्रेसनेच दगलबाजीचा खंजीर पाठीत खुपसत यशपालजींच्या विरोधात छुपा प्रचार केला. याची कबुली तत्कालीन काँग्रेस नेते दिवंगत पवन राजेनिंबाळकर यांनी काँग्रेस पक्षातून बाहेर निघाल्यानंतर दिली होती. त्यावेळी अगदी थोडक्या अंतराने यशपालजींचा पराभव झाला होता. या निवडणुकीत निवडणूक चिन्ह म्हणून त्यांनी हत्ती ऐवजी पंजा हे चिन्ह घेतले असते तर, त्यांचा विजय निश्चित झाला असता. असे मत जाणकार लोक नोंदवत असतात. मात्र हत्ती हे निवडणूक चिन्ह घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रिय चिन्ह होते. ते चिन्ह, या निवडणुकीत यशापालजींनी नाकारण्याचा प्रश्नच नव्हता. ते बाबासाहेबांच्या चळवळीतील सच्चे आणि निस्सीम कार्यकर्ते होते. मात्र त्यांच्या या पराभवाने आंबेडकरी चळवळीच्या गतीला मोठी खीळ बसली होती. ते निवडून सभागृहात गेले असते तर, आजचे चित्र निश्चितच वेगळे दिसले असते. बाबासाहेबांच्या विचारांसाठी, सामाजिक परिवर्तनासाठी जीवाची पर्वा न करणाऱ्या एका अभ्यासू नेत्याला विधानसभेत जाण्यापासून रोखण्यात प्रस्थापित लोक मात्र यशस्वी झाले होते. आज स्वबळावर बाबासाहेबांच्या ज्वलंत विचारांसाठी अशी निवडणूक लढविणारे किती कार्यकर्ते आहेत. याचे उत्तर निराशाजनक आहे. समाजात परिवर्तन घडवत असताना प्रस्थापितांनी आपल्यातच पेरलेले सुरुंग उध्वस्त करत करत पुढे जावे लागते. अभ्यासू आणि स्वयंभू आशा आंबेडकरी कार्यकर्त्यांसमोर हे मोठे आव्हान असते. सहकारी म्हणून जवळ वावरणारे लोकसुद्धा थोड्याथोडक्या कारणांनी प्रस्थापितांच्या हातचे बाहुले बनण्यास तयार असतात. आशा परिस्थितीत यशपालजींनी मराठवाड्यात आंबेडकरी चळवळीचा एक झंझावात निर्माण केला होता. हे वाखाणण्यासारखे आहे. त्यांच्या जाण्याने आपण किती अनमोल रत्न गमावून बसलो आहोत, हे त्यांच्या जाण्यानंतर आज आपणास कळत आहे.

बौद्ध शिल्पकृती, बौद्ध प्रतीके यांचा संशोधनात्मक केलेला अभ्यास आणि त्यातून धम्म संस्कारांचे, धम्म संस्कृतीचे रूप ते चर्चे तून उलगडून सांगत असत.

विद्यमान चालीरीती, जीवनपद्धती, भारतीय संस्कार पद्धती यात धम्माचा प्रभाव वेगळ्या रूपाने का असेना मात्र असल्याचे ते अनेक उदाहरणांनी स्पष्ट करत असत. जुन्या गुलामी दर्शविणाऱ्या व्यक्ती नामांचा उल्लेख ते बौद्ध पद्धतीच्या नामाने करत असत. याचे एक उदाहरण आमच्या महादेव नावाच्या व्यक्तीचे देता येईल. ते त्याला मैत्रेय या नावाने संबोधित असत. या माध्यमातून व्यक्तीचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन गुलामगिरी झुगारणारा असावा. सम्यक मार्गाचे म्हणजे सारासार विविकेचा अंगीकार करणारा असावा, असा त्यांचा आग्रह राही. व्यक्तिच्या सर्वंकष उत्कर्षासाठी ते सतत आग्रही असत. दलित स्त्रियांचा उत्कर्ष व्हावा, त्यांनी शिकावे, जुन्या रितिभातीला चिकटून राहू नये, असे त्यांना वाटे. यासाठी ते बौद्ध काळातील स्त्रियांचे दाखले देत असत. त्यांच्या कर्तबगारीच्या ऐतिहासिक कथा सांगत असत.

उस्मानाबाद येथे घेतलेल्या धम्म परिषदेवेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध बौद्ध लेण्या, प्रसिद्ध बौद्ध ठिकाणांना त्यांनी आवर्जून भेटी दिल्या. अनेक ठिकाणी अन्य धर्मीय लोकांनी बौध्द स्थळांचे विकृत रुपांतरीकरण केले आहे. त्यांच्या अभ्यासू दृष्टीने ते नेमके हेरले जात असे. तेर येथील त्रिविक्रम मंदिर आणि सिद्धेश्वर वडगाव (ता. उस्मानाबाद) येथील प्राचीन स्तुपासदृश्य एक टेकडी, उस्मानाबाद येथील हातलाई डोंगर, धाराशिव लेणीतील कांही शिल्पकृती या विकृतीकरणाच्या बळी ठरल्या आहेत. याबद्दल केलेल्या संशोधनातून आपले निष्कर्ष, लोकांना ते सांगत असत. उस्मानाबाद येथील धाराशिव लेण्यांचे उपद्रवखोरांकडून होणारे विकृतीकरण आणि अतिक्रमण होत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी प्रत्येक पौर्णिमेला धाराशिव लेण्यांच्या ठिकाणी धम्म सहल सुरू केली होती. या काळात त्यांच्या सोबत धाराशिव लेणीत सहलीला जाणाऱ्या लोकांसह ते धम्मा बद्दल अभ्यासपूर्ण, मुद्देसूद चर्चा करत. कांही जणांना त्यांनी अगोदरच वाचनाचे विषय ठरवून दिलेले असत. त्यावर यावेळी अभ्यासपूर्ण चर्चा व्हायची. त्यावर ते आपली अभ्यासपूर्ण मते मांडायचे. लेणीत कोरलेल्या मूर्तींच्या वेगवेगळ्या मुद्रा, प्रवेशद्वारावरील नक्षी काम, बुद्धांच्या मूर्तीवरील व्यक्तीचित्रण याबद्दल ते उपस्थितांना माहिती देत. डोंगर दऱ्यात तत्कालीन शिल्पकारांनी कोरलेल्या बुद्ध लेणीसाठी विशिष्ट आकारातील डोंगर रांगांचीच बहुतेक ठिकाणी तत्कालीन शिल्पकारांनी निवड केल्याचे निरीक्षण त्यांनी तेंव्हाच मांडले होते. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश यासह देशभरातील प्रसिद्ध आणि पडद्याआड लपलेल्या बौद्ध स्थळांना दिलेल्या भेटीवेळी केलेल्या निरीक्षणातून हे ज्ञानरुपी सार त्यांनी मिळवले होते. याची माहिती त्यांच्या खास शैलीतून ते विशद करीत असत. म्हणून यां धम्म सहलीत त्यांच्या सोबत असणाऱ्या लोकांना अशाप्रकारे धम्म या विषयी माहितीपूर्ण मेजवानीच मिळत असे. त्यांच्या या उपक्रमामुळे तेंव्हा धाराशिव लेणीचे होणारे विद्रुपीकरण थांबण्यास चांगली मदत झाली होती. होणाऱ्या अतिक्रमणास पायबंद बसला होता.

तेरच्या त्रिविक्रम मंदिरात असलेला नागवेलींनी वेढलेला बौद्धस्तुप आहे. अशाच प्रकारचे बौद्धस्तुप नागर्जूनकोंडा आणि अन्यत्र असल्याचे त्यांनी तेंव्हा सप्रमाण दाखवून दिले होते. धम्म परिषदेच्या प्रचारासाठी काढण्यात आलेल्या माहिती पत्रक त्यांनी या स्तुपाचे चित्र ठळक पद्धतीने छापले होते. आपल्या राहत्या घराच्या मुख्य द्वारावरसुद्धा त्यांनी हे प्रतीक कोरून घेतले होते. त्यात कसलीही बारीकसारीक चूक राहूनये म्हणून ते स्वतः या कोरीव कामाची देखरेख करत असत. त्यांनी पुनर्जीवित केलेल्या परंपरागत घरावर त्यांनी बौद्ध धम्माची अनेक प्रतीके आणि वचने कोरून घेतलेली आहेत. एवढेच नव्हे तर घरातील प्रत्येक फर्निचर वर त्यांनी धम्माची प्रतीके कोरून घेतलेली आहेत. यावरून ते सामाजिक आणि धार्मिक कामात स्वतःला किती झोकून देत असत याची प्रचिती येते. ●●●


**(लेखक उस्मानाबाद येथील पत्रकार आहेत.)**



याडीकार
पंजाबराव चव्हाण

# गोरबंजारा समाजाचा ऐतिहासिक ठेवा आणि संस्कृती उजागर करणारा अनमोल ग्रंथ – गोरमाटी

मी आतापर्यंत लिहिलेल्या गोरबंजारा समाजाच्या पन्नास समीक्षांचे लिखाण पाहून प्राचार्य सलतान राठोड यांनी आपला अनमोल 'गोरमाटी' ग्रंथ समीक्षेसाठी मला पाठवला. सदर ग्रंथ वाचून गोरबंजारा गौरवशाली इतिहासाची अत्यंत सूक्ष्मपणाने मांडणी केल्याचे पाहून मी आनंदित झालो. गोरविचारवंत, गोरअभ्यासक प्राचार्य सलतान राठोड यांच्या गोरमाटी ग्रंथात संदर्भासहित सोळा प्रकरणे आहेत. गोरबंजारा समाजाचा इतिहास सर्वप्रथम १९३६ मध्ये लोकनेते बळीराम पाटील मांडवीकर यांनी मांडला. त्यानंतर भीमणीपुत्र मोहन नाईक यांनी 'गोरमाटी संकेत आणि संस्कृती' हा अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहून गोरबंजारा समाजाचा गौरवशाली इतिहास उजागर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रा. मोतीराज राठोड, प्राचार्य ग.ह. राठोड, प्रा. डॉ. अशोक पवार, प्रा. डॉ. सुनीता पवार, प्रा.राजूसिंग आडे यांनीसुद्धा गोरबंजारा समाजाच्या गौरवशाली इतिहासाची गंभीरपणे नोंद घेऊन तमाम गोरगणासाठी ऐतिहासिक ग्रंथ उपलब्ध करून दिलेला आहे. आज गोरबंजारा समाजात नवतरुण लेखक गोरबंजारा समाजाचा इतिहास, लोकजीवन आणि गोर संस्कृती धुंडाळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. माझ्या वाचनात गोरबंजारा समाजाच्या गौरवशाली इतिहासाची जी अनेक दर्जेदार पुस्तके आली, त्या लिखाणाच्या पलीकडेही प्राचार्य सलतान राठोड यांनी इतिहासाची लेखणी ज्यांनी विसरली त्याकरिता अनमोल गोरमाटी ग्रंथ लिहून गोरबंजारा साहित्यातच नाही, तर मराठी साहित्यामध्ये फार मोलाची भर घातलेली आहे. त्यामुळे त्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. महाराष्ट्र राज्य भटक्या विमुक्त जाती-जमाती संघाचे संस्थापक अध्यक्ष, लोकनेते, आमचे मार्गदर्शक जी.जी. चव्हाण यांनी या पुस्तकाची भारदस्त प्रस्तावना लिहिल्यामुळे या पुस्तकाचे महत्त्व फार वाढलेले आहे. प्रा. वीरा राठोड यांनी मलपृष्ठामागे नोंदवलेले लिखाण पुस्तकाला आणि लेखकाला साजेसे आहे. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या गोरबंजारा समाजाच्या ऐतिहासिक ग्रंथांमधील काही सुटलेला भाग यांचा तांड्यातांड्यामध्ये जाऊन सखोल अभ्यास करणे, तांड्यांवरील बुद्रुक मंडळीकडून मौखिक




असलेले साहित्य वदवून घेऊन प्राचार्य सलतान राठोड यांनी या पुस्तकाची सुंदर आणि अभ्यासपूर्ण मांडणी केलेली आहे. बंजारा लोकजीवन आणि गोरसंस्कृती, आल्हा-उदल एक योद्धे, राजा जयचंद राठोड, सम्राट हेमचंद भुकीया, लोकनायक लाखा बंजारा, शूर लाखा बंजारा, स्वामिनिष्ठ कुत्रा, सामका, सामका याडी, एक विभूती- संत सेवालाल, सेवाभायांची अप्रतिम भेट: प्रशासन व्यवस्था, भायार लडी, आरद, सतीमाता-सामत दादा, खरा जाणता राजा: वसंतराव नाईक, गोरबोलीतील शब्दकळा आणि संदर्भ असे एकूण १६ प्रकरणे असून शेवटच्या भागांमध्ये सुंदर चित्रे दिलेली आहे. या पुस्तकाची संदर्भयादी बघितली, तर गोरबंजारा व्यतिरिक्त इतर विचारवंतांनी गोरबंजारा समाजाचा ऐतिहासिक इतिहास लिहिलेला आहे. अशा एकूण ६२ मान्यवरांच्या पुस्तकांचा, भजनांचा, सिडी व इतर साहित्यांचा सखोल अभ्यास करून प्राचार्य सलतान राठोड यांनी हे पुस्तक केसुला फाउंडेशनच्या सहकार्याने प्रसिद्ध केलेले आहे. प्राचार्य सलतान राठोड हे केवळ शिक्षण क्षेत्रातच नावाजलेले व्यक्ती नसून केसूला फाउंडेशनच्या माध्यमातून ते दुर्लक्षित झालेल्या कलाकार, कवी, लेखक सामाजिक कार्यकर्ते आणि गोरबंजारा समाजामध्ये काम करणाऱ्या अनेक घटकांचा दरवर्षी फार मोठ्या प्रमाणामध्ये सत्कार करतात. केवळ सत्कार करून ते थांबत नाहीत, तर गोरबंजारा समाजातील अनेक लोकांना अडीअडचणींमध्ये मदत करण्याचे त्यांचे काम अहोरात्र सुरू आहे. अशा या गोरबंजारा समाजसुधारकाने आपल्या गोरबंजारा समाजाचा इतिहास खऱ्या अर्थाने उत्खनन करून न्याय देण्याचा केलेला प्रयत्न कौतुकास्पद आहे. समाजातील अनेक प्रथा, परंपरा, धाटी रुढी, चालीरिती अनेक जाणत्या व वडीलधाऱ्या मंडळीकडून जाणीवपूर्वक अभ्यास करून त्यांनी गोरमाटी या अनमोल ग्रंथांमध्ये समाविष्ट केलेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी गोरबंजारा समाजाची संस्कृती व माणूसपण जपण्याचा फारच सुंदर प्रयत्न केलेला आहे. गोरबंजारा समाजातील जुने शब्द, राहणीमान, रूढी, परंपरा, गौरवशाली इतिहास, ऐतिहासिक नोंदी, सणवार, गोर बोलीतील शब्दकळा अशा अनेक विषयांचा त्यांनी या ग्रंथामध्ये

समाविष्ट केला आहे. त्यामुळे प्राचार्य सलतान राठोड हे गोरबंजारा समाजाचा गौरवशाली इतिहास मांडण्यामध्ये यशस्वी झाले आहेत.

**लको जकोणं मिट जाय,**
**हारदं करं जको हारदं रे जाव।**

या म्हणीप्रमाणे पिढ्यान्‌पिढ्या मौखिक असलेले साहित्य पिढी दर पिढी आजही गोरबंजारा समाजात जिवंत आहे .बंजारा लोकगीत दोहरा, वाजणां, लेंगी, केणांवट, धावलो, साकतर, साकी इत्यादी स्वरूपात जिवंत असून प्राचीन काळापासून ही गोरसंस्कृती पाहायला मिळते. सिंधू संस्कृती ही बंजारा समाजाची गोरसंस्कृतीच आहे, हे अनेक गीतांतून सिद्ध असल्याचे त्यांनी या ग्रंथामध्ये सांगितले आहे.

**सिंधु नंदीरे पाळेमं.**
**सप्त सिंधुरे राळेमं।**
**आरिया दामडिया दमाड लगानाकेरे मारे सेना नायक।**

एवढेच नव्हे, गोरबंजारा समाज हा सिंधू धाटीचा वारसदार आहे, असेही सांगण्यास ते विसरले नाहीत. गोरबंजारा संस्कृती ही पुरातन काळापासून आजही भक्कमपणे उभी असून ती पाच स्तंभांवर असल्याचे त्यांनी या ग्रंथात प्रतिपादन केलेले आहे. ते स्तंभ म्हणजे १) गोरगड (तांडा), २) गोरधाटी (गोर धर्म), ३) गोरबाणी (गोर भाषा), ४) गोरबांणो (वेशभूषा), ५) गोरकला (गोरसाहित्य). बाराव्या शतकापासून लखीशा बंजारा यांनी सुरू केलेला लदेणीं व्यवसाय अठराव्या शतकात सेवालाल महाराजांपर्यंत चांगलाच फोफावला होता. तांड्यात कोणावरही अन्याय होऊ नये, प्रत्येकाला समान न्याय मिळावा यासाठी समाजात एक प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती. ती प्रशासन व्यवस्था सेवालाल महाराजांच्या काळात ठळकपणे जाणवते. यामध्ये गोरगड, गोरधाटी, गोत्र, पाची पुजेर, होळी, धुंड, वदाई, तिज ढमोळी, ढावळो, गोधन, गोदंण, गोरबांणो, गोरबोली, साकतर, फेटिया, काचळी पांमडी, फडकी यांचा समावेश आहे. इतकेच नव्हे तर, बंजारा स्त्रियांचे दागदागिने, जुडो टोपली, पटिया, हार, काटो, कंगणी, बामट्या, वाळा, बलिया, आंगतुळा, विटी फुला, मुंगाहार, सातकाटा फुली, भुरिया, पामडी, ठोळी, गोरकला (गोर साहित्य) अशा गोरबंजारा समाजाच्या दाग-दागिने सणवारांवर अत्यंत अभ्यासपूर्ण व विस्तृतपणे केलेले हे लिखाण तमाम गोरबंजारा समाजाकरिता वाचनीय आहे. प्राचार्य सलतान राठोड यांचा गोरबंजारा संस्कृती विषयी दांडगा अभ्यास असून पुस्तक लिखाणाकरिता लेखकांने प्रंचड मेहनत घेतल्याचे दिसून येते. बाराव्या शतकातील आल्हा उदल या योद्ध्याची रसभरी कहानी देऊन त्यांनी या पुस्तकाची शान वाढवली आहे. मोहम्मद घोरीला भारतात जयचंद राठोडने बोलावले, असे इतिहासकारांनी खोटे दाखवलेले असताना त्यांनी राजा जयचंद राठोड कसा पराक्रमी व शूरवीर होता याचे ऐतिहासिक दाखले देत राजा जयचंद राठोड यांच्याविषयी इतिहासात केलेल्या चुकांवर त्यांनी आक्षेप घेतलेला आहे. सन १५८० ते १६७१ मध्ये झालेल्या लोकनायक लाखा बंजारा यांचा गौरवशाली इतिहास, त्यांचे वंशज, त्यांच्याकडे असलेली तेराशे एकर जमीन, राष्ट्रपती भवन उभारलेली जागा, ती जागा इंग्रजांनी इमारत बांधण्यासाठी लाखा बंजाराचे वंशज रतनसिंग बंजारा यांच्याकडून ९९ वर्षांच्या करारावर घेतल्याच्या कोलंबिया गॅझेटमधील नोंदीचा सविस्तर व सखोल अभ्यास करून त्यांनी लाखा बंजाराचा गौरवशाली इतिहास या पुस्तकामध्ये मांडलेला आहे.

संत सेवालाल महाराजांचे सत्य बोल गोरबंजारा समाजासाठी प्रचंड ऊर्जा स्त्रोत आहेत.

**सत्य धर्म लिनताती रेणूं।**
**सदा सासी (खरे) बोलणूं।।**
**हर वात सोच समजन केणूं।**
**भवसागर पार करलेणूं।।**

असे ते आपल्या वचनात सांगतात. क्रांतीसूर्य सेवालाल महाराजांची प्रशासन व्यवस्था कशी सर्वांना न्याय्य, हक्क आणि समानता देणारी होती. याचे सुंदर विवेचन लेखकाने या पुस्तकामध्ये करून गोरबंजारा समाजाला अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग दाखवलेला आहे. अकराव्या शतकात पिठागोर नामक राजाने गोरसमाजाची स्थापना केली असली तरी हा समाज अठराव्या शतकापर्यंत स्थिर होऊ शकला नव्हता, ही मांडणी संदर्भासहित या पुस्तकात केलेली आहे.

प्राचार्य सलतान राठोड यांनी प्रचंड ताकदीने लिहिलेले पुस्तक असून सर्व लेखक आणि कवींनी वाचलेच पाहिजे, असे मला वाटते.

●●●

**पुस्तक : गोरमाटी**

**लेखक : प्राचार्य सलतान राठोड**

**प्रकाशक : केसुला फाऊंडेशन, नाशिक**

**किंमत : १७० रुपये**

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
द पीपल्स पोस्ट
नवे लेख, नवी सदरे, नवा अंक याशिवाय
दैनंदिन विषयांवर नामवंत साहित्यिक, लेखक,
विचारवंत यांचे भाष्य!
डिजीटल स्वरुपात!

www.peoplespost.in

# विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच का पडतात ईडीचे छापे...



भारत आतून आणि बाहेरून स्वच्छ करणार अशी आवई उठवत स्वच्छ भारत अभियान राबवणाऱ्या सरकारने पहिल्यांदा काळ्या पैशाला हात घालण्याचं ठरवलं. नोटबंदी कार्यक्रम राबवला. ऑनलाईन व्यवहार करन्सी सुरू केली. आता यालाही आठ-दहा वर्षे होतील; पण या साऱ्या कालावधीत आठ-दहा काळे पैसेही कुणाच्या म्हणजे सरकारच्या हाताला लागले नाहीत. याउलट मल्ल्यासारखे अनेक गब्बर देशातले पैसे लुटून परदेशात फरार झाले. अनेक बँका त्यांनी डुबवल्या. मल्ल्याची साखळी अदानीपर्यंत पोहोचते. सरकारनेच या धनिकांना आपल्या बँका आणि विमा संस्थांपासून हजारो कोटी रुपयांचे कर्ज दिले. शिवाय सार्वजनिक मालमत्ताही विकली. त्यात विमानापासून मुंबईतल्या झोपडपट्ट्या सुधार योजनांचा समावेश आहे. जगातले सर्वात जास्त श्रीमंत भारतात असतील आणि भारत जगाचे नेतृत्व करेल, अशी धारणा यामागे असावी. पण जगातले सर्वात जास्त गरीब भारतातच आहेत आणि त्यांना सरकारी कुरिअरने धान्य पाठवून जगवावे लागते, हेही एक वास्तव शिल्लकच राहते. या काळ्या वास्तवावर पडदा टाकला जातो. त्यामुळे चकाकता भारत सतत दिसत राहतो.

देश स्वच्छ करण्यासाठी गेल्या आठ वर्षांत एक मोहीम सुरू करण्यात आली. ज्या बीबीसीने पंतप्रधानांवर काढलेला माहितीपट बंद करण्यात आला म्हणजे त्यावर बंदी घालण्यात आली, त्याच बीबीसीने छाप्यासंदर्भातही एक बातमी आपल्या मराठी साईटवर दिली आहे. (२७ फेब्रुवारी २०२३) या बातमीत गेल्या आठ वर्षांत टाकण्यात आलेल्या छाप्यांची सविस्तर माहिती आहे. त्यानुसार ईडी आणि सीबीआयने १२१ छापे टाकले. अनेक नेत्यांना तुरुंगात टाकले. काही आत तर काही बाहेर आहेत. कोट्यवधींची बेहिशेबी मालमत्ता उजेडात आली, असा छापा टाकणाऱ्या संस्थांचा दावा आहे. महाराष्ट्रात तर कधी कोणाच्या घरी छापे पडणार हे सांगणारा एक कुडमुड्या जोशी असतो. पत्रकार परिषदा घेऊन तो भविष्य सांगतो. सत्ताधारी पक्षातला तो असल्याने त्याचे भविष्य म्हणजे छापा पडणार हे भविष्य अजून तरी खरे ठरत आले आहे. वेगवेगळ्या राज्यात असे भविष्यवेते आहेत. जणू काही मरिआईचा गाडा येणार असे ते हाकाटी देतात. वाचायचे असेल, तर कमळाच्या पाकळ्याखाली लपा असे सांगतात. जे आश्रय शोधत जातात तो त्यांना मिळतो. त्यांना शुद्ध करून घेतले जाते आणि त्यांची शक्ती पक्षासाठी, सत्ता मिळवण्यासाठी वापरली जाते. अशा प्रकारे अनेक कावळ्यांचे बगळे झाले. ज्यांनी बगळे व्हायला आणि शरणागतीस नकार दिला त्यांचे काय झाले? तर त्यांच्यावर ईडी आणि सीबीआयचे छापे पडले. एक-दोन नव्हे, तर एकशे पंधरा विरोधी नेत्यांवर छापे पडले. काँग्रेस, राष्ट्रवादी, आप, शिवसेना आदी अनेक विरोधी पक्ष आहेत, जे भाजपच्या सुरात सूर मिसळून राम राम म्हणायला तयार नाहीत. यामध्ये शिवसेनेचे संजय राऊत, राष्ट्रवादीचे अनिल देशमुख, नवाब मलिक आदी प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. गेल्या सप्टेंबरपर्यंत हा आकडा वाढत गेला. राष्ट्रवादीचे अकरा तर शिवसेनेचे आठ नेते रडारवर आले. अजून अनेक जणांच्या मागे या ईडी आणि सीबीआयचा वेताळ मागे लागला आहे. त्यांची सापळ्यातून सुटका होण्याची शक्यता दिसत नाही.

आसाममध्ये काँग्रेसचे नेते आणि मुख्यमंत्री असलेल्या हेमंत सरमा यांच्यामागे वेताळ धावला. सरमा हुशार निघाले. काँग्रेसमधून बाहेर पडले. भाजपमध्ये जाऊन मुख्यमंत्री झाले. आता त्यांच्यावर डाग दिसत नाहीत. जे दिसतात त्याचे वर्णन 'दाग अच्छे लगते है' असे केले जाते. पश्चिम बंगालमध्ये भाजपला सळो की पळो करणाऱ्या ममता दीदींच्या तृणमूल काँग्रेसच्या पानावर दुर्बिणी रोखण्यात आल्या. या पक्षाच्या तब्बल दीड डझन म्हणजे १९ नेत्यांवर कारवाई करण्यात आली. बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलाच्या चार नेत्यांवर कारवाई झाली, तर अजून पाच नेते रडारवर आहेत. झारखंडमध्येही कारवाई सुरू झाली. दक्षिणेकडील अनेक नेत्यांना यापूर्वीच अटक झाली होती. त्यांच्यावर वेगळे आरोप होते. चिदंबरम् आदी नेत्यांनी स्वतः


ची सुटका करून घेतली आहे. हेरॉल्डप्रकरणी सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्या विरुद्ध तपासचक्रे फिरत आहेत. २०२४ च्या निवडणुका दारात उभ्या राहून कॉलबेल वाजवत आहेत. तपास यंत्रणा आणखी गतिमान आणि व्यापक होऊ शकतात. विरोधी पक्षमुक्त भारत हे सत्ताधाऱ्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्या मदतकारक ठरू शकतात. विरोधी पक्ष म्हणजे लोकांचा आवाज असतो. तोच बंद झाला तर, 'भाईयो और बहनो...' शिवाय आपण दुसरे काय ऐकणार? राज्यघटनेने स्वायत्त आणि विश्वासू बनवलेल्या काही संस्थाच सत्ताधाऱ्यांच्या गडद सावलीत विवेकहीन होत असतील तर...

छापे टाकून काळी संपत्ती शोधण्यास कुणाचाच विरोध असता कामा नये. भ्रष्टाचाराची कीड संपवण्यास कोणाचाच विरोध असता कामा नये. हे सारे संपवण्यासाठीची कारवाई राजकीय असता कामा नये. भाजपकडे असे अनेक मोठे नेते आहेत, जे बिगरभाजप पक्षातून भाजपमध्ये आले आणि शुद्ध झाले. एका रात्रीत त्यांचे चेहरे काळ्याचे गोरे कसे काय झाले? मुळातच सत्ताधाऱ्यांमधील नेते आहेत आणि गब्बर आहेत, ते कसे तपास यंत्रणांना दिसत नाहीत? सत्ताधारी बघितले, की तपास यंत्रणांच्या डोळ्यात मोतीबिंदू उगवतात काय अशा अनेक प्रश्नांमुळे जनता बेजार झाली आहे; पण उत्तर कोण देणार? मारून मुसलमान केल्यासारखा हा प्रकार आहे. जो सत्ताधाऱ्यांत मिसळतो तो आपोआप शुद्ध होतो आणि जो स्वतः चे अस्तित्व आणि स्वाभिमान राखून विरोधकांत बसणे पसंत करतो, तो तपास यंत्रणांचा बळी ठरतो. शिवसेना भाजपबरोबर गेली असती, तर महाराष्ट्रात आजचे चित्र निर्माण झाले असते काय?

# झेडपीच्या गुरुजींमध्ये आली आंधळे, पांगळे होण्याची साथ

आपल्याकडे बारक्या शाळेतल्या बारक्या गुरूजीइतका चतूर प्राणी जगात कुठेही सापडणार नाही. आपल्या स्वार्थासाठी तो अशी काही शक्कल लढवतो, की जगातल्या साऱ्या प्रतिभावंतांनी त्याच्यासमोर गुडघे टेकून उभे व्हावे, तर हा महापराक्रमी असलेला, पण हुद्याने बारका म्हणजे प्राथमिक शिक्षकाने केलेल्या अनेक पराक्रमांची यापूर्वी नोंद झालेली आहे. कुणी खिचडी पळवली, कोणी भोजनात दंगल केली, कोणी खोली सुधार योजनेत हात ओले केले, कुणी आश्रमशाळेत गैरवर्तन केले, कोणी खोटी माहिती देऊन आदर्श झाले, तर कुणी अजून कोणता तरी खादी उद्योगाचा पराक्रम केला. याचा अर्थ, दांडगे गुरूजी स्वच्छ असतात असे नाही. त्यांचे पराक्रमही दांडगे असतात. बारक्याचे बारकेपण गाजणारे असतात. तर बीड जिल्ह्यातल्या ७८ झेडपी गुरुजींवर दिव्यांग असल्याचे खोटे दाखले सादर करून बदलीचा लाभ घेतल्याच्या आरोपाखाली खटले दाखल करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. बदली करताना अपंगत्व असलेल्या शिक्षकांविषयी सहानुभूतीचा दृष्टिकोन बाळगला जातो. त्याचाच लाभ या गुरुजींनी उठवला. कमी अपंग असलेले जास्त अपंग झाले. काही काही खोटे खोटे झाले आणि बदलीसारखी एक मोठी लढाई त्यांनी जिंकली.

कोणत्याच गुरुजींना बदली नको असते. कोणीही नोकरीच्या



ठिकाणी मुक्काम करत नाहीत. कुणीही आपल्या शाळेत आपल्या मुलांना पाठवत नाहीत. यांच्या शाळेत खिचडीवाली गरीब पोरं आणि यांची पोरं डोनेशन घेणाऱ्या शाळेत. अनेक शिक्षक मोटारीतून शाळेला जातात. एकाच्या मोटारीत चार-चार गुरुजी बसतात. ज्यांची शाळा खूप लांब असते, ते तीन दिवस शाळेत चार दिवस स्वतःच्या पोरांबाळात असतात. बदली चुकवण्यासाठी कोणतेही दिव्य करायला मास्तर तयार होतात. त्यापैकी एक म्हणजे पूर्ण अपंग असल्याचा दाखला मिळवून बदली करून घेणे. मानवी भूमिकेतून सुरू केलेली ही सवलत अमानवी, अनैतिक मार्गाने मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाले. अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आटापिटा सुरू झाला. एका बीड जिल्ह्यात तीनशे शिक्षकांनी अशी प्रमाणपत्रे मिळवली. महाराष्ट्रात ३६ जिल्हे आहेत. किती मास्तरांनी प्रमाणपत्रे मिळवली असतील आणि त्यातही किती खोटी असतील, म्हणजे किती मास्तर खोटे असतील याची कल्पना यायला मदत होईल. बीडमध्ये प्रमाणपत्रधारकांची फेरतपासणी केली, तर त्यात ७८ बहादूर मास्तर खोटे अपंग निघाले. सर्वत्र अशीच तपासणी केल्यास जसे बोगस आदिवासी सापडले तसे बोगस अपंग शिक्षक सापडतील, यात शंका घेण्याचे काहीच कारण नाही. जणू काही साथ आल्याचे चित्र दिसायला लागेल.

मास्तरांना सर्व प्रकारचे हक्क आणि लाभ पाहिजे आहेत. पण जबाबदाऱ्या नको. परिणाम देण्याचे बंधन नको, अशी स्थिती आहे. अर्थात, सर्वच मास्तर असे आहेत असे समजणे अन्यायकारक होईल. खूप चांगले मास्तरही आहेत; पण खोट्या मास्तरांच्या गर्दीत ते झाकून जातात, हेही तितकेच खरे आहे. सवलती मागणाऱ्या शिक्षकांच्या विद्यार्थ्यांना जोडाक्षरे का काढता येत नाहीत, पाढे का पाठ होत नाहीत, हे अनेक गंभीर प्रश्न तयार झाले आहेत. देशाचा, समाजाचा पायाच असा वाळवीने कुरतडला जात असेल, तर सक्षम देशाचे स्वप्न कसे बाळगणार? खिचडी खाणारी पोरे अशीच शेंगदाणे हुडकत वाऱ्यावर जाणार आणि खोटी प्रमाणपत्रे मिळवणाऱ्यांची पोरे सिलिकॉन व्हॅलीत जाणार... अर्थात, त्यांच्याविषयी कोणी वाईट विचार करता कामा नये. पण प्रश्न आहे तो खिचडीवाल्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांना आपल्याच शाळेत टिकवून पट पकडणाऱ्या मास्तरांचा.

बीडमधील ज्यांनी खोटी प्रमाणपत्रे मिळवली त्यात तीन प्रमुख

रोगांचा समावेश आहे. कमी दिसणे, कमी ऐकायला येणे, हाडे दुखणे हे तीन रोग आहेत. हे रोग असे आहेत, की एखाद्याने मला कमी दिसते, कमी ऐकायला येते, कमी हालचाली करता येतात, असा दावा केला तर काय करायचे? दिसतच नाही हो, असे एखाद्याने खोटे सांगितले तर काय करायचे? मग या साऱ्यांची वैद्यकीय तपासणी होते. दूध का दूध होते. तसे बीडमध्ये झाले. खोटे अपंग असणाऱ्यांवर आता कारवाई होईल. पण आपल्या कारवायाही बोगस असतात. काही दिवस फायलीतील कागद फडफड करतात. त्यांच्यावर वजन ठेवले, की त्यांची फडफड थांबते. पुन्हा तेच चक्र चालू राहतं. नाव बदलतं, प्रयोग तेच असतात. ज्यात अप्रामाणिकपणा, अनैतिकता याची दुर्गंधी येते. नैतिकतेचे पाठ घेणारे स्वतःच अनैतिक बनलेले असतात. बीडमधील प्रकरणात निम्मे पुरूष शिक्षक तर निम्म्या शिक्षिका आहेत. आता बोला!




## शहरांची नावे बदलून काय साधणार? प्रश्न सोडवा की

विशिष्ट मर्यादेपलिकडे नामांतराला महत्त्व असत नाही. नामांतर झाल्यानंतरही ते विषय जुनेच प्रश्न घेऊन जातात. नामांतरामुळे सांस्कृतिक, धार्मिक भावना चेतवल्या जातात. ज्यांनी ही मूळ नावे दिलेली असतात, त्यांच्याविरुद्धची म्हणजे त्यांच्या वारसदारांविरुद्धची सांस्कृतिक लढाई अधिक तीव्र होते. ती तीव्र करण्यासाठीच शहरांचे, राज्यांचे नामांतर करण्याचा पेच टाकला जातो. केंद्रात उजव्यांचे सरकार आल्यानंतर नामांतराचा धडाका सुरू आहे. अगदी काल-परवापर्यंत ही प्रक्रिया सुरू होती आणि पुढेही ती चालूच राहणार आहे. आपल्यावर राज्य केलेल्यांचे कोणतेही चिन्ह राहू नये. ते पुसून टाकण्याचा आणि स्वतःच्या पराक्रमाच्या गाथा कोरण्याचा हा प्रयत्न असतो. शहरे, किल्ले, रेल्वेस्थानके, पर्यटनस्थळे, महत्त्वाच्या इमारती आदींची नावे बदलण्याचा हा खेळ असतो. आमच्या शत्रूंची सावलीही आम्ही ठेवणार नाही, अशी एक राजकीय भावना असते. शहरांचे नामांतर करणारे किंवा ती वसवणारे इतिहासजमा झाले. पण या इतिहासाच्या पाऊलखुणा आत सांस्कृतिक, राजकीय कलहांचा विषय बनवल्या जात आहेत. जुने एवढे वाईटच असेल, तर मग मनुस्मृती नष्ट का केली जात नाही. गोडसे खलनायक का ठरत नाही. शत्रूंना दारे उघडणाऱ्यांचे काय झाले, असे अनेक विषय तयार होतात. पण सत्ताधाऱ्यांना त्याच्याशी देणेघेणे नसते. आपल्याकडे जन्माला आलेली आणि आपण जन्माला घातलेली प्रत्येक गोष्ट श्रेष्ठच असते, असे वर्तमानाला मागे अंधाराच्या गुहेत नेणारे मूलतत्त्ववादी सांगत असतात. भावनांवर स्वार होऊन अशा गोष्टींचा पाठपुरावा करत असतात. याच गोष्टींना राष्ट्राचा विकास आणि राष्ट्राची घोडदौड समजत असतात. ज्या शहरांची नामांतरे झाली त्यांचा विकास करण्याची जबाबदारी यांच्यावर नसते. विकासाचा खोटा ढोल वाजवला, की झाले यांचे काम! महापुरुषांची नावे कुठे देऊ नयेत असा हा विषय नाही. ती द्यायला हवीत. त्यांची स्मारके उभी करायला हवीत. या गोष्टी प्रेरणादायी असतात; पण प्रश्न आहे तो हे सारे कसे करण्याचा. दुसऱ्याची रेघ पुसून आपली स्वतंत्र रेघ मारायची, की ती कायम ठेऊन स्वतंत्र मारायची, याचा विचार कोणी करत नाही. ज्या शहरांना मुस्लिमांची, इंग्रजांची, पोर्तुगिजांची नावे आहेत, म्हणून ती सारी काही राष्ट्रद्रोही, धर्मविरोधी बनलेली आहेत का, याचे भानही कोणाला नाही. नामांतराचा हा धडाका चालूच राहणार आहे. ज्याच्याकडे सामाजिक, आर्थिक विकास करण्याची क्षमता नसते तो संस्कृतीचे गाणे गात राहतो.

नागपूर, अहमदाबादपाठोपाठ आता कर्नाटक ही संघाची एक महत्त्वाची पाठशाळा बनली आहे. तेथून संघ दक्षिण भारत काबीज करण्याच्या प्रयत्नात आहे. महाराष्ट्र-कर्नाटक प्रश्नांत यांना स्वारस्य नाही, पण नामांतरात आहे. कर्नाटकातील बारा शहरांची नावे बदलण्याचा निर्णय केंद्राने एका झटक्यात घेतला. त्यामानाने औरंगाबादचे संभाजीनगर करण्यास उशीर लागला. उद्धव ठाकरे यांच्या सरकारने तो घेतला. पण २०१४ मध्ये कर्नाटकातील बारा नावे एका रात्रीत बदलली गेली. ती पुढीलप्रमाणे : कंसात नवे म्हणजे बदललेले नाव आहे. बंगलोर (बंगळुरू), मंगलोर (मंगळुरू), म्हैसूर (म्हैसुरू), गुलबर्गा (कलबुर्गी), हुबळी (हुब्बळी), शिमोगा (शिवमोगा), चिकमंगळूर (चिक्कमंगळुरू), बेल्लारी (बळ्ळारी), विजापूर (विजयपुरा), हॉस्पेट (होसपेटे), आंध्रात राजमुंद्रीचे राजमहेंद्रवरम, हरियाणात गुडगावचे गुरूग्राम, उत्तर प्रदेशात अलाहाबादचे प्रयागराज, छत्तीसगढमध्ये न्यू रायपूरचे अटलनगर, महाराष्ट्रात औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव वगैरे. देशातल्या अकरा रेल्वेस्थानकांची नावे बदलण्यात आली आहेत. आणखी काही स्थानकांचे नामांतर अजेंड्यावर आहे. विमानतळे, बंदरे, मैदाने, रस्ते, गद्या आदींचाही त्यात समावेश आहे. ही नामांतराची मोहीम देश आणि देशाच्या मानसिकतेला पुढे नेणार की मागे नेणार, भूतकाळाच्या सावल्यांत जगायला लावणार, की वर्तमानकाळातील लढाया करून जगायला लावणार, हे येणारा काळच ठरवणार आहे. ●●●

**– तात्या विंचू**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

